अति-शीघ्र भगवंतांची प्राप्ती

—श्री अनिरुद्ध दास अधिकारी

विषय सूची

शीर्षक	पृष्ठ संख्या
विनम्र निवेदन	
वैष्णव प्रार्थना	
(१) खऱ्या अर्थाने शंभर टक्के रसमय परमानंदाने भजन कसे करावे?	
(२) स्वतःच्या भजन-स्तराच्या तपासणीचा आरसा.	
(३) पुढील जन्म मानवाचाच मिळेल, याची कोणतीही हमी नाही.	
(४) श्रीगुरुदेवांनी सांगितलेले हरिनामाचा जप करण्याचे सोपे साधन.	
(५) श्रीहरिनामाचे स्मरण अंतःकरणातून होवो.	
(६) श्रीहरिनामच परमानंदाचा जनक (श्रीहरिनामातून परमानंदाची प्राप्ती होते).	
(७) हरिनामात मन लावण्याचे विविध मार्ग	
(८) भगवान हरिनामाचा जप करणाऱ्या साधकाला उन्नत भक्ताच्या हृदयरूपी झरोक्यातून न्याहाळतात. नित्य प्रार्थना आणि उपदेशावली.	
(९) भक्ति-बीजाचे रोपण.	
(१०) चांडाळ कलियुगाच्या प्रकोपातून वाचण्याचा एकमेव उपाय—'हरिनाम स्मरण'.	
(११) कर्मच श्रेष्ठ आहे.	
(१२) हरिनामामुळे कोणत्याही गोष्टीची कमतरता राहत नाही.	
(१३) हरिनामात रूची का नसते?	

(१४) हरिनामातून भगवान श्रीकृष्ण कसे प्रकट होतात?	
(१५) महाप्रभू गौरहरींचा एक लाख हरिनाम जप करण्याचा आदेश.	
(१६) भगवंतांच्या प्रती 'आपलेपणा'.	
(१७) अंतिम आणि सर्वोत्तम उपाय—भगवंतांना नेहमी जवळ ठेवा.	
श्रीपाद अनिरुद्धदास अधिकारींचा संक्षिप्त जीवन परिचय.	
श्रील भक्तिदयित माधव गोस्वामी महाराजांचा संक्षिप्त परिचय.	
पुस्तक मिळण्याचे ठिकाण.	

प्रकाशक

श्री अनिरुद्ध दास अधिकारी,
गाव पांचूडाला, छींडची ढाणी
वाया राजनोता, तहसील कोटपूतली,
जिल्हा जयपूर (राजस्थान), भारत
दूरध्वनी—७७४२८३६१२१

प्रथम हिंदी आवृत्ती — ६००० प्रती
उत्थान एकादशी,
नोव्हेंबर २०१९
द्वितीय हिंदी आवृत्ती (सुधारित) — ५००० प्रती, डिसेंबर २०१९
प्रथम मराठी आवृत्ती — १००० प्रती, ऑक्टोबर २०२५

मुद्रण–संयोजन

युनायटेड ऍडव्हर्टायझिंग अँड मार्केटिंग सर्व्हिसेस डी–१५९ए, ओखला इंडस्ट्रीयल एरिया, फेज–1, नवी दिल्ली–११००२०

विनामूल्य वितरण

(For Free Distribution)

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

विनम्र निवेदन

सद्गृहस्थ, परम वैष्णव संत श्रील अनिरुद्ध प्रभूजी यांच्याशी गेल्या काही वर्षांच्या परिचयात त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचा, विलक्षण नामनिष्ठेचा आणि समर्थ सिद्ध-वाणीचा अनुभव घेत आहे. त्यांचा करुणा-पूर्ण, दीन, सहज-सरळ स्वभाव तर हृदयात खूप खोलवर स्पर्श करतो.

भगवान श्रीकृष्णांनी त्यांना साक्षात दर्शन दिले आणि त्यांनी इतर भक्तांनाही भगवान श्रीकृष्णांचे दर्शन घडविले. श्रीहनुमंतांनीही त्यांना दर्शन देऊन त्यांच्या दोन्ही हातांवर असलेल्या भगवंतांच्या आयुधांची अनेक चिन्हे दाखविली. तसेच श्रीहनुमंतांनी सांगितले की श्रीअनिरुद्ध प्रभू हे भगवंतांचे निज-जन (नित्य पार्षद) आहेत आणि हरिनाम प्रचारासाठी त्यांना भगवान् श्रीकृष्णांनी गोलोक-धामातून पृथ्वीवर पाठवले आहे. या सर्व गोष्टींवर सहज विश्वास बसतो कारण त्यांच्या संपर्कात आल्याने भक्तांच्या हरिनामाचा जप कितीतरी पटीने वाढलेला आढळतो. त्यांच्या ग्रंथांच्या संपर्कात आल्यावर स्वतःच्या, कुटुंबातील सदस्यांच्या आणि अनेक परिचित भक्तांच्या हरिनाम-जपाच्या संख्येत झालेली अनपेक्षित वाढ—हा तर प्रत्यक्ष पुरावाच आहे. श्रीअनिरुद्ध प्रभूंच्या संगतीचा किंवा त्यांच्या ग्रंथांच्या प्रभावाचे काय वर्णन करावे, फक्त फोनवर प्रभूंकडून काही क्षण श्रीहरिनाम ('हरे कृष्ण' महामंत्राचे उच्चारण) किंवा नाम-माहात्म्य ऐकल्यावर भक्तांच्या जप संख्येत चमत्कारिक वाढ होऊ लागते.

जरी आज देश-विदेशातील अनेक भक्त श्रीअनिरुद्ध प्रभूंच्या मार्गदर्शनाखाली दररोज एक ते तीन लाख हरिनाम करत आहेत आणि त्यांच्या हरिनामाचे माहात्म्य वर्णन करणाऱ्या **'इसी जन्म में भगवद् प्राप्ति'** या ग्रंथाचे हिंदी भाषेत ८ व इंग्रजी भाषेत २ भागही प्रकाशित झाले आहेत, तरीही काही काळापासून एक विचार मनात वारंवार येत होता—की प्रभूंचे शरीर आता ९० वर्षांहून अधिक झाले आहे आणि ते प्रचारासाठी तितकेसे भ्रमण करू नाहीत, मग भगवंतांनी इतकाच प्रचार करण्यासाठी आपल्या खास भक्ताला गोलोक धामातून पाठवले असेल का? सर्वशक्तिमान, अहेतुक-करुणामय (काही कारण नसताना सगळ्यांवर कृपा करणाऱ्या), परम-पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्णांनी आपल्या खास

भक्ताला अर्थात् श्रीअनिरुद्ध प्रभूंना कलियुगाचे निवारण करणाऱ्या एकमेव औषधस्वरूप युगधर्म–हरिनामाचा प्रचार करण्यासाठी या पृथ्वीवर पाठवले आहे. परंतु काय भगवान श्रीकृष्ण आपल्या करुणेचा पदर इतकाच हलवतील का? तसे तर वैष्णवांची कृपा कोणत्याही काळाने बाधित होत नाही, तरीही ही भावना मनात येत होती की, हाय रे देवा! श्रीअनिरुद्ध प्रभू या पृथ्वीवर हरिनाम प्रचाराची लीला करीत असेपर्यंत अधिकाधिक भक्त त्यांच्या आशीर्वादाने आणि कृपेने आपले हरिनाम वाढवू शकले असते, तर खूपच उत्तम झाले असते. म्हणून मनात हीच प्रेरणा वारंवार येत राहिली की कमीत कमी वेळेत, कसे त्यांच्या ग्रंथांचा काही प्रचलित भाषांमध्ये अनुवाद होऊ शकेल, ज्यामुळे त्या भाषांशी संबंधित लोकांचेही कल्याण होऊ शकेल.

परंतु आतापर्यंत विदेशी भाषांचे तर काय सांगावे, प्रमुख भारतीय भाषाही या ग्रंथांमध्ये लपलेल्या अमूल्य निधीपासून वंचित होत्या. सोबतच ही समस्याही होती की **'इसी जन्म में भगवद् प्राप्ति'** या मूळ हिंदी ग्रंथाच्या सर्व भागांचे प्रमुख भारतीय आणि विदेशी भाषांमध्ये भाषांतर आणि वितरण करण्यासाठी एक व्यापक–मोठी योजना, पुरेसा वेळ आणि धन इत्यादींचीही आवश्यकता होती. म्हणून हाच विचार येत होता की किती चांगले झाले असते जर हिंदी भाषेत उपलब्ध असलेल्या 'इसी जन्म में भगवद् प्राप्ति'च्या आठ भागांमधून काही लेख निवडून एका छोट्या आणि सोप्या पुस्तिकेचे संकलन झाले असते आणि मग त्याच पुस्तिकेच्या आधारावर इतर भाषांमध्ये श्रीअनिरुद्ध प्रभूंच्या हरिनाम संबंधी उपदेशाचे वेगाने भाषांतर झाले असते! काही स्नेही स्वजनांशी जेव्हा यावर चर्चा केली, तेव्हा त्यांनी लगेचच या विचाराचे समर्थन केले.

ऑक्टोबर २०१९ मध्ये श्रीअनिरुद्ध प्रभूंच्या आविर्भाव दिनी, शरद पौर्णिमेला, त्यांच्या निवासस्थानी जेव्हा हा प्रस्ताव त्यांच्यासमोर ठेवला, तेव्हा त्यांनी आनंदाने परवानगीच दिली नाही, तर हे म्हणून आशीर्वादही दिला की—"तुम्हाला ही प्रेरणा माझे आराध्य–विग्रह श्रीगोविंददेव यांनीच दिली आहे." सोबतच **'इसी जन्म में भगवद् प्राप्ति'** या मूळ हिंदी ग्रंथाच्या आठ भागांमधून लेखांची निवड करण्यासंबंधी काही संकेत व सूचनाही श्रीअनिरुद्ध प्रभूंनी दिल्या. परिणामी हे संकलन नोव्हेंबर २०१९ मध्ये **'अति शीघ्र भगवद्**

प्राप्ति' या शीर्षकाखाली हिंदीमध्ये प्रकाशित झाले. भक्तांनी या संकलनाचे खूप कौतुक केले, म्हणूनच आता एका महिन्याच्या आतच या दुसऱ्या आवृत्तीचीही गरज भासली आहे.

अनेक वर्षांपर्यंत रात्र-रात्रभर विरहपूर्ण हरिनाम करत असताना श्रीअनिरुद्ध प्रभूंना जी प्रेरणा होत असे, ती ते अंशतः पत्रांच्या माध्यमातून आपले मित्र परम पूजनीय श्री भक्तिसर्वस्व निष्किंचन महाराजांना लिहित असत. **'इसी जन्म में भगवद् प्राप्ति'** हा त्याच पत्रांवर आणि प्रभूंच्या काही प्रवचनांवर आधारित ग्रंथ आहे, ज्याचे ८ भाग त्यांच्या कृपापात्र, सेवा-उत्साही स्वजनांच्या निष्ठापूर्ण प्रयत्नांनी प्रकाशित केले गेले आहेत.

शास्त्रांमध्ये वारंवार या गोष्टीचे पुनरुच्चारण केले गेले आहे की कलियुगात या भवसागरातून पार होण्याचा एकमेव उपाय 'श्रीहरिनामाचा आश्रय घेणे' हाच आहे. शास्त्रांनी याच अच्युत (अटळ) सिद्धांताची पुष्टी केली आहेः—

हरेर्नाम हरेर्नाम हरेर्नामैव केवलम्।
कलौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा॥

अनुवाद—कलियुगात फक्त 'हरिनाम'च एकमेव साधन आहे. त्याशिवाय भक्ती तसे परमगती प्राप्त करण्यासाठी दुसरा कोणताही मार्ग नाही, नाही, नाही.

श्रीचैतन्य-चरितामृत हा अप्रतिम ग्रंथ श्रीगौडीय-वैष्णवांच्या प्राणांचा आधार आहे. त्यात वारंवार गर्जना व घोषणा करीत साधकांचे लक्ष हरिनाम-रूपी एकमेव आश्रयाकडेच आकर्षित केले आहे—

नाम विनू कलिकालें नाहि आर धर्म।
सर्व मंत्र सार नाम, एइ शास्त्र मर्म॥

अनुवाद—कलियुगात 'हरिनामाचे उच्चारण' हाच एक खरा धर्म आहे; इतर सर्व प्रकारची साधने त्याच्यापुढे क्षीण आहेत. सर्व मंत्रांचे सार हरिनामातच सामावले आहे—हेच शास्त्राचे गूढ तत्त्व आहे.

शास्त्राचे हे गूढ तत्त्व जाणून, भगवंतांच्या चरणकमलांना लक्ष्य करणारा कोणताही प्रबुद्ध, लोभी वैष्णव, तो कोणत्याही संस्था किंवा समाजाशी संबंधित असो, युगधर्म-हरिनामाच्या माहात्म्याचा प्रचार करण्यासाठी पूर्णपणे समर्पित असलेल्या या संकलनाचे वाचन

आणि मनन अपरिहार्य का मानणार नाही? जनसामान्यांच्या अंतिम कल्याणाचा विचार करून परम आदरणीय श्रीअनिरुद्ध प्रभूंचा नम्र आग्रह आहे की **"अति शीघ्र भगवद् प्राप्ती"** ही पुस्तिका घरोघरी पोहोचावी, म्हणून याच उद्देशाने या पुस्तिकेचे अनेक भाषांमध्ये विनामूल्य वितरण केले जात आहे. सर्व भारतीय आणि विदेशी भाषांमध्ये या पुस्तिकेचे लवकरात लवकर भाषांतर, प्रकाशन आणि वितरण होवो, हीच भगवंतांच्या श्रीचरणांमध्ये कातर प्रार्थना आहे.

या पुस्तिकेत ज्या काही चुका राहिल्या असतील, त्यासाठी क्षमा-याचना करून विनंती आहे की त्याकडे लक्ष वेधले जावे जेणेकरून पुढील आवृत्तीत त्या चुका सुधारण्याचा प्रयत्न करता येईल.

—श्रील अनिरुद्ध प्रभूंच्या सेवेत,
तुच्छ दास

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

वैष्णव प्रार्थना!

(प्रत्यक्ष अनुभवावर आधारित)

अनंतकोटी वैष्णवजन!
अनंतकोटी भक्तजन!
अनंतकोटी रसिकजन!
अनंतकोटी माझे गुरुजन!

मी जन्मोजन्मी तुमच्या चरणांची धुळकण आहे.
माझा स्वीकार करावा, माझ्या मनाची भटकंती दूर करावी.
मला कृष्णचरणांशी जोडावे, मला गौरचरणी अर्पण करावे.
जर माझ्याकडून काही अपराध झाले असतील
आपल्या चरण-कमळी—
जाणता किंवा अजाणता, या जन्मी किंवा पूर्वजन्मी—
तर कृपया क्षमा करावी, हे माझे गुरुजन!
मी तुमच्या चरणी शरणागत आहे.
पापी असो, अपराधी असो, खोटा असो की खरा असो—
चांगला असो की वाईट असो—जसा ही असो, मी तर
आपलाच नित्य-दास आहे.
मला प्रेमाने एकदा न्याहाळावे,
माझ्याकडे कृपादृष्टीने पाहावे,
आपलेपण आता निभवावे.
मी आपल्या चरणी शरणागत आहे,
हे माझे जन्मोजन्मीचे गुरुजन!

पालनासाठी मार्गदर्शक सूचना

(१) दररोज श्रीहरिनाम अर्थात् 'हरे कृष्ण' महामंत्राचा जप करण्यापूर्वी या प्रार्थनेचे उच्चारण केल्यास हरिनामात नक्कीच रुची निर्माण होईल आणि अनंत-कोटी वैष्णवांची कृपासुद्धा प्राप्त होईल.

(२) दररोज स्नान व आचमन करून गोपीचंदनाचा तिलक लावल्यानंतर ही प्रार्थना एकदा तरी म्हणावी.

(३) दररोज किमान ११ वेळा ह्या प्रार्थनेचे उच्चारण केल्यास सर्व प्रकारच्या अडचणींमधून आणि गंभीर अपराधांतून मुक्ती मिळते, तसेच भक्तीत लवकर प्रगती होते.

—अनिरुद्ध दास

* * *

टीप—श्रीअनिरुद्ध प्रभूंच्या गावाचे नाव हिंदीत "**छींड की ढाणी**" असे आहे. 'ढाणी' हा शब्द राजस्थान तसेच भारतातील इतर ग्रामीण भागांमध्ये वापरला जातो. याचा अर्थ झोपड्यांचा किंवा घरांचा एक लहान समूह—म्हणजेच एक छोटे गाव—असा होतो. ही एक प्रकारची वस्ती असते जी मुख्य गावापासून थोड्या अंतरावर वसलेली असते. अशा ढाणीत राहणारी कुटुंबे बहुतेक वेळा एकमेकांचे नातेवाईक असतात किंवा एकाच जातीतले असतात.

* * *

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

(१)

छींडची ढाणी

दिनांक—५/१०/२००८

शंभर टक्के रसमय परमानंदाने भजन कसे करावे?

परमाराध्यतम, प्रेमास्पद, भक्तगण तसेच शिक्षागुरुदेव, भक्तिसर्वस्व निष्किंचन महाराज यांच्या चरण-युगुली नराधम, अधमाधम, दासानुदास, अनिरुद्ध दास यांचा साष्टांग दंडवत प्रणाम आणि भजन-स्तर वाढून वैराग्य उदय होण्यासाठी वारंवार हात जोडून प्रार्थना.

हा मानव-जन्म पुण्याच्या (नित्य-सुकृतीच्या) फळाने आणि भगवंतांच्या कृपेने प्राप्त झाला आहे. तो व्यर्थ घालवणे हे सर्वात मोठे विचार करण्याजोगे दुःखास्पद नुकसान आहे. यात मन हेच एक मुख्य कारण आहे. श्रीगुरुदेव वारंवार साधकांना सावध करत आहेत, जागे करत आहेत, आताही खोल विचाराने आपल्या मनाला व्यर्थ कामांमध्ये न गुंतवता, परमार्थ कर्मामध्ये लावा. हे मानव-जीवन, जे भगवंतांच्या कृपेने मोठ्या कष्टाने मिळाले आहे, ते फक्त भगवंतांच्या प्राप्तीसाठी मिळाले आहे. हरिनामाच्या स्मरणरूपी सत्संगामध्ये गुंतवून, आपले हे दुर्लभ जीवन सफल करून घ्यावे, अन्यथा आता पुढे ही सुवर्णसंधी मिळणार नाही. २८ प्रकारचे नरक भोगून चौऱ्याऐंशी लाख योनींमध्ये, जे दुःखाचे सागर आहेत, तिथे जावे लागेल, कोणीही वाचवणार नाही, स्वतःच्या कर्माचे फळ स्वतःलाच भोगावे लागेल.

मी मार्ग सांगत आहे. या मार्गाने गेल्याने भगवंतांच्या शरणागत झाल्यावर, भगवान तुम्हाला आपलेसे करतील. तुमचा सर्व भार स्वतः उचलतील. तुमचे पूर्ण जीवन सुखमय होईल, भगवान तुम्हाला भेटण्यासाठी स्वतः येतील आणि तुम्हाला दर्शनाचा लाभ नक्कीच होईल, जसे मीराबाई, भक्त नरसी मेहता, सनातन गोस्वामी, रूप गोस्वामी, माधवेन्द्र-पुरीपाद इत्यादींना झाला. तुम्हालाही नक्कीच होईल. यात एक टक्काही अनिश्चितता नाही.

पुढीलप्रमाणे आपले जीवन जगावे लागेलः-

(१) एक लाख हरिनाम कानाने स्वतः ऐकून आणि गुरु, भगवान तसेच संत, जसे नामाचार्य हरिदास ठाकुर, माधवेन्द्रपुरी, रूप, सनातन, गौर, निताई, प्रल्हाद, ध्रुव, नृसिंहदेव, बजरंग (हनुमान), नारद मुनी इत्यादी कितीतरी संत व भगवंतांचे अवतार आहेत, त्यांच्या चरणांजवळ बसून त्यांना हरिनाम ऐकवत रहा, तर तुमचे मन एक क्षण इकडे-तिकडे कधीही भटकणार नाही. प्रत्यक्ष तथ्य सिद्ध करण्यासाठी पुराव्याची गरज नाही, कोणताही साधक आजमावून पाहू शकतो. अनुभव नेहमीच सर्वांसाठी शंभर टक्के खरा असतो.

विरहाग्नी प्रज्वलित होण्याचा एकमेव उपाय हाच आहे की आपल्या अंतःकरणातून हाक मारून बोला—**"हा निताई! हा निमाई! कृपा करा! या अपराध्यावर कृपा करा!"** हीच आहे विदीर्ण-हृदयाची हाक! हेच आहे इंजेक्शन! यामुळेच रोग दूर होईल! आजमावून पहा. दररोज एक लाख हरिनामाचा जप केल्याने त्यातून काहीतरी शुद्धनाम नक्कीच प्रकट होईल. हेच शुद्धनाम, 'नामाभास'-नामाला आपल्याकडे खेचून आपल्या शुद्धनामात नियोजित करून घेईल, कारण शुद्ध-नामात एक अलौकिक शक्ती असते, आणि नामाभास त्याहून कमकुवत असतो, म्हणून शक्तिशाली वस्तू कमकुवत वस्तूला आपल्याकडे आकर्षित करून घेते. हे तत्त्व ध्रुव-सत्य आहे. याच कारणास्तव श्रीगौरहरींनी आपल्या सर्व भक्तांना आदेश दिला आहे की जो कोणी दररोज एक लाख हरिनामाचा जप करेल त्याच्याच घरात मी प्रसाद घेईन. म्हणजेच ते घर सोडून मी कुठेही राहणार नाही. किती सोपा-सहज उपाय या कलियुगात आहे. घरी बसल्या-बसल्या भगवान मिळतील. जंगलात भटकावे लागणार नाही, जिथे थंडी, उन्हाळा व पावसाचा सामना करावा लागतो, खाणे-पिणे अवघड असते आणि कितीतरी विविध प्रकारचे कष्टांना सामोरे जावे लागते. ही सुवर्णसंधी हातातून घालवणे किती मोठे अज्ञान आहे.

(२) कमीत कमी पहाटे ३ वाजता ब्राह्म-मुहूर्ती उठून हरिनाम करावे लागेल, जसे मागील (पूर्ववर्ती) गुरुवर्गाने २-३ वाजता उठून हरिनाम केले आहे. लवकर उठणे तेव्हाच शक्य होईल, जेव्हा संध्याकाळचे व रात्रीचे भोजन फक्त नावापुरते कराल किंवा दुधावर राहाल, अन्यथा 'आळस' हा शत्रू भजनात अडथळा

आणेल. सुरुवातीला लवकर उठल्यावर आळस येईल, पण एका महिन्यानंतर आळस येणे बंद होईल.

(३) झोपताना, २ माळा हरिनामाचा जप कानाने ऐकून करावा लागेल जेणेकरून हे नाम रात्रभर झोपेतही पूर्ण शरीरात संचारित (Circulate) होत राहील. एका दिवसात असे होणार नाही. काही दिवसांनंतर या संचारणाचा प्रभाव पडून, भगवंतांशी संबंधित स्वप्नांमध्ये रूपांतरित होईल. भगवान् श्रीकृष्ण अर्जुनांना श्रीमद्भगवद्गीतेत वारंवार सांगतात—**"सरावाने सर्व काही होईल."**

श्रीभगवानुवाच—

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम्।
अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते॥

(श्रीमद्भगवद्गीता अध्याय ६ श्लोक ३५)

अनुवाद—श्रीभगवान म्हणाले—हे महाबाहो अर्जुन! निःसंशय मन चंचल आणि कठीणतेने वश होणारे आहे, परंतु हे कुन्तीपुत्र! **अभ्यास** आणि वैराग्याद्वारे हे वशात होऊन जाते.

प्रत्यक्षात हे पाहिलेही आहे की टायपिस्ट (Typist) बोलतही असतो, टाइप (Type) पण करतो. वाहन-चालक बोलतही राहतो आणि वाहन चालवताना अपघातापासूनही वाहनास वाचवतो. सरावाने काय होऊ शकत नाही?

(४) दररोज फावला वेळ मिळाल्यास श्रीमद्भागवत-महापुराण, श्रीचैतन्य चरितामृत तसेच हरिनामाचे माहात्म्य वर्णन करणाऱ्या इतर पुस्तकांच्या अध्ययनाद्वारे सत्संग (शास्त्रीय-साधुसंग) प्राप्त करत रहा. जेणेकरून तुमच्या हरिनाम-जपाला चांगला खुराक मिळत राहील. जर शुद्ध संतांची भेट होऊ शकली आणि त्यांच्याशी हरिनामाविषयी विचारविमर्श करत राहिला, तर हरिनामात रुची नक्कीच होईल. यासंबंधी एक टक्काही विचार करण्याची गरज नाही.

(५) ब्रह्मचर्य-पालन अत्यंत आवश्यक आहे. ब्रह्मचर्य-पालनाचा मुख्य उद्देश सर्व इंद्रियांना त्यांच्या गोलकात (मर्यादेत) नियोजित ठेवणे आहे. इंद्रियांना जागतिक अथवा भौतिक विषयांकडे जाऊ देऊ नये. सर्व इंद्रियांना (पाच कर्मेंद्रिये व पाच ज्ञानेंद्रिये तसेच मन अशा अकरा इंद्रियांना) आध्यात्मिक विषयात गुंतवून ठेवा, जेणेकरून त्यांच्यावर भौतिक विषयांचे आवरण चढणार नाही, कारण मनच सर्व इंद्रियांचा राजा आहे. हे मनच सर्व इंद्रियांना

आदेश देऊन भौतिक विषयांमध्ये नियोजित करत राहते. टी.व्ही., रेडिओ, वर्तमानपत्र, मोबाइल, बाहेरील वातावरण, विचित्र-चित्रे, पशु-पक्षी-रमण (पशू आणि पक्षी-जातीतील नर आणि मादी यांचा संभोग), विचित्र पोषाख किंवा वेषभूषा इत्यादींचे सर्वात जास्त आकर्षण व प्रभाव मनावर पडत राहतो. यापासून वाचण्याचा उपायही श्रीगुरुदेव सांगत आहेत. टी.व्ही., रेडिओ व वर्तमानपत्रापासून दूर राहण्यात कोणतीही अडचण नाही. वरील इतर आकर्षणांपासून वाचण्यासाठी डोळ्यांवर नियंत्रण अत्यंत आवश्यक आहे. डोळे तर वेड्यावाकड्या दृश्यांकडे स्वाभाविकपणे जातीलच, पण एकदा गेल्यावर दुसऱ्यांदा त्या दिशेला नजर टाकू नका. दुसऱ्यांदा वेडीवाकडी दृश्ये पाहिल्यास दुष्ट मन त्यांना पकडून ठेवते (अर्थात् त्या वाईट दृश्यांचा मनावर जबरदस्त कुसंस्कार होतो) आणि नंतर समस्या नियंत्रणाबाहेर जाते. मग मनोहर-भजन कसे होऊ शकते? (अर्थात् मनावर वाईट दृश्यांचे जबरदस्त कुसंस्कार असल्यावर भगवान् श्रीकृष्णांच्या मनालाही आकर्षित करणारी भक्तिमय सेवा संभव नाही.) याला साधकाची कमजोरी किंवा दुर्बलताच म्हणावी लागेल. एका वेळच्या स्त्री-संगाने सगळा सात्विक-भाव पूर्णपणे नष्ट होतो. हजारो वर्षांची तपस्या एका क्षणात समाप्त होते. हा केवळ श्रीगुरुदेवांचाच उपदेश नव्हे, तर शास्त्रांचाही उपदेश आहे.

(६) गावातील (ग्राम्य) चर्चा आणि निरर्थक गप्पांकडे पाठ फिरवा. प्रत्येक वेळी हातात जपमाळ असो किंवा नसो, आपल्या मुखाने श्रीहरिनामाचे स्मरण करत रहा. दुसरा संकल्प-विकल्प मग मनात येऊच शकत नाही. यासाठी सरावाची खूप गरज आहे. सतत होणाऱ्या नामस्मरणाने घराप्रतीची आसक्ती कमी होत जाईल आणि सोबतच भगवंतांप्रती असणारी आसक्तीही वृद्धिंगत होत जाईल. भौतिक आसक्तीच तर आमचा मूळ शत्रू आहे. हिलाच पूर्णपणे नष्ट करायचे आहे. पण आसक्तीच्या तावडीतून सुटका व अनर्थांची निवृत्ती सतत हरिनामाचा जप केल्यानेच होईल. मनरूपी रोपट्याला भौतिक चिंतनरूपी वाफ्यातून उपटून भगवद्-चिंतनरूपी वाफ्यातच तर लावायचे आहे. त्यात काय अवघड आहे? असे करू न शकण्यास त्यास आपले कमजोर अथवा दुर्बळ मनच कारण आहे.

(७) अहिंसक वृत्तीचे पालन अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही जीवाला त्रास देऊ नका. सर्व जीव भगवंतांचे पुत्र आहेत. पुत्रांना दुःख दिल्याने त्यांचा पिता (भगवान) आनंदी राहील का? कधीच नाही. सर्वांवर दया करा, शक्य झाल्यास शरीत, मन आणि वाणीने सर्वांची सेवा करा, पण कोणालाही कधीच त्रास देऊ नका. सन्मार्गाचा उपदेश देऊन त्यांचे भले करण्यासाठीच जीवन जगा.

(८) शुद्ध-कमाईचा प्रसादच भक्ती वाढवतो. अशुद्ध-कमईने भक्ती नष्ट होत राहते, जसे पाहिलेही जात आहे. जे उपलब्ध आहे, त्यातच समाधान ठेवा. 'हाय-हाय'च्या चक्रात अडकू नका. जास्त वस्तू गोळा करू नका. गरजेपेक्षा अधिक वस्तूंचा संग्रह आम्हाला नंतर संकटात टाकेल. मर्यादित वस्तूच घरात ठेवा, ज्याने जीवन निर्वाह होईल. आपल्यापेक्षा आर्थिकरीत्या वरच्या स्तरावर असलेल्या उच्चभ्रू लोकांच्या जीवनशैलीकडे पाहू नका. उलट आपल्यापेक्षा आर्थिकरीत्या कमकुवत स्तरातील लोकांची जीवनशैली पाहिल्यास नेहमी सुखी राहू शकाल, अन्यथा जीव जळतच राहील. "त्याच्याजवळ गाडी आहे, बंगला आहे. माझ्याकडेही असावा." जर या महागड्या वस्तू मिळवू शकला नाहीत तर नेहेमी दुःखी राहाल किंवा चुकीच्या (अर्थात् भ्रष्टाचाराच्या) मार्गाचे अवलंबन कराल.

(९) प्रसाद घेताना नाम-स्मरण केल्याने दिवसभर अष्ट-सात्विक धारा वाहत राहतील. **"जसे अन्न, तसेच मन".** पाणी पिताना हरिनामाचे स्मरण केल्याने ते भगवंतांचे चरणामृत बनून पोटात जाईल. मग आपले बोललेले प्रत्येक वाक्य (वाणी) अक्षरशः सत्य निघेल. खोट्या गोष्टींशी संबंध येणारच नाही. **"जसे पाणी, तशीच वाणी."**

(१०) कुठेही मान-सन्मानाची अपेक्षा ठेवू नका. जर मान-सन्मान मिळाला, तर याला 'भगवंतांची कृपा' समजावी, जेणेकरून अहंकार येणार नाही. आपली अहं-बुद्धी भगवंतांच्या चरणी अर्पण करा. अंतःकरणातून खोल विचार करून स्वतःच्या मनाला प्रश्न विचारावा की "अरे मना! तू कोणत्या लायकीचा आहेस? तुझ्यापेक्षा चांगले तर पशू आणि पक्षी आहेत, जे नैतिक-मर्यादेचे पालन करतात. भक्ष्य-अभक्ष्याची मर्यादा पाळतात अर्थात् काय खावे व काय खाऊ नये याचे भान ठेवतात. ते प्रकृतीच्या (निसर्गाच्या)

नियमांनी बांधलेले आहेत. आपल्या मालकाला ओळखून प्रेम करतात. तुझ्यात तर प्रेमाचा लवलेशही नाही. तू आपल्या आई-वडिलांचाही नाहीस, इतरांचा तर होण्याचा प्रश्नच नाही." असा विचार केल्याने अहं-भाव पूर्णपणे नष्ट होईल. मग अहंभावाला डोके वर काढणेही अवघड होईल.

(११) भगवंतांच्या विविध उत्सवांच्या दिवशी (जसे जन्माष्टमी, रामनवमी, नृसिंह-चतुर्दशी आणि गौर-पूर्णिमा) आणि भक्त-जनांच्या आविर्भाव व तिरोभाव दिवशी त्यांचे विशेष स्मरण करून त्यांचे जीवन-चरित्र ऐकावे आणि इतर भक्तांना सुद्धा प्रेमपूर्वक ऐकवावे. या विशेष उत्सवांच्या दिवशी संपूर्ण दिवस हरि-कीर्तन करावे. तसेच भक्तांनी रचलेल्या पद्यांचे, अभंगांचे व भजनांचे गान करीत दिवसभर सत्संग करत रहावा. मग भौतिक कामांसाठी किंवा वायफळ चर्चेसाठी वेळच कुठे मिळेल? साधक, रात्रंदिवस, भगवंतांच्या चरणीच आपल्या साधनेत मग्न राहील. शरीराचा त्याग करताना सुद्धा त्याचा अंत प्रशंसनीय असेल. नामनिष्ठ भक्ताला वैकुंठात घेऊन येण्यासाठी भगवान आपल्या पार्षदांना न पाठवता, स्वतःच येतात, कारण साधकाने रात्रंदिवस आपले जीवन हरिनामाचा जप करण्यातच व्यतीत केले आहे. हरिनाम आणि भगवान एकच तर आहेत. भगवंतांनीच कलियुगात 'हरिनामाच्या' रूपात अवतार घेतला आहे. भगवान स्वतःच त्या नामनिष्ठ भक्ताच्या जिभेवर रात्रंदिवस नृत्य करत राहतात. भगवान त्याच्यापासून वेगळे झाले तरी कधी? (अर्थात् भगवान त्या भक्तापासून कधीही दूर होत नाहीत.) ते सतत त्याला चिकटून राहतात. त्या नामनिष्ठ-भक्ताच्या मृत्यूच्यावेळी सुद्धा ते कुठे दुर जातील का? त्या नामनिष्ठ-भक्ताला वैकुंठात घेऊन जाण्यासाठी त्याच्याजवळच चिकटून बसलेले असतात. स्वतःचे विमान मागवून आणि त्या नामनिष्ठ-भक्ताला प्रेमाने त्यात बसवून ते त्याला आपल्या गोलोक-धामात घेऊन जातात. तिथे त्या नामनिष्ठ-भक्ताचे भव्य स्वागत होते. रमणीय स्थान त्याला मिळते. त्या भक्ताच्या मनाला सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या कल्पवृक्षाद्वारे व अतिशय सुंदर, सर्व मनोकामना पूर्ण करणाऱ्या चिंतामणीने विभूषित केले जाते. कारण मनानेच तर त्याला गोलोक-धामात पाठवले आहे. मनाच्या सर्व कामना तेथे पुरवल्या जातात, म्हणूनच म्हटले आहे —"मनच जीवाचा मित्र आहे, मनच जीवाचा शत्रू आहे." जर

आमच्या मनाने आम्हाला भगवंतांच्या सेवेत आणि हरिनामात निमग्न केले तर मन आमचा मित्र आहे आणि जर त्याने मायेत अडकवले तर मन आमचा शत्रू आहे. अनंत जन्मांपासून, अनंत युगांपासून तसेच आदिजन्मापासून या मनाने जीवाला मायेत अडकवून ठेवले आहे.

जेव्हा मनाला साधुसंगाची कृपा मिळाली तेव्हाच ते मायेच्या जाळ्यातून सुटू शकले. साधूंच्या कृपेशिवाय मायेतून सुटण्याचा कोणताही दुसरा उपायच नाही. म्हणून म्हटले आहे—**'मन के कहे न चलिए, यदि चाहो तुम कल्याण।'** (मनाच्या सांगण्यावर चालू नका, जर तुम्हाला स्वतःचे कल्याण हवे असेल.) जर मनाच्या सांगण्यावर चालत राहाल तर ते तुमचा संहार करेल. मन भूत आहे, जर याला काही काम नाही दिले (अर्थात् मनाला रिकामटेकडे ठेवले) तर हे तुम्हालाच मारून टाकेल. यासंबंधी एक सुंदर उदाहरण देतो आहे. एका व्यक्तीने भूत पाळले. भूताला जे काम सांगितले, ते काम लगेचच करून टाकायचे आणि म्हणायचे —"आता मी काय करू?" त्या व्यक्तीने म्हटले, "आता तर करायला काहीच काम उरले नाही, नंतर सांगेन." भूत म्हणाले —"मी रिकामा राहू शकत नाही, जर मला काम सांगितले नाही तर मी तुला मारून टाकेन." आता तर भूताच्या मालकावर संकट आले. या भूताचा पिच्छा कसा सुटणार? मी भूत पाळून स्वतःचाच नाश करून घेतला. तो सर्वांना विचारत फिरे, "मी स्वतःला कसा वाचवू?" एक ज्ञानी पुरुष म्हणाला—"दुसरे कोणी तुला वाचवू शकत नाही. पण संत-महात्म्यांकडे अनेक उपाय असतात. तेच तुला वाचण्याचा उपाय सांगू शकतात. तू अमुक साधूजवळ जाऊन विचार. ते सिद्ध-महात्मा आहेत." भूताच्या मालकाने त्या सिद्ध-महात्म्याला स्वतःला वाचण्याचा उपाय विचारला. सिद्ध-महात्मा म्हणाले—"हे भूत तर तुला खाऊन टाकेल. यावर कोणताही उपाय नाही." भूताचा मालक गिडगिडत व विनवणी करत म्हणाला, "सर्वजण तुम्हाला सिद्ध-महात्मा म्हणून जाणतात, भगवंतांना विचारून या भूताचा पिच्छा सोडवण्याचा उपाय सांगू शकता का?" त्या महात्म्याला दया आली, ते म्हणाले—"मी विचारेन, तुम्ही उद्या अभिजित मुहूर्तात येथे येऊन भगवंतांनी स्वतः सांगितलेला उपाय मला विचारा." भूताचा मालक म्हणाला—"अभिजित मुहूर्त कधी

असतो?" महात्मा म्हणाले—"दुपारी पावणे बारा ते सव्वा बारा वाजेपर्यंत." त्याने म्हटले—"तोपर्यंत तर ते भूत मला संपवूनच टाकेल." सिद्ध-महात्मा म्हणाले—"थोडा वेळ थांबा, मी भगवंतांचे ध्यान करून त्यांनाच विचारतो, ते काय उपाय सांगतात." ते महात्मा आत गेले आणि त्यांनी आत जाऊन काय केले, माहीत नाही. ते बाहेर येऊन म्हणाले—"तू अंगणात एक दहा फूट लांब बांबू गाडून भूताला सांगून टाक, 'जेव्हा काम नसेल या बांबूवर चढ आणि खाली उतर.' " तर कामाचा अंतच होणार नाही. भूताचा मालक म्हणाला—"खूप योग्य उपाय आहे, आता तर मीच त्या भूताला त्रास देईन."

हेच आहे मनाचे भूत! याला रिकामे सोडू नका, अन्यथा तुम्हाला गिळंकृत करून टाकेल. वर सांगितलेल्या नियमाचे पालन केल्याने, म्हणजेच जितके शक्य आहे तितके मनाला हरिनामात गुंतवून ठेवल्याने भगवंतांच्या शरणागतीमुळे भगवंतांचे दर्शन होऊन जाते. भगवंतांना स्वतः भक्ताचे दर्शन करण्यास बाध्य व्हावे लागते.

विशेष सूचना :—

(१) ज्याने जिभेवर नियंत्रण ठेवले, त्याची सर्व इंद्रिये वश झाली. जिभेचा आणि उपस्थ इंद्रियाचा (जननेंद्रियाचा) थेट संबंध असतो. "कोरडे अथवा सुके भोजन करा आणि भगवंताचे प्रेम सहजच प्राप्त करा."

(२) जे भगवंताचे प्रिय साधूजन आहेत, त्यांची तर चुकूनही निंदा करू नका, आणि त्यांना त्रासही देऊ नका, अन्यथा भगवान निंदकाला कठोर दंड देतील. पापी कितीही पाप करो, त्यावर भगवान इतके रागावत नाहीत, जितके आपल्या भक्ताला दुःख दिल्याने रागावतात. पापी तर आपल्या पापाचे फळ भोगून घेईल, त्यात भगवंतांचे काय जाते, परंतु भक्ताला त्रास देणारा मनुष्य तर भगवंतांचाही मोठा शत्रू आहे. भगवान त्याला रौरव नरकात किंवा चिरकालिक असाध्य (chronic) आजार देऊन मोठा दंड देतात. याचे प्रत्यक्ष उदाहरण आहे—गोपाल-चापाल विप्र, ज्याचा अपराध श्रीनिवासांच्या (श्रीवास पंडितांच्या) प्रती झाला होता. म्हणूनच त्याला शचीनंदन गौरहरींनी कुष्ठरोगाचा दंड दिला. अंबरीष महाराजांना त्रास देणाऱ्या महादेव शंकरांच्या अंशातून उत्पन्न अत्री ऋषी आणि सती

अनसूयेचे पुत्र, महर्षी दुर्वासा, यांना सुद्धा सुदर्शन चक्राकडून दुःख भोगावे लागले.

* * *

श्रीहरिनाम करता-करता श्रीचैतन्य महाप्रभूंच्या कृपेने जेव्हा जीवाचे भाग्य उदय होते, तेव्हा नाम-सेवेतून त्याची भाव-सेवा प्रकट होते. भक्तीच्या इतर सर्व साधनांचे अंतिम फळ आहे— श्रीहरिनामात प्रेम! म्हणून नामसाधक श्रीहरिनामाचा जप करत राहतो आणि त्याचमध्ये मग्न राहतो. श्रीहरिनामनिष्ठ भक्त कोणत्याही इतर साधनाप्रती निष्ठा बाळगत नाही.

(श्री हरिनाम चिंतामणी)

* * *

जीवन अनित्य जानह सार, ताहे नाना-विध विपद-भार।
'नामाश्रय करि' जतने तुमि, थाकह आपन काजे॥

(गीतावली)

अनुवाद—श्रीगौरहरी सर्व जीवांना उपदेश देत आहेत, "हे जाणून घ्या की, एक तर हे जीवन अनित्य आहे आणि त्यातही या जीवनात अनेक प्रकारची संकटे आहेत. म्हणून तुम्ही प्रयत्नपूर्वक हरिनामाचा आश्रय घ्या आणि फक्त जीवन जगण्यासाठी भौतिक व्यवहार करा."

* * *

सरलतापूर्वक गुरु आणि वैष्णवांच्या सेवेत तत्पर राहून, नेहमीच श्रीनाम-भजन केल्याने सर्व अनर्थ दूर होतात.

(श्रील वामन गोस्वामी महाराज)

* * *

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

(२)

छींडची ढाणी
एकादशी, दिनांकः १/०५/२००८

स्वतःच्या भजन-स्तराच्या तपासणीचा आरसा
(भगवंताने प्रेरित केलेला आरसा – दृष्टिगोचर आख्यान)

१. भगवंताच्या भजनात मन स्वाभाविकपणे रममाण होते की नाही?
२. गोंधळात (कोलाहलातही) मन स्थिर राहते की नाही?
३. सन्मान व प्रतिष्ठा प्राप्त झाल्याने मन दुःखी होते की नाही?
४. संकटातसुद्धा मन स्थिर राहते की नाही?
५. भजन करण्यासाठी मनात उत्साह आहे की नाही?
६. इंद्रियांवर संयम राहतो की नाही?
७. दुःखात भगवंतांची आठवण येते की नाही?
८. कोणत्याही प्राण्याला दुःखी पाहून स्वतःला दुःख होते की नाही?
९. कोणाची निंदा आणि आपली स्तुती ऐकून, मनात घृणा निर्माण होते की नाही?
१०. भगवंतांच्या नाम, गुण, रूप तसेच लीलेसंबंधी चर्चा ऐकून आणखी ऐकण्याची इच्छा होते की नाही?
११. प्रत्येक प्राण्यावर (जीवावर) उपकार करण्याची इच्छा होते की नाही?
१२. संतांना भेटून परमानंदाची अनुभूती होते की नाही?
१३. संतांपासून वेगळे झाल्यावर खूप दुःखाचा अनुभव होतो की नाही?
१४. संतांच्या चरणी बसल्यावर जास्त वेळ बसण्याची इच्छा होते की नाही?
१५. भजनानंदाची भूक आधीपेक्षा जास्त होत आहे की नाही?
१६. भजनाचा ऱ्हास झाल्यावर अंतःकरण दुःखी होते की नाही?
१७. कधी भगवंतांचे, संतांचे, मंदिराचे किंवा तीर्थाचे स्वप्न येतात की नाही?

१८. स्वप्नात अष्ट-सात्त्विक विकार कधी येतात की नाही? [भाव अवस्थेतील अष्ट-सात्त्विक विकार आहेत—(१) स्तम्भ अर्थात् अचंबित होणे, शरीर स्थिर होणे, (२) घर्म अर्थात् घाम येणे, (३) रोमाञ्च अर्थात् अंगावर शहारे येणे, (४) स्वरभेद अर्थात् आवाज थरथरणे किंवा तुटक होणे, (५) कम्प अर्थात् शरीर थरथरणे, (६) वैवर्ण्य अर्थात् चेहऱ्याचा रंग उडणे, (७) अश्रू अर्थात् डोळ्यांतून अश्रू वाहणे आणि (८) प्रलय अर्थात् मूर्छा येणे, शुद्ध हरपणे, किंवा बेशुद्ध होणे.]

१९. रात्री २-३ वाजता भजन करण्यासाठी उठण्याची इच्छा होते की नाही?

२०. भजनामुळे मनात मस्तीची लहर धावते की नाही?

२१. ग्राम्य (गावातील) चर्चांचा तिटकारा येतो की नाही?

२२. इंद्रियांची गती आधीपेक्षा कमी होत आहे की नाही?

२३. सर्व कर्मे भगवंतावर सोडली आहेत की नाही?

२४. या जगाला दुःखाचा सागर समजले आहे की नाही?

२५. मृत्यू लवकरच येणार आहे—हे तथ्य समजले आहे की नाही?

२६. स्वतःपेक्षा खालच्या स्तराच्या भक्तालाही झुकून सन्मान देता की नाही?

२७. श्रीगुरुदेवांना भगवंतांचे प्रिय पार्षद मानून त्यांच्या सेवेत मग्न राहता की नाही?

२८. शत्रूचेही उपकार करण्याची भावना मनात येते की नाही—'तृणादपि सुनीचेन' (गवताच्या पात्यापेक्षाही विनम्रतेची) भावना हृदयात उत्पन्न झाली आहे की नाही?

२९. दुसऱ्याचा अधिकार जबदस्तीने न बळकावता, खऱ्या कमाईचा पैसा कमावला आहे की नाही?

३०. आपल्या दैनंदिन गरजा मर्यादित ठेवण्याची भावना मनात येते की नाही?

३१. जे उत्पन्न मिळते आहे, त्यावरच मन समाधानी आहे की नाही?

३२. मंदिरातील श्रीविग्रहाचे दर्शन भावपूर्वक होते आहे की नाही?

३३. स्मरण-कीर्तनात अष्ट-सात्त्विक विकार उदय होतात की नाही?

वरील अवस्था उदय झाल्यावर स्वतःच्या भजनाचा स्तर आरशासारखा स्पष्ट दिसतो. हेच आहे भगवंतांच्या शरणागतीचे खरे रूप.

* * *

नामाचार्य श्रील श्रीहरिदास ठाकुर यांची दृढ प्रतिज्ञा

खंड खंड हइया देह जाय यदि प्राण।
तबुह आभमि वदने ना छाड़ि हरिनाम॥

(श्रीचैतन्यभागवत, आदि-खंड, ११.९१)

अनुवाद—जर माझ्या शरीराचे छोटे-छोटे तुकडे केले गेले आणि मी माझे प्राण गमावले तरीही मी हरिनामाचा जप कदापि सोडणार नाही.

* * *

जलजा नव लक्षाणि स्थावरा लक्षविंशतिः।
कृमयो रुद्रसङ्ख्याकाः पक्षिणां दशलक्षकम्॥
त्रिंशल्लक्षाणि पशवश्चतुर्लक्षाणि मानुषाः।

(१) जलचर प्राण्यांच्या सुमारे ९ लाख जाती आहेत,
(२) झाडे आणि वनस्पतींच्या २० लाख जाती,
(३) कीटक आणि सरपटणाऱ्या प्राण्यांच्या ११ लाख जाती,
(४) पक्ष्यांच्या १० लाख जाती,
(५) चार पाय असलेल्या पशूंच्या ३० लाख जाती,
(६) आणि मनुष्यप्राण्यांच्या ४ लाख जाती आहेत.

मनु म्हणतात की झाडे ज्या अत्यंत निराशाजनक स्थितीत आहेत, ती त्यांच्या स्वतःच्या कर्माचे फळ आहे. त्यांनाही दुःख आणि आनंदाची अनुभूती होते, जशी आपल्याला होते. त्यांच्या आत्म्याचा दर्जा कमी नाही. तरीही, ते ज्या दयनीय अवस्थेत आहेत, ती त्यांच्या कर्मामुळेच आहे. त्यांना दोष देण्यासाठी दुसरे कोणीही नाही. हीच आहे या बाह्य जगतातील वस्तुस्थिती—जिथे प्रत्येक जीव आपल्या कर्मानुसारच आपले स्थान प्राप्त करतो.

* * *

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

(३)

छींडची ढाणी
दिनांक—२९/११/२०१०

पुढील जन्म मानवाचाच मिळेल, याची कोणतीही हमी नाही

प्रेमास्पद भक्त प्रवरगण,

नराधम, अधमाधम, दासानुदास अनिरुद्धदास यांचा साष्टांग दंडवत प्रणाम आणि भजन स्तर वाढण्याची वारंवार प्रार्थना.

सतत वैष्णवांप्रती अपराध केल्यास स्वप्नातही हरिनामात मन लागू शकत नाही. या अपराधांमुळे चौऱ्याऐंशी लाख योन्यांमध्ये जन्म घेऊन भयंकर दुःख भोगावेच लागेल. एकदा नाही, तर कितीतरी वेळा चौऱ्याऐंशी लाख योन्यांतून जावे लागेल कारण माणूस आपल्या आयुष्यात कितीतरी जीवांचा संहार करत असतो. ज्या-ज्या जीवांना तो मारतो, ते सर्व त्याला मारून सूड घेतील. जीवांचे आयुष्यही वेगवेगळे असते. एक दिवसापासून पाच हजार, दहा हजार वर्षांपर्यंतचे असते. या जीवांमध्ये मानवही जन्म घेतो, जो इतर जीवांना मारतो. तो याचा कधीही विचार करत नाही की त्याला या सर्व हत्यांचा बदला फेडावाच लागेल.

माझे श्रील गुरुदेव नित्यलीलाप्रविष्ट ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत श्रीश्रीमद्भक्तिदयित माधव गोस्वामी महाराज सर्व साधकांचे डोळे उघडत आहेत आणि म्हणत आहेत की आता तरी जागे व्हा. श्रीहरिनामाची शरण ग्रहण करा. दररोज एक लाख हरिनाम करणे अत्यंत आवश्यक आहे आणि तेही मुखाद्वारे उच्चारण करून आणि कानाने ऐकून करावे लागेल. ऐकल्याशिवाय नाम प्रभाव टाकणार नाही. श्रील प्रभुपादांनी म्हटले आहेः—

All benefits accrue to one who chants the Holy name but there is one thing, we must bear in mind, if you are going to chant, you must first listen. Through the worship of Holy name, the soul can attain all perfections.

— Śrīla Prabhupāda

अनुवाद—हरिनामाचा जप करणाऱ्या भक्ताला सर्व लाभ मिळतात, परंतु एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी. जर तुम्ही जप करणार असाल, तर तुम्हाला आधी त्याचे उच्चारण कानाने ऐकावे लागेल. पवित्र हरिनामाच्या आराधनेच्या माध्यमाने आत्मा सर्व सिद्धी प्राप्त करू शकतो.

ज्याप्रकारे या भौतिक जगातील कोणतेही काम नीट न ऐकल्यास बिघडते, त्याचप्रकारे भगवंतांचे पवित्र नाम आपण कानाने न ऐकल्यास ते कसे प्रभाव टाकू शकेल?

राम नाम की औषधि, जो श्रद्धा से खाय।
कोई रोग आवे नहीं, महारोग मिट जाय॥

अनुवाद—भगवंतांच्या पवित्र 'राम' नामरूपी औषधाचे जो मनुष्य श्रद्धेने सेवन करतो, त्याला कोणताही शारिरीक अथवा मानसिक रोग बाधत नाही, पूर्वी उत्पन्न झालेला मोठा असाध्य रोगही सहजच नाहीसा होतो.

कलियुगात केवळ हरिनामाच्या जप तथा कीर्तनाद्वारेच वैकुंठाची प्राप्ती होते. दुसरे कोणतेही साधन करण्याची गरज नाही. भगवंतांना प्राप्त करण्याचा किती सोपा आणि सहज मार्ग आहे, पण भाग्यहीन (कपाळकरंटा) माणूस तरीही हरिनामाचा जप करत नाही. तो झोपलेला राहतो आणि जेव्हा मृत्यू समीप येतो, तेव्हा पश्चात्ताप करतो. भगवान प्रत्येक जीवाच्या हृदयात परमात्म्याच्या रूपात विराजमान आहेत, पण हे ज्ञान फक्त खरा साधूच देऊ शकतो. तोच योग्य मार्ग दाखवू शकतो. म्हणूनच शास्त्र म्हणते की एका क्षणाचा साधुसंगही मानवाचे जीवन बदलून टाकतो, पण हा संग फक्त त्या सुकृतीशील मानवाला मिळतो ज्याने जाणून-बुजून किंवा नकळत कधीतरी एखाद्या साधूची सेवा केली असेल. साधुसेवेच्या अभावी खरा सत्संग मिळणे अशक्य आहे.

अनेक वेळा माणूस साधूच्या प्रती द्वेषाची भावना बाळगतो, त्याचे दोष पाहतो आणि अपराध करतो. परिणामी त्याचे पतन होऊ लागते आणि तो आणखी खोल दलदलीत फसत जातो. अशा

माणसाला चौऱ्याऐंशी लाख योन्या किती वेळा भोगाव्या लागतील, याचा अंदाज लावणेही कठीण आहे.

या सर्व दुःखांतून आणि संकटांतून सुटण्याचा जर काही उपाय असेल, तर तो म्हणजे श्रीहरिनाम. श्रीहरिनामाचा जप करा! श्रीहरिनामाचा जप करा! श्रीहरिनामाचा जप करा! आणि कानाने ऐकत रहा! हे देखील फक्त कलियुगातच होऊ शकते. जेव्हा आपण दररोज एक लाख हरिनाम करू :—

हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥

मुखाद्वारे उच्चारण करू आणि कानाने ऐकू, तेव्हा आपल्याकडून जी काही पापकर्मे झाली आहेत किंवा होत आहेत, ती सर्व जळून भस्मसात होतील. हरिनामरूपी प्रचंड अग्नी त्या सर्व पापकर्मांना जाळून राख करेल. जेव्हा आपली पापकर्मे संपतील, तेव्हा आपले मन हळूहळू भौतिक जगापासून दूर होईल आणि आपल्या अनन्य भगवंतांच्या चरणकमळाशी संलग्न होईल. जेव्हा आपले मन हरिनामात लागेल, तेव्हा अष्ट-सात्त्विक विकार (अश्रू, रोमांच इत्यादी) उदय होऊ लागतील आणि एक मस्ती अथवा मादकता अंतःकरणात प्रकट होऊ लागेल. मन निश्चिंत होईल. हृदयात आनंदाच्या लाटा उठू लागतील.

पण जर एखाद्या वैष्णवाच्या चरणी अपराध झाला किंवा एखाद्या खऱ्या साधूप्रती दोषदृष्टी झाली, तर केलेले सर्वकाही मातीत मिळून जाईल (अर्थात् निरर्थक ठरेल). म्हणूनच सावधगिरी बाळगणे खूप गरजेची आहे. या अपराधापासून वाचण्याचा एक मार्ग हा आहे की कोणाचेही गुण किंवा दोष पाहू नका, किंवा ऐकूसुद्धा नका, आपल्या हरिनामाच्या जपात मग्न रहा, तेव्हाच मानव-जीवन सफल होईल. अशाप्रकारे आवागमनाच्या फेऱ्यातून सुटका मिळून भगवंताच्या चरणांची प्राप्ती होईल. प्रभूंच्या प्रेमाचा मार्ग तलवारीच्या तीक्ष्ण धारेसारखा तळपदार आहे. या मार्गावर फुंकून-फुंकून (अर्थात् नीट चाचपून व परीक्षा करून) मागचे पाऊल पुढे ठेवावे लागते. थोडासा निष्काळजीपणा झाल्यास पायात खोलवर काटा शिरू शकतो.

जरा विचार करा की आपला पुढील जन्म भारतातच होईल की नाही? तसेच सौभाग्याने भारतात जरी परत जन्म झाला तरी

तो जन्म सत्य, त्रेता अथवा द्वापर युगात होऊ शकतो. अशा धन्य कलियुगात ज्यात फक्त हरिनामानेच भगवंतांची प्राप्ती होऊ शकते, मनुष्य-जन्म मिळेल की नाही, हे अजिबात सांगता येत नाही. मग परत असा सत्संग, अशी सुवर्णसंधी मिळेल की नाही, याची अजिबात हमी नाही. आता शरीर निरोगी आहे, हरिनामाचा जप केला जाऊ शकतो. पुढे जाऊन हे शरीर निरोगी राहील की नाही, हे सुद्धा निश्चित नाही. अशा अनेक गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. आता ही जी सुवर्णसंधी मिळाली आहे, ती मोठ्या सौभाग्याने मिळाली आहे. कोट्यवधी जन्मांच्या पुण्याईच्या फळाने हे मनुष्य जीवन प्राप्त झाले आहे, जे दुर्लभच नाही तर सुदुर्लभ आहे. खूप कष्टाने मिळाले आहे हे मानवी जीवन! म्हणूनच ते असेच वाया घालवू नका. जोपर्यंत जीवन आहे (शरीरात प्राण आहे), हरिनामाचा जप करा! हरिनामाचा जप करा! हरिनामाचा जप करा! जो वेळ बाकी राहिला आहे, तो हरिनामात घालवणेच शुभ असेल. माझे श्रील गुरुदेव वारंवार ही गोष्ट समजावून सांगत आहेत. आताही समजावून सांगत आहेत. ही गोष्ट समजून घेणेच श्रेयस्कर असेल. आता शरीर निरोगी आहे, नंतर कोणताही रोग जडू शकतो. मग हरिनामाचा जप होईल की नाही, कोणाला माहीत? म्हणूनच आत्तापासूनच हरिनामाचा जप करू लागणे खूपच गरजेचे आहे. हरिनामाच्या जपाने सर्व संकटे, सर्व कष्ट दूर होऊन जातील. वैष्णव-अपराधापासून स्वतःला वाचवून हरिनामाचा जप करत रहा, सर्वकाही ठीक होत जाईल.

हे युग कलि-महाराजांचे युग आहे. या युगात सर्व कामे कल-पुर्जे आणि मशीनद्वारे चालतात. ['कल-पुर्जा' हा शब्द यंत्रसामग्रीशी संबंधित आहे. 'कल' म्हणजे यंत्राचा मुख्य भाग, जसे की गिअर किंवा चक्र; तर 'पुर्जा' म्हणजे त्या यंत्राचा छोटा घटक, जसे की स्क्रू, नट-बोल्ट इत्यादी.] या वेळी लक्ष्मीचा प्रभाव आहे. सर्वजण पैशाच्या मागे वेडे आहेत. पैशासाठी सर्वकाही होत आहे. पण लक्षात ठेवा, जिथे लक्ष्मीदेवी एकट्याच येतात, तिथे श्रीविष्णू येत नाहीत. परंतु जिथे विष्णूंची पूजा होते, तिथे लक्ष्मीदेवी आपोआप खेचल्या जातात. जिथे लक्ष्मीदेवी एकट्या येतात, तिथे अनाचार होत राहतो. चंचला-लक्ष्मीदेवींचे वाहन घुबड आहे. घुबडाची सवय दुःखदायक असते. चंचला-लक्ष्मीदेवी लक्ष्मीवानाला

(धनवान माणसाला) घुबड बनवून ठेवतात. पण श्रीविष्णूंचे वाहन पक्षीराज गरुड आहेत, जे शुभ बुद्धी देतात. लक्ष्मीदेवींच्या मागे वेडा झालेला माणूस, प्रत्येक वेळी आणखी लक्ष्मी (धन) गोळा करण्यात गुंतलेला असतो. तो खाण्याच्या वस्तूंमध्ये भेसळ करतो. त्या वस्तू खाल्ल्याने कोणी मरो किंवा जगो, त्याला काहीही फरक पडत नाही. त्याचे काम फक्त पैसे कमावणे असते. तो हे विसरतो की जे विष तो इतर लोकांना खाऊ घालत आहे, तेच विष एक दिवस त्याचा बट्ट्याबोळ करेल. सर्वनाश करेल. पण डोळे असूनही, तो आंधळा बनतो आणि काही दिवसांच्या खोट्या आनंदासाठी, खोट्या दिखाव्यासाठी, खोट्या सुखासाठी, त्याला खूप मोठी किंमत मोजावी लागेल. त्या वेळी तो डोके आपटून पश्चात्ताप करेल आणि तेव्हा त्याला कोणीही वाचवू शकणार नाही. त्याची जी दुर्दशा होईल, ती त्याला नंतरच कळेल. म्हणूनच माझे गुरुदेव, वारंवार आपल्या सर्वांना सावध करत आहेत, जागे करत आहेत, समजावून सांगत आहेत. आता तरी जागे व्हा. आजपासून नाही, आत्तापासून हरिनामाचा जप करणे सुरू करा. आत्ताच भगवंतांना शरणागत व्हा. ते दयाळू प्रभू तुम्हाला नक्कीच क्षमा करतील, अन्यथा जे दुःख, जे कष्ट तुम्हाला भोगावे लागेल, ते तुमच्याकडून सहन होणार नाही.

श्रील गुरुदेव उद्घोष (जोरदार घोषणा) करत आहेत की साधकांनी आपल्या हृदयात खोलवर डोकावून विचार करावा की त्यांना याच जन्मात भगवंताची प्राप्ती करायची आहे की मग चौऱ्याऐंशी लाख योन्यांमध्ये जाऊन वारंवार दुःख भोगायचे आहे. प्रत्येक योनीत जन्म घेणे आणि मरणे खूप दुःखदायक आहे. प्रत्येक योनीत आयुष्यमानही (जीवनाची अवधी) वेगवेगळे आहे. कोणत्यातरी योनीत जीव एक दिवसच जगतो आणि कोणत्यातरी योनीत हजारो वर्षांपर्यंत मरण येत नाही. जर सरासरी एक वर्ष प्रत्येक योनीत घालवावे लागले तरी चौऱ्याऐंशी लाख वर्षांपर्यंत आपल्याला दुःखे सहन करावी लागतील. ही तर झाली शुद्धीकरणाची (purification) गोष्ट. याव्यतिरिक्त जो जीवांची हत्या करतो, दुसऱ्यांना त्रास देतो, त्या पापांची परतफेड करण्यासाठी विविध प्रकारची शरीरे धारण करावी लागतील. ज्या प्राण्यांची पूर्वी हत्या केली, त्यांच्या योनीत जावे लागेल आणि भोग भोगावे

लागतील. (उदाहरणार्थ बकरीची हत्या केली असेल, तर बकरी बनून राहावे लागेल.) आता जरा विचार करा की मानवाच्या दुःखांना कोणताही अंत नाही. त्याच्या कष्टांना कोणतीही मर्यादा नाही. भगवान श्रीकृष्णांनी गीतेत या भौतिक जगाला दुःखांचे घर (दुःखालय) म्हटले आहे.

मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्।
नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः॥

(श्रीमद्भगवद्गीता ८.१५)

अनुवाद—महात्मागण मला प्राप्त करून पुन्हा दुःखाचा आश्रयस्वरूप अनित्य जन्म ग्रहण करीत नाहीत, कारण ते परम सिद्धीला प्राप्त झाले आहेत.

हे नश्वर जग जन्म, म्हातारपण आणि मृत्यूच्या क्लेशांनी भरलेले आहे. या जगातील सर्व लोक, म्हणजेच सर्वात वरच्या सत्यलोकापासून सर्वात खालच्या 'रसातळ' या लोकापर्यंत, दुःखांची घरे आहेत, जिथे जन्म-मृत्यूचे चक्र सुरू राहते. परंतु हे कुंतीपुत्रा अर्जुना! जो माझ्या धामास प्राप्त करतो, तो पुन्हा कधीही जन्म घेत नाही.

आब्रह्ममुवनाल्लोका पुनरावर्तिनोऽर्जुन।
मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते॥

(श्रीमद्भगवद्गीता ८.१६)

अनुवाद—हे अर्जुन! ब्रह्मलोकपर्यंत समस्त लोक पुनरावर्त्तनशील आहेत, परंतु मला प्राप्त होऊन पुनर्जन्म होत नाही.

तात्पर्य—ब्रह्मदेवांच्या सत्यलोकापर्यंत सर्व लोकांतील जीवांना पुनर्जन्म भोगावा लागतो. मात्र भगवंताचे भक्त या चक्रातून मुक्त होतात.

या दुःखांनी भरलेल्या जगातून वाचण्याचा एकच उपाय आहे की मानवाने, हरिनामाला शरण जावे. फक्त हरिनामच त्याला परम आनंद प्रदान करू शकतो. या कलियुगात याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाहीच.

हरेर्नाम हरेर्नाम हरेर्नामेव केवलम।
कलौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा॥

अनुवाद—या भीषण कलियुगात फक्त हरिनामाच्या जप तथा कीर्तनानेच, हरिनामाच्या जप तथा कीर्तनानेच, हरिनामाच्या जप तथा

कीर्तनानेच भगवंतांची कृपा आणि दर्शन प्राप्त होऊ शकते. त्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही, नाही, नाही.

म्हणूनच वारंवार 'हरे कृष्ण' महामंत्र, जो या कलियुगाचा महामंत्र आहे, त्याचा जप व कीर्तन करण्याची प्रार्थना केली जाते. या महामंत्राच्या जपासाठी कोणताही नियम नाही. उठता-बसता, चालता-फिरता, जेव्हा इच्छा होईल, जशी इच्छा होईल, तसा हा जप करत राहा. अशाप्रकारे सराव करत-करत, मरताना हेच नाम जिभेवर येईल. अंतसमयी भगवंतांचे नाम मुखातून निघाल्यावर सर्व दुःखांचा कायमचा अंत होईल आणि माणूस अशा सुखसागराचा आनंद घेईल, जिथे दुःखाची सावलीही नाही. जर मरताना या भौतिक जगाची आठवण राहिली, तर या भौतिक जगात वारंवार यावे लागेल. जर अंतसमयी (प्राणोत्क्रमण होताना) भगवंतांचे नाम आठवले, तर भगवंतांची प्राप्ती होईल. हे सुनिश्चित आहे. भगवान श्रीकृष्ण म्हणतातः—

यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम।
तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावमभावितः॥

(श्रीमद्भगवद्गीता ८.६)

अनुवाद—हे कुंतीपुत्रा अर्जुना! शरीर त्याग करताना मनुष्य ज्या ज्या भावनेचे स्मरण करतो, तो त्या त्या भावनेला निश्चितपणे प्राप्त होतो.

तात्पर्य—ज्याप्रमाणे मृत्युकाळी भगवंतांचे स्मरण केल्याने भगवत्भावनेची प्राप्ती होते, त्याचप्रमाणे इतर वस्तूंच्या किंवा जीवांच्या स्मरणानेही त्याच स्वरूपाची भावना प्राप्त होतो. जसे महाराज भरत यांनी मृत्युकाळी एका मृग-शावकाचा (हरिणाच्या पाडसाचा) विचार केला, त्यामुळे पुढच्या जन्मात त्यांना हरिणाचे शरीर प्राप्त झाले. म्हणूनच मृत्युकाळी इतर विषयांचे स्मरण होऊ नये, केवळ भगवंतांचेच स्मरण व्हावे, यासाठी प्रयत्न करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

आपल्या जीवनाच्या शेवटी, आपल्या मुखातून भगवंताचे नाम निघावे, यासाठीः—

हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥

या महामंत्राचा जप करणे सर्वश्रेष्ठ आहे. भगवंतांनी सर्व प्राण्यांना शरीराच्या रूपात धर्मशाळा दिली आहे. प्रत्येक जीवात्मा हा भगवंतांचाच पुत्र आहे. प्रत्येक जीवाच्या शरीराचा आकारही वेगळा आहे. कोणी लांब किंवा उंच असतो, कोणी रुंद किंवा जाडा असतो, कोणी गोल-मटोल, कोणी लहान, कोणी मोठा इत्यादी. सापाचे शरीर लांब असते, कासवाचे शरीर गोल असते, हत्तीचे शरीर जाडे, मोठे, लांब व रुंद (विस्तीर्ण) असते. पण ही सर्व प्रकारची भौतिक शरीरे नाशवंत आहेत. मानवी शरीराची रचना भगवंतांसारखी आहे, परंतु ते पाच तत्त्वांनी अर्थात् पृथ्वी, आकाश, वायू, जल (पाणी) व अग्नी (आग) यांनी बनलेले आहे, ज्यात जीव आणि परमात्मा दोन्ही सोबत राहतात. जीव अज्ञान-प्रधान आहे आणि परमात्मा ज्ञान-प्रधान आहे. जीव मायेत लिप्त राहतो म्हणून बंधनात अडकलेला आहे. परमात्मा चिन्मय आहे, त्यात दिव्यशक्ती आहे. परमात्मा निर्लिप्त आणि नित्यमुक्त आहे.

भगवंतांनी म्हटले आहे की, "हे मानवा! मी तुला बुद्धी दिली आहे, म्हणून चौऱ्याऐंशी लाख योनींच्या जीवांचे, जे माझे पुत्र आहेत, त्यांचे भरण-पोषण कर! त्यांचे रक्षण कर. त्या सर्व जीवांमध्ये मला पहा! जर तू असे न करता, त्यांना त्रास दिलास तर तुला कधीही सुख मिळणार नाही. कधीही शांती मिळणार नाही. प्रत्येक जीवाची एक आयुमर्यादा ठरलेली असते, जर ही मर्यादा संपल्यानंतर त्या शरीराचा अंत झाला तर कोणालाही कोणताही दोष लागत नाही, पण जर माणूस या शरीरांचे आयुष्य पूर्ण होण्याआधीच त्यांना नष्ट करतो, तर तो पापाचा भागीदार बनतो आणि अशी असंख्य पापकर्मे माणूस आपल्या आयुष्यात करतो. म्हणूनच त्याच्या दुःखांना अंत नसतो."

हा माणूस जेव्हापासून भगवंतांच्या कुशीतून वेगळा झाला आहे, अनंत-कोटी कल्पे उलटूनही तो पुन्हा भगवंतांच्या कुशीत परत जाऊ शकला नाही. भगवंतांकडे जाण्याचा मार्ग त्याला कोणीही सांगितला नाही. भगवंतांकडे जाण्याचा योग्य मार्ग कोणताही खरा साधू, कोणताही भगवंताचा प्रेमी साधूच सांगू शकतो. माझे गुरुदेव या गोष्टीची शंभर टक्के (१००%) हमी देतात की जो साधक हरिनामाच्या चौसष्ट माळा (एक लाख हरिनाम) दररोज उच्चारणपूर्वक करेल आणि कानाने ऐकेल, तर मृत्यूच्या वेळी त्याला स्वतः

भगवान घ्यायला येतील. जपमाळेवर संख्या पूर्ण करा आणि चालता-फिरता, खाता-पिता, झोपता-जागता, जपमाळेशिवायही हरिनामाचा जप करत रहा. अशा परम-भक्ताचे भगवंतांच्या धामात भव्य स्वागत होते आणि भगवान त्याच्या इच्छेनुसार त्याला आपली सेवा प्रदान करतात, जिथे तो कायमचा परमानंदात निमग्न होतो.

* * *

वैष्णव उत्तम सेइ याहारे देखिले।
कृष्णनाम आसे मुखे कृष्णभक्ति मिले॥

(श्रीहरिनाम चिंतामणी)

अनुवाद—ज्या श्रेष्ठ वैष्णवाच्या केवळ दर्शनानेच जीवांच्या मुखातून श्रीकृष्णनाम प्रकट होते आणि जीवांना श्रीकृष्णांची भक्ती प्राप्त होते, तोच **उत्तम वैष्णव** आहे.

* * *

॥ श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः ॥

(४)

छींडची ढाणी
दिनांक—२८/१२/२००६

श्रीगुरुदेवांनी सांगितलेले हरिनामाचा जप करण्याचे सोपे साधन

एकदा मी श्रीगुरुदेवांना विचारले—'हरिनामाचा जप कसा करावा?' त्यावर उत्तर मिळालेः 'ज्याप्रमाणे तुम्ही सत्संग किंवा कोणतीही चर्चा लक्षपूर्वक ऐकता, त्याचप्रमाणे हरिनाम ऐका. कारण ऐकल्यानेच कोणतीही गोष्ट हृदयात ठसते, हृदयात अंकित होते. मग ती गोष्ट हृदयातून बुद्धीत येते; बुद्धी तिचा निर्णय घेते. निर्णय झाल्यावर ती स्थूल शरीराच्या इंद्रियांपर्यंत पोहोचते. इंद्रिये त्या कार्याला आरंभ करतात, आणि इंद्रियांद्वारे ते कार्य केल्यावर ते सफल होते. आता हेच तत्व हरिनामावर आजमावून पाहा.'

श्रीगुरुदेवांच्या श्रीमुखातून हरिनाम कानाद्वारे ऐकले, तेव्हा ते हृदयात बसले. हृदयातून बुद्धीत गेले. बुद्धीने निर्णय घेतला की हरिनामाचा जप केल्याने दुःखाचे निवारण आणि सुखाचा प्रादुर्भाव होईल. तेव्हा जप करणारा माळ हातामध्ये घेईल (हात एक कर्मेंद्रिय आहे). जीभ हरिनामाचा जप सुरू करेल. मन हरिनामाला पकडेल. कान हरिनाम ऐकण्याचा प्रयत्न करेल. पण मन कंटाळेल, ऐकण्याची इच्छा करणार नाही, कारण अजून त्यात आनंद येत नाही आहे. हळूहळू काही दिवसांनी जेव्हा हरिनामाच्या जपात आनंद येऊ लागेल, तेव्हा मन कुठेही जाणार नाही, हरिनामात रुची निर्माण होईल. सराव हळूहळू वाढवावा. भगवंतांनी अर्जुनांना सराव (अभ्यास) करण्यास सांगितले आहे. हरिनामात मन न लागल्याने पुण्य मिळेल अर्थात् नित्य-सुकृती होईल, भगवद्-प्रेमाची प्राप्ती मात्र होणार नाही. ही नित्य-सुकृती (पुण्य) पुढील जन्मी सद्गुरु प्राप्त करून देईल.

श्रीजींचे पत्र आले होते. त्यात एक पद्य-रचना होती. त्यात श्रीकृष्णांच्या बालपणातील सर्व लीलांचे वर्णन केले होते. भक्तवराने लिहिले होते, जर अनधिकृत प्रयत्न केला गेला असेल तर पत्र फाडून फेकून द्या. आपण त्यांना सांगून द्या की भगवंतांविषयी जे

काही लिहिले जाते, ते भगवंतांना प्रिय असते. जर कोणी त्याला अनधिकृत प्रयत्न मानतो, तर तो घोर अपराधी आहे. हे लिहिणारा माझा प्राण-प्रिय आहे. ते फाडल्याने तर मी मायावी होईन अर्थात् भगवंतांच्या बहिरंगा माया-शक्तिद्वारे मोहित झालेला मनुष्य ठरेन. अपराधी बनेन. आपण त्यांना याबद्दल माझे मत सांगण्याची कृपा करा.

जपमाळ अलौकिक वस्तू आहे

श्रील गुरुदेव जपमाळेद्वारे जीवाला भगवंताशी जोडतात. ज्याप्रकारे विवाहाच्या वेळी ब्राह्मणदेव पती-पत्नीचे परस्पर पवित्र नाते जोडतात म्हणजेच पत्नीला तिच्या पतीच्या हवाली करतात आणि ती आयुष्यभर आपल्या पतीच्या सेवेत मग्न राहते. त्याचप्रकारे श्रीगुरुदेव जपमाळेद्वारे जीवाला भगवंतांच्या हवाली करतात जेणेकरून जीव पूर्ण जीवन भगवंतांच्या सेवेत, त्यांच्या नाम-स्मरणात घालवेल. श्रील गुरुदेवांच्या अहैतुकी कृपेने जीवात्मा, मायेच्या माहेरून भगवंतांच्या चरणाश्रय-स्वरूप सासूरवाडीत आपले जीवन घालवण्यासाठी कायमचे निघून जातो आणि भगवंतांच्या रूपात असलेल्या पतीच्या (परमात्माच्या) सेवेत मग्न राहतो.

ज्या जपमाळेचे इतके महत्त्व आहे, ती काही साधारण वस्तू असू शकत नाही! ती मोठ्या काळजीने ठेवण्यासंबंधी आणि त्यावर जप करण्यासंबंधी काही गोष्टी सर्वांनी लक्षात ठेवल्या पाहिजेत. याबद्दल अखिल-भारतीय श्रीचैतन्य गौडीय मठाचे सध्याचे (वर्तमान) आचार्य ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत श्रीश्रीमद्भक्तिवल्लभ तीर्थ गोस्वामी महाराजांनी म्हटले आहे की—"जपमाळ टांगून ठेवू नये आणि खिशात, विशेषतः खालच्या खिशात म्हणजेच पॅन्ट इत्यादीच्या खिशात ठेवू नये. प्रवासाच्या वेळी किंवा बाहेरच्या दौऱ्याच्या कार्यक्रमात, ती विशेषतः गळयात लटकवून ठेवावी."

माळेसंबंधी काही महत्त्वाच्या गोष्टी ज्या सर्वांनी लक्षात ठेवल्या पाहिजेत, त्या खालीलप्रमाणे आहेत—

(१) जेव्हाही हरिनाम करण्यासाठी, भगवंतांच्या नावाचे स्मरण करण्यासाठी हातात जपमाळ घ्याल, तेव्हा जपमाळेला डोके झुकवून नमस्कार करा आणि त्यानंतर तिला हृदयाशी लावा. नंतर कुरवाळून आपली आध्यात्मिक आई असलेल्या मातृस्वरूप तुळशी-माळेच्या

चरणांचे प्रेमाने चुंबन घ्या. असे केल्याने तुम्ही पाहाल की जपमाळेचा सर्वोच्च सुमेरू-मणी आपोआपच हरिनाम करणाऱ्याला आठवण करून देण्यासाठी हातात येईल. जपमाळेचा सुमेरू-मणी शोधावा लागणार नाही. जपमाळ काही निर्जीव वस्तू नाही आहे, ती एक अलौकिक वस्तू आहे, भगवंताची प्रिय आहे. तुळशीशिवाय भगवान कोणतीही वस्तू स्वीकारत नाहीत.

(२) जेव्हा एक माळ पूर्ण होईल म्हणजेच १०८ मण्यांवर हरिनामाचा जप पूर्ण होईल, तेव्हा पुन्हा जपमाळेला नमस्कार करा, मग पुढील माळ सुरू करून १०८ मण्यांवर हरिनाम करा. तुळशीची जपमाळ भक्ताच्या गळ्याचा हार असते. जसे आपण सोन्याचा किंवा हिऱ्याचा हार गळ्यातून काढत नाही, त्याचप्रकारे तुळशीची माळही गळ्यात लटकवून ठेवली पाहिजे.

जेव्हा तुम्ही हातात माळ घेऊन हरिनामाचा जप करता, तेव्हा लक्षात ठेवा की कोणत्याही वैष्णवाला झुकून नमस्कार करू नका. त्यांना आदरपूर्वक 'हरे कृष्ण', 'राधाकृष्ण', 'जय सीता-राम' असे बोलून नमस्कार करा. हातात जपमाळ घेऊन, झुकून नमस्कार केल्याने जपमाळेचाही नमस्कार होतो, जे पूर्णपणे अयोग्य आहे— कारण जपमाळ श्रील गुरुदेवांच्या आशीर्वादाचा अमूल्य ठेवा आहे. भगवंतांसमोर श्रीगुरुदेवांना नमस्कार केला जाऊ शकतो, पण तोही जपमाळेला स्वतःपासून दूर ठेवून. भगवंतांसमोर श्रीगुरुदेवांना नमस्कार केल्यास श्रीगुरुदेवांच्या हृदयाला पीडादायक ठरेल. श्रीगुरुदेवांना हे कधीही आवडणार नाही की शिष्याने भगवंतांसमोर त्यांना झुकून नमस्कार करावा. भगवंतांच्या समोरून बाजूला होऊन श्रीगुरुदेवांना नमस्कार करणे श्रेयस्कर ठरेल, अन्यथा श्रीगुरुदेवांना नमस्कार न केल्याने अपराध होईल.

(३) माळेवर हरिनामाचा जप करताना, एखाद्या वैष्णव किंवा सत्संगासंबंधी संभाषण करण्यास हरकत नाही, पण संसाराबद्दल बोलल्यास (जागतिक कार्यांवर टीका-टिप्पणी केल्यास) अपराध होईल. जर कोणी व्यक्ती वैष्णव नसेल, तर तिला "जय श्रीकृष्ण" म्हणावे आणि तिच्याशी जागतिक विषयांवर न बोलणेच योग्य ठरेल.

(४) भगवंतांच्या धामात परिक्रमा करताना, जर लघवी आली, तर जपमाळ पूर्ण करून किंवा अर्धवट सोडून, जपमाळ शुद्ध ठिकाणी ठेवून लघवी करणे योग्य आहे. जिथे शक्य असेल

तिथे आपल्याजवळ एका लहान बाटलीत पाणी ठेवावे. लघवी केल्यानंतर हात धुऊन, तोंड धुऊन, पुन्हा जपमाळ हातात घेऊन जप करणेच योग्य आहे. जर माळ अर्धवट राहिली होती, तर ती गणतीत घेऊ नये म्हणजेच जपमाळेवर सुरुवातीपासून जप करावा. अर्धवट केलेल्या माळेचीही अदृश्य रूपात जपात गणना होते.

(५) भगवंताचा प्रसाद घेताना जपमाळ आपल्याजवळ अशाप्रकारे ठेवा की उष्ट्या हाताने तिला स्पर्श होणार नाही. कधीकधी अशा ठिकाणीही प्रसाद घ्यावा लागतो जिथे जपमाळेला स्वतःपासून दूर ठेवणे अडचणीचे ठरू शकते, जसे तुम्ही जपमाळ कुठेतरी ठेवली आणि माकडाने ती उचलून नेली किंवा घाईघाईत जपमाळ तिथेच विसरून गेलात. म्हणून जपमाळ मोठ्या काळजीपूर्वक, सांभाळून ठेवली पाहिजे.

(६) जेव्हा जपमाळेची झोळी (bead bag) मळकी होईल, तेव्हा ती भगवंतांच्या सणाच्या (पर्वाच्या) दिवशी धुणे योग्य आहे. जपमाळेची झोळी शुद्ध ठिकाणीच वाळवावी आणि माकड (वानर) इत्यादींपासून वाचवून ठेवावी. जपमाळ जर हरवली, तर तो मोठा अपराध बनतो. अनेक लोक जपमाळ कुठेही, जसे जेवणाच्या टेबलावर, खाटेवर, अंथरुणावर किंवा सोफ्यावर ठेवतात, असे केल्याने जपमाळेचा अपमान होतो. ज्याप्रकारे तुम्ही तुमच्या मौल्यवान वस्तू (रुपये, पैसे, दागिने इत्यादी) मोठ्या काळजीने आणि सुरक्षित ठेवता, त्याचप्रकारे जपमाळही सांभाळून ठेवली पाहिजे. श्रीगुरुदेवांनी दिलेली जपमाळ हरवल्यास पुन्हा मिळवणे अशक्य होईल. जपमाळ हरवल्यास श्रीगुरुदेवांसोबतचे नाते तुटेल आणि त्यामुळे भजनात खूप मोठा अडथळा निर्माण होईल. जसे सर्वांना आपला जीव (प्राण) प्रिय असतो, त्याचप्रकारे श्रीगुरुदेवांनी दिलेली जपमाळही आपल्याला आपल्या जीवाहून अधिक प्रिय असली पाहिजे. जपमाळेचा असा आदर केल्यानेच भजनामध्ये तीव्रता येईल, अन्यथा भजनात शिथिलता येईल. भजनात मन लागणार नाही.

(७) रात्री झोपताना जपमाळेला नमस्कार करून झोपावे. सकाळी ब्राह्ममुहूर्तावर उठून, दुरूनच जपमाळेला नमस्कार केल्याने भक्तीमध्ये तीव्रता येईल. नमस्कार केल्यानंतर, लघवी करून, हात-पाय आणि तोंड धुऊन, पुन्हा जपमाळेला नमस्कार करून, जपमाळ

हातात घेऊन हरिनामाचा जप सुरू करावा. असे केल्याने हरिनामात मन लागू लागेल. एखाद्या अनोळखी भक्ताला जपमाळेची महिमा सांगितल्यानेही हरिनामात मन लागू लागेल. हाच तर खरा सत्संग आहे, ज्यामुळे भक्तीचा आविर्भाव होतो, भक्ती प्रकट होते. जपमाळेबद्दल जे काही सांगितले आहे, जप करणाऱ्याने त्यास त्रासदायक समजू नये, अन्यथा हरिनामात मन लागणार नाही. संसाराच्या गोष्टींमध्ये आपल्याला त्रास वाटत नाही, पण जिथे आपल्या भल्याची गोष्ट आहे, ज्यात आपले कल्याण आहे, जर अशा गोष्टींना आपण त्रास समजतो, तर ही आपली मूर्खता असेल, अज्ञान असेल.

(८) ज्याप्रकारे जीवात्मा आपले मन नेहमी सोबत ठेवतो, जरी त्याला माहीत आहे की त्याचे हे मन परके आहे, भगवंतांचे आहे, त्याचप्रकारे भक्तानेही जपमाळ हाच विचार करून नेहमी आपल्यासोबत ठेवावी की ही जपमाळ माझ्या श्रीगुरुदेवांनी दिली आहे, ही पण परकी आहे, अर्थात् ही जपमाळ श्रीगुरुदेवांची संपत्ती आहे, माझी नाही. श्रीगुरुदेवांनी दिलेली ही जपमाळच आपल्याला दुःखातून मुक्त करून सुखाच्या मार्गावर घेऊन जाईल. म्हणून तिला आपल्या प्राणांहूनही प्रिय समजून सांभाळून ठेवले पाहिजे.

(९) खरं तर श्रीगुरुदेवांनी आपल्यावर अपरिमित कृपा करून, आपल्याला ही जपमाळ दिली आहे, ही जपमाळ मायेला (भगवंतांच्या मायाशक्तीला) हरवून, तिच्यावर विजय प्राप्त करण्याचे अचूक शस्त्र आहे. हे अचूक शस्त्र श्रीगुरुदेवांनी आपल्याला सोपवले आहे. जर हे शस्त्र स्वतःपासून दूर ठेवले, तर माया कधीही आक्रमण करेल. माया तर आपली मोठी शत्रू आहे. शत्रू तर संधी मिळताच आक्रमण करेल, पण जर आपल्याजवळ, आपल्या संरक्षणासाठी, श्रीगुरुदेवांनी दिलेली जपमाळ असेल, तर माया आपले काहीही बिघडवू शकत नाही. श्रीगुरुदेवांनी जपमाळेच्या रूपात, आपल्याला जे हे अचूक शस्त्र दिले आहे, त्यात हरिनामाची अतुलनीय दिव्यशक्ती सामावलेली आहे. अनंत कोटी ब्रह्मांडांमधील सर्व लोकांमध्ये कोणीही व्यक्ती या दिव्य शक्तीला हरवू (परास्त करू) शकणार नाही. अगदी ब्रह्मांडांची निर्मिती करणारे भगवानसुद्धा जपमाळेच्या शक्तीसमोर नतमस्तक होतात, म्हणजेच आत्मसमर्पण करतात. श्रीगुरुदेवांनी दिलेल्या या जपमाळेवर, जेव्हा साधक

संख्यापूर्वक, कानाने ऐकून, उच्चारणपूर्वक हरिनाम करतो, तेव्हा त्याच्या हृदयात विरहाग्नी प्रज्वलित होते, मग भगवान हतबल होतात आणि त्यांना यावेच लागते.

(१०) ज्याला हे अचूक शस्त्र प्राप्त होते, तो खूप भाग्यवान असतो. अनंत-कोटी ब्रह्मांडांमध्ये भगवानही जिच्यासमोर नतमस्तक होतात, त्या जपमाळेची महिमा अवर्णनीय आहे. भगवान, आई यशोदेंच्या भीतीने थरथर कापतात, रडतात, अगदी भीतीने त्यांनी लघवीही केली होती. ही सर्व त्या लीलाधराची लीला आहे. आपल्या भक्तासाठी ते काय करू शकत नाहीत! श्रीकृष्ण अहीर (गवळी) समाजातील मुलींच्या एक ओंजळीभर ताकासाठी नाचू शकतात. मग त्यांचा प्रिय भक्त भगवंतांना अतिशय प्रिय असणाऱ्या तुळशीच्या माळेच्या मण्यांवर नाम घेऊन प्रेमाने हाक मारेल, तेव्हा ते खेचले जाऊन येणार नाहीत का? त्यांना यावेच लागते—ही त्यांची प्रतिज्ञा आहे.

या संसारात अगणित जीव आहेत. त्यांच्यातही अब्जावधी मनुष्य आहेत. त्या असंख्य मनुष्यांमध्ये किती असे भाग्यवान जीव आहेत ज्यांच्याजवळ श्रीगुरुदेवांनी दिलेले हे अचूक शस्त्र आहे? असे एक शस्त्र जे मायेला हरवून याच जन्मात, जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्त करून भगवंतांच्या धामात—गोलोकधामात घेऊन जाईल.

आजकाल लोक जपमाळेची झोळी गळ्यात लटकवून ठेवताना लाजतात, ती पर्समध्ये किंवा पॅन्टच्या खिशात ठेवतात, हा अपराध आहे. हेच एक कारण आहे की हरिनामाचा जप करणाऱ्या साधकांचे मन भजनात रमत नाही. जेव्हा हरिनामरूपी नावेत साधकाची श्रद्धाच नाही, विश्वासच नाही, तर साधक त्या नावेत बसून भवसागर पार कसा होऊ शकेल? श्रद्धा आणि विश्वासाशिवाय तर तो मध्येच हेलकावे खात राहील. जिथे श्रीगुरुदेवांनी दिलेल्या तुळशीच्या जपमाळेचा सन्मान होत नाही, तिथे हरिनामात रुची होऊच शकत नाही. हरिनामात रुची झाल्याशिवाय काहीही साध्य होणार नाही.

परमाराध्य, पतितपावन, परमकरुणामय ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत श्रीश्रीमद्भक्तिवल्लभ तीर्थ गोस्वामी महाराज, जे सध्या अखिल भारतीय चैतन्य गौडीय मठाचे प्रधानाचार्य आहेत, त्यांना मी

नेहमीच पाहिले आहे की त्यांची जपमाळ नेहमी त्यांच्या गळ्यातच असते. जपमाळेची खरी महिमा तर तेच जाणतात. आपणही त्यांच्याकडून ही शिकवण घेतली पाहिजे.

प्रेमीभक्तांनो! भगवंतांजवळ पोहोचण्यात अगणित अडथळे आहेत जे आपल्या मार्गात येतात. आपण मठ-मंदिरात जातो. तिथेही फक्त निर्जीव दर्शन करतो. भावदर्शन तर एखाद्या विरळ्या व्यक्तीलाच होते. त्याचप्रकारे आपण तीर्थयात्रा किंवा धाम-परिक्रमा करण्यासाठी जातो, पण भावनेशिवाय, फक्त परिश्रम करून परत येतो. तीर्थयात्रा, निर्जीव-भ्रमण बनून राहते आणि आपण तीर्थ-अपराध किंवा धाम-अपराध घेऊन घरी परत येतो. भावदर्शनाशिवाय (प्रीतीपूर्वक दर्शनाशिवाय) सर्वकाही व्यर्थ आहे, मनाचा भ्रम आहे, असे मी नाही, श्रील नरोत्तम दास महाशयांनी सांगितले आहे—

तीर्थयात्रा परिश्रम, केवल मनेर-श्रम,
सर्वसिद्धि गोविंद-चरण।
सुदृढ़ विश्वास करि, मद-मात्सर्य परिहरि,
सदा कर अनन्य-भजन॥
कृष्ण भक्त अंग हेरि, कृष्ण भक्त संग करि,
श्रद्धान्वित श्रवण-कीर्तन।
अर्चन, स्मरण, ध्यान, नवभक्ति महाज्ञान,
एई भक्ति परम कारण॥

(श्रीप्रेमभक्ति-चंद्रिका)

अनेक लोक असे समजतात की तीर्थयात्रा केल्याने पुण्य प्राप्त होते आणि मनोरथ सिद्ध होतात. पण प्रत्यक्षात तीर्थयात्रा म्हणजे केवळ परिश्रम आहे. तीर्थयात्रेने पुण्य मिळते हा केवळ मनाचा भ्रम आहे. वास्तविक सर्व सिद्धी प्रदान करणारी श्रीगोविंदांच्या चरणांची भक्तीच आहे. म्हणून दृढ विश्वासपूर्वक श्रीगोविंदांचे अनन्य भजन करावे. इतर कोणत्याही साधनाने मनोरथांची पूर्ती होईल अशी अपेक्षा ठेवू नये. अज्ञानमय अहंकार आणि इतरांच्या उत्कर्षाचा असहिष्णुतेने स्वीकार न होण्याची प्रवृत्ती —यांचा त्याग करावा. श्रीकृष्ण-भक्तांचे दर्शन करावे आणि त्यांचाच संग करावा. श्रद्धेने श्रीकृष्णांचे नाम, लीला, गुण यांचे श्रवण आणि कीर्तन करावे. श्रीकृष्णांची पूजा, स्मरण आणि ध्यान—हेच वैष्णवांचे

आचरणीय मार्ग आहेत. हेच नवविधा भक्तीचे महत्त्वपूर्ण स्वरूप आहे. या नवविधा भक्तीचे आचरणच प्रेमभक्तीचे प्रमुख कारण होय.

* * *

हे हरी! मी अगणित अपराधांनी ग्रस्त आहे, भयंकर संसाररूपी समुद्रात हेलकावे खात आहे आणि पूर्णपणे निराश्रित आहे. म्हणून आपल्या चरणी शरण येत आहे. आपण आपल्या अनेक गुणांपैकी फक्त एक गुण अर्थात् 'कृपे'द्वारे मला आपले बनवावे म्हणजेच मला आपला दास म्हणून स्वीकार करावे.

* * *

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

(५)

छींडची ढाणी
दिनांक—१६/०७/२००७

श्रीहरिनामाचे स्मरण अंतःकरणातून होवो

फोनवर जास्त भक्तीबद्दल चर्चा होऊ शकत नाही, म्हणून पत्राद्वारेच तुमच्याकडून आशीर्वाद घेतला जाऊ शकतो. म्हणून माझ्यावर कृपा करत रहावी. माझे चातुर्मासात आपल्या चरणी येणे अशक्य वाटते. घरचे लोक पाठवून आनंदी नाहीत; मीही जबरदस्तीने येऊ इच्छित नाही कारण मी अपराध करण्यास घाबरत राहतो. इथेही माझे भजन आपल्या सर्वांच्या कृपेने व्यवस्थितपणे चालत राहते. जसे ठाकूर (भगवंत) प्रेरित करतील, मी पत्रांद्वारे तुम्हाला सांगत राहीन. माझा आनंद तर यातच आहे की आपल्या सर्वांचे हरिनाम प्रेमासह होत राहो, अन्यथा जीवन लवकरच खाईत जात आहे. सर्व सुख-सुविधा असूनही जर हरिनाम होत नाही, तर जीवनात यासारखे दुसरे कोणतेही नुकसान नाही. पण हे सर्व नाम-जप करणाऱ्यांच्या कृपेनेच शक्य होईल. स्वतःच्या सामर्थ्याने काहीही होणार नाही. आपल्या गुरु-वर्गात नाम-जप करणारे जास्त आहेत. ज्यालाही प्रार्थना कराल, नामाचा आशीर्वाद मिळेलच. शिव (महादेव शंकर), उमा महाराणींना (पार्वती देवींना) माध्यम बनवून जीवांना खरा मार्ग सांगत आहेत की—

"कलियुग केवल नाम अधारा।
सुमिर सुमिर नर उतरहिं पारा॥"

अनुवाद—कलियुगात केवळ भगवंतांच्या नामाचा आश्रयच बद्ध-जीवांचा आधार आणि उद्धाराचा उपाय आहे. भगवंतांच्या नामाचा वारंवार उच्चारणपूर्वक जप आणि कीर्तन केल्याने जीव भवसागरातून पार होतो.

'सुमिर-सुमिर (स्मरण करीत करीत)' हे दोनदा का म्हटले आहे? याचे उद्देश आहे की चालता-फिरता, झोपता-जागता, खाता-पिता, जांभई देता, शिंकता-खोकता प्रत्येक वेळी हरिनामाचे मुखातून उच्चारण झाल्याने पुण्य मिळते अर्थात् नित्य-सुकृती प्राप्त होते. जसे

या जगात पाहिल मिळते की लोक एकमेकांना भेटल्यावर म्हणतात —"बंधू राम-राम!" "राधा-गोविंद!" "जय श्री राधे!" इत्यादी. याचे उद्देश हे आहे की कोणत्याही प्रकारे मुखातून हरिनामाचे उच्चारण होवो. असे झाल्यास नित्य-सुकृती जमा होऊन जन्म-जन्मांतरी कधीतरी दुःखाच्या सागरातून, येण्या-जाण्याच्या (आवागमनाच्या) फेऱ्यातून, जन्म-मृत्यूतून बद्ध-जीवाला सुटका मिळेल. मी हे म्हणत नाही, धर्म-शास्त्रांमध्ये लिहिलेले आहे—

(१)

"भायँ कुभायँ अनख आलसहूँ।
नाम जपत मंगल दिसि दसहूँ॥"

अर्थ—चांगल्या भावनेने (प्रेमाने), वाईट भावनेने (वैराने), क्रोधाने किंवा आळसाने, कोणत्याही प्रकारे भगवंतांच्या नावाचा जप केल्याने दहाही दिशांमध्ये कल्याण होते. [दहा दिशा आहेत—पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, ईशान्य, आग्नेय, वायव्य, नैर्ऋत्य, ऊर्ध्व (वरची) व अधो (खालची).]

(२)

"जाना चहहिं गूढ़ गति जेऊ।
नाम जीहँ जपि जानहिं तेऊ॥"

अर्थ—जे परमात्म्याचे गूढ रहस्य (खरे महत्त्व) जाणून घेऊ इच्छितात, ते (जिज्ञासू लोक) देखील हरिनामाचा जिभेने उच्चारणपूर्वक जप करून ते जाणून घेऊ शकतात.

(३)

"कृतजुग त्रेताँ, द्वापर पूजा मख अरु जोग।
जो गति होइ सो कलि, हरि नाम से पावहिं लोग॥"

अर्थ—सत्ययुग, त्रेता आणि द्वापर युगांमध्ये जी गती पूजा, यज्ञ आणि अष्टांग-योगाद्वारे प्राप्त होते, तीच गती कलियुगात लोक फक्त भगवंतांच्या नामाने प्राप्त करतात.

(४)

"चहुँ जुग तीन काल तिंहु लोका।
भये नाम जप जीव बिसोका॥"

अर्थ—चारही युगांमध्ये (सत्य, त्रेता, द्वापर आणि कलियुग), तिन्ही काळांमध्ये (भूत, वर्तमान आणि भविष्य), आणि तिन्ही लोकांमध्ये (उर्ध्वलोक, मध्यलोक आणि अधोलोक), भगवान श्रीरामांच्या पवित्र नामाचा जप करून जीव शोकमुक्त झाले आहेत.

(५)

"चहुँ जुग चहुँ श्रुति नाम प्रभाऊ।
कलि विशेष नहीं आन उपाऊ॥"

अर्थ—खरे तर चारही युगांमध्ये आणि चारही वेदांमध्ये हरिनामाचा प्रभाव आहे, परंतु कलियुगात विशेष रूपाने आहे. यात तर (हरिनामाला सोडून) दुसरा कोणताही उपायच नाही.

किती उदाहरणे देऊन समजावून सांगू, अंत नाही. म्हणून जो कोणी हरिनामाचा जीवनात आधार घेईल, तोच या जीवनात सुख-सागरात पोहचेल. श्रीगुरुवर्गाने फक्त १६ माळांचा नियम यासाठीच बनवला आहे की तो जप करणाऱ्यावर जास्त भार बनू नये. भार वाटल्यास साधक जप सोडूनही देऊ शकतो. पण दोन-चार वर्षांनंतर तर एक लाख हरिनाम म्हणजेच ६४ माळांचा नियम घेतलाच पाहिजे, जर याच जन्मात अर्थ, धर्म, काम व मोक्ष यांची प्राप्ती करायची असेल किंवा सुखी जीवन जगायचे असेल तर. पुन्हा मनुष्य जन्म मिळणे अशक्यच आहे. सर्वजण म्हणत राहतात की "अमुक सेवा करत आहोत, म्हणून जास्त हरिनामाचा जप करण्यासाठी वेळ मिळतच नाही." मग मी म्हणतो की सेवेने तर भक्ती मिळालीच पाहिजे कारण सेवेचा उद्देश भक्ती आहे. जर भक्ती (सेवा) खरी (वास्तविक) आहे, तर भगवंतांशी जोडले गेले पाहिजे. जेव्हा जोडले जाल, तेव्हा भगवंतांवर प्रेम तर होईलच. जेव्हा प्रेम होईल, तेव्हा शरणागतीची भावना येईलच. जर शरणागतीची भावना येईल, तर विरहाग्नी प्रकट होणे अत्यंत आवश्यक आहे. पण असे दिसत नाही. हे सर्व तेव्हाच होईल, जेव्हा भौतिक जगातून प्रेम हटेल. फक्त बोलल्याने काही होत नाही की 'सेवा करत आहोत.' फक्त बुद्धीच म्हणत आहे, हृदयातून आचरण झालेच नाही. अंतःकरणाने हे स्वीकारलेच नाही. बोलता-बोलता पूर्ण आयुष्य निघून गेले की जर भगवंतांची सेवा होत आहे, तर सेवेचे फळ म्हणजेच भगवंतांवर प्रेम झालेच पाहिजे. जर नाही, तर सेवा फक्त

दिखावा आहे. कठपुतळीचा नाच आहे. जरा खोलवर विचार करा. तुम्ही धोक्यात आहात. वास्तविकता खूप दूर आहे. हरिनाम-संख्या, एक लाखावरून तीन लाख करावी लागेल. श्रीगौरहरींनी एक लाख हरिनामाचा दररोज जप करण्याचा आदेश सर्वांना का दिला होता? त्यांना माहीत नव्हते का की ६४ माळांमध्ये लवकर मन लागणार नाही? पण जेव्हा जास्त जप होईल, तेव्हा नित्य-सुकृतीही जास्त होईल. ती नित्य-सुकृती नामात मन लावून देईल. आपले गुरुवर्ग संख्या वाढवून, रात्री २ वाजता उठून सकाळपर्यंत हरिनाम का करत होते? दिवसभरही नाम करत राहायचे. ते वेडे होते का? नाही! आपण वेडे आहोत, जे कारणे देत राहतो की वेळच मिळत नाही. आणि कामांसाठी वेळ कसा मिळतो? ही सर्व कामे व्यर्थ आणि अनित्य आहेत. जे नित्य राहणारे कर्म आहे, त्यासाठी वेळ मिळत नाही. का आपले जीवन नरकात जाण्यासाठी तयार करत आहात? लाज वाटण्यासारखी गोष्ट आहे. ज्ञानी असूनही अज्ञानी बनत आहात. मोठे दुःख आहे पण काय करणार? कोणी माझे ऐकतच नाही. वेळ सर्वांना मिळतो. मी नोकरी केली, तेव्हा मला एक लाख हरिनामाच्या जपासाठी वेळ कसा मिळत होता? खरी गोष्ट तर ही आहे की हरिनामात १००% श्रद्धा नाही. जिथे श्रद्धा असते, तिथे मनाचे आकर्षण आपोआपच उत्पन्न होते. खोटं-खोटं बोलल्याने काम चालणार नाही. ताट समोर वाढले आहे, तरीही खायचे नसेल तर वाढणाऱ्याने काय करावे! उपाशी मरा! कर्मांना दोष देऊन रडा! वेळ निघून जाईल, डोक्यावर हात मारून रडावे लागेल.

दिवसात (कारण सूर्यदेवांप्रती अपराध होतो), दोन्ही संध्याकाळी, सण-उत्सव, अप्रसन्नतेच्या अवस्थेत जो कोणी स्त्री-संग करतो, तो मोठा अपराधी होऊन दुष्टांना जन्म देतो. तीच संतती आई-वडील आणि शेजाऱ्यांच्या दुःखाचे कारण बनते. अशा व्यक्तीचे हरिनामाच्या जपात मन लागू शकत नाही. घरात कलि-काळाचा प्रवेश झाल्याने कलह राहील. हरिनाम-जपाचे अनुष्ठान करून स्त्री-संग करा तर महात्मा जन्माला येईल. प्रत्यक्ष तथ्य सिद्ध करण्यासाठी पुराव्याची गरज नाही. कोणीही कोणाच्या दुःखाचे कारण नाही. स्वतःच दुःखाचे बीज पेरले आहे. काम-वासनेची गती भक्तीचा नाश करते. प्रेमावस्था सुकवते. म्हणून संयम ठेवून जो

हरिनाम करेल, तोच शरणागतीची भावना जागृत करेल, अन्यथा धुळीतून तेल काढण्यासारखे होईल.

आताही वेळ असताना समजून घ्या, अन्यथा दंड भोगावा लागेल. संयम तोडाल तर रोगी व्हाल. हाडे गळून जातील. मग भजन खूप दूरची गोष्ट होईल. समजावून-समजावून, मी तर थकून गेलो, कधी जागे व्हाल? काय झोपूनच राहाल? एक दिवस कायमचे झोपी जाल. कोणी विचारणार नाही. आता एक खास गोष्ट सांगत आहे. सर्वजण म्हणतात की हरिनामात मन लागत नाही. लागेल कसे? कारण त्याचा लाभ कोणालाच माहीत नाही. लाभ माहीत असेल तर हरिनामावर श्रद्धा नक्कीच होईल. जेव्हा श्रद्धा असेल, तेव्हा मन कुठेही जाणारच नाही. जेव्हा मन कुठेही जाणार नाही, तेव्हा एक अलौकिक-आनंदाची मस्ती अनुभवास येईल. हरिनामाचा जप करणारी व्यक्ती भक्तिमय मस्तीत झुलते व नाचू लागते. कधी हसेल. कधी सुस्त पडून राहील. एका वेड्यासारखी स्थिती प्रकट होईल. निर्भयता येईल, जशी प्रल्हाद महाराजांना आली होती. हरिनाम-महामंत्राच्या चार माळा जप कानाने ऐकून केल्याने अंतःकरणात भगवंतांचे एक अलौकिक दर्शन होऊ लागेल, ज्यामुळे मन तिथून हटण्याची इच्छा करणार नाही. रात्रंदिवस आनंदाची अनुभूती हृदयात उत्तुंग लाटा निर्माण करेल. ही अवस्था यासाठी प्राप्त होत नाही आहे कारण अंतःकरणात संसाराचा कचरा भरलेला आहे. चार माळा हरिनामाचा जप केल्याने तो कचरा जळून, अश्रूधारेत वाहून बाहेर निघून जाईल. चार माळा हरिनामाचा जप का होत नाही? याचे कारण आहे—**भक्त-अपराध.** मान-प्रतिष्ठेच्या इच्छेत अहंकार लपलेला असतो. अहंकार भगवंतांचा शत्रू आहे. शत्रूवर प्रेम करणे म्हणजे भगवंतांपासून दूर राहणेच आहे. तुम्ही सर्व फोन करत रहा तर जागरूकता राहील, अन्यथा डोळे बंद होतील. असे लिहून मी चिथावणी देत नाही आहे. अशाप्रकारे भगवंतच माझ्या माध्यमातून तुम्हाला आपलेसे करू इच्छितात.

* * *

श्रीशुकदेव गोस्वामी परीक्षित महाराजांना उपदेश देतात—

कलेर्दोषनिधे राजन् अस्ति हि एको महान गुणः।
कीर्तनादेव कृष्णस्य मुक्त संगः परं व्रजेत॥

(श्रीमद्भागवत १२.३.५१)

अनुवाद—हे परीक्षित महाराज, जरी कलियुग दोषांचा सागर आहे, तरीही या युगात एक चांगला गुणही आहे—फक्त 'हरे कृष्ण' महामंत्राचे कीर्तन केल्याने मनुष्य भवबंधनातून मुक्त होतो आणि दिव्य-धामाची प्राप्त करतो.

* * *

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

(६)

छींडची ढाणी
दिनांक—२८ ऑगस्ट २००७

श्रीहरिनामच परमानंदाचा जनक
(श्रीहरिनामातून परमानंदाची प्राप्ती होते)

भगवंतांनी कलियुगाला चार लाख बत्तीस हजार वर्षांसाठी मृत्युलोकावर राज्य करण्याचा आदेश दिला. कलि-महाराजांचा स्वभाव चांडाळ प्रवृत्तीचा आहे, त्यामुळे जो त्यांच्या स्वभावानुसार जीवन जगेल, त्याच्यासाठी कलि-महाराजांचे वर्तन अनुकूल असेल. जो त्यांच्या स्वभावाच्या विरुद्ध जाईल, त्याला कलि-महाराज कधीही सुखी पाहू शकणार नाही. सध्या असेच दृश्य दिसत आहे.

कलि-महाराजांवर शासन करणारा अखिल ब्रह्मांडांचा पालनकर्ता हरिनाम (अर्थात् भगवान) आहे. जो मनुष्य श्रीहरिनामाला शरण जाऊन आपले जीवन जगेल, त्याला कलि-महाराज कधीही त्रास देणार नाहीत, कारण त्याच्यावर भगवंतांचे शासन आहे. भगवंतांनी जेव्हा कलि-महाराजांना राजा बनवले, तेव्हा त्यांना सांगितले होते की जर तुम्ही माझ्या भक्तांशी टक्कर घ्याल, तर जळून खाक व्हाल. प्रत्यक्षात हे दिसतही आहे की ज्या घरात, मंदिरात, मशिदीत, खरे प्रेम म्हणजेच हरिनाम होत नाही, तिथे नेहमी कलह माजलेला असतो. तिथे सद्भाव आणि चांगली वागणूक नाहीच. सौहार्द मूळातूनच निघून गेले आहे. इतकेच काय, मारामारीही होत राहते.

कलियुगाचा प्रकोप स्पष्ट दिसत आहे. श्रीमंतही दुःखी, गरीबही दुःखी. राजाही दुःखी, तर रंकही दुःखी. कोणीही सुखी नाही, कारण या मृत्युलोकात कोणी रक्षक नाही, सर्वजण भक्षक बनून त्रास देत आहेत. फक्त खरे भगवंतांचे भक्तच (जे रोज एक लाख हरिनाम म्हणजेच ६४ माळा नामस्मरण करतात) तेच सुखी आहेत, कारण त्यांचे रक्षक व पालनकर्ता हरिनाम आहेत. या भक्तांवरही कलियुगाचा प्रभाव तर पडतोच, पण हरिनाम केल्याने ते नुकसानापासून वाचतात. प्रत्येक कुटुंबात, समाजात, गावात, शहरात,

देश-विदेशात कलह करणे, अराजकता, मारामारी, लुटणार करणे आणि कुठेही शांती न राहू देणे व हे सर्व पाहून हसणे—हा कलियुगाचा धर्म आहे.

"कलियुग केवल नाम अधारा।
सुमिर सुमिर नर उतरहिं पारा॥"

अनुवाद—कलियुगात केवळ भगवंतांच्या नामाचा आश्रयच बद्ध-जीवांचा आधार आणि उद्धाराचा उपाय आहे. भगवंतांच्या नामाचा वारंवार उच्चारणपूर्वक जप आणि कीर्तन केल्याने जीव भवसागरातून पार होतो.

जो खऱ्या अंतःकरणाने हरिनाम करतो, त्याच्यावर कलियुगाचा प्रभाव पडत नाही. तोच या लोकात परम सुखी आहे. बाकी सर्वजण दुःखाच्या आगीत भाजत आहेत. प्रत्येक ठिकाणी कुसंग (वाईट संगत) आहे. कलि महाराज म्हणाले आहेत—"संपूर्ण मृत्युलोकाला कुसंगाच्या धगधगत्या आगीत ढकलले नाही, तर माझे नाव 'कलि महाराज' तरी काय कामाचे? इथे असे-असे शोध लावेन की कोणीही वाचू शकणार नाही. अगदी ऋषी-मुनीही त्यांच्या तावडीतून सुटणार नाहीत. टी.व्ही. (Television) चा जो शोध मी लावला आहे, त्याच्या प्रभावाने लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वच लोक कुसंगी व दुर्जन बनत जातील. धर्म, मर्यादा, सत्य, न्याय—काहीही शिल्लक राहणार नाही. माझा दुसरा खतरनाक शोध आहे वृत्तपत्र, ज्यात खोट्या-खऱ्या बातम्या छापून लोकांचा सारा वेळ वाया घालवत राहीन. सत्कर्मासाठी वेळच शिल्लक राहू देणार नाही. तिसरा भयानक शोध आहे—मोबाईल, ज्यात गुप्त कट रचून विनाशाचे वातावरण चहूकडे पसरवत राहीन. भविष्यात अजून एक शोध लावणार आहे, पाहत रहा. एक अशी मशीन बनवेन जी १००० मीटर दूरवरूनच घर, बँक, कारखाना, धन-संपत्ती कुठे आहे—यांची अचूक माहिती सांगत राहील. मी संधी पाहून, त्यावर हल्ला करून, सर्व मालमत्ता लुटून घेऊन जाईन, आणि सगळ्यांची तिथेच कत्तल करेन. कोणीही रक्षक नसेल. कोणीही ऐकणारा नसेल. पैशाचा बोलबाला असेल. पैसे देऊन मी स्वातंत्र्याने फिरत राहीन. मी परीक्षित महाराजांसारख्या श्रेष्ठ भक्तांनाही सोडले नाही, मग बाकी सर्व माझ्यासाठी डास-माश्या आहेत. फक्त हरिभक्तावरच (नाम-जप करणाऱ्यावरच) माझा प्रभाव चालणार नाही, जो

कोट्यावधी माणसात एकच असेल आणि बाकी सर्व ढोंगी असतील. माळा जपतील आणि गळा कापतील. ते माझ्या तावडीतून सुटू शकणार नाहीत."

गौरहरींनी आपल्या भक्तांना एक लाख (६४ माळा) हरिनाम करण्याचा आदेश का दिला आहे, याचे कारण आहे की हरिनामाद्वारे कलियुगाच्या दुष्टतेपासून बचाव होऊ शकेल. भविष्यात खूप धोकादायक काळ येणार आहे, ज्यातून भगवंतांचे भक्तच वाचू शकतील. गौरहरी हेही जाणत होते की ६४ माळा हरिनामाचा जप करताना कोणाचेही मन पूर्णतः स्थिर होऊ नाही, परंतु हरिनामच हळूहळू मनास स्थिर करेल, जेव्हा आनंद येऊ लागेल.

"धीरे-धीरे रे मना धीरे सबकुछ होय।
माली सींचे सौ घड़ा, रितु आए फल होय॥"
"मना, घाई करू नकोस, सगळं होते हळूहळू।
माळी शंभर घागरी पाणी घाले, पण फळ येते ऋतुतच॥"

अनुवाद—हळूहळूच सर्व काही घडते. माळी शंभर घागरी पाणी घालतो, पण झाडावर योग्य ऋतू आल्यावरच फळे लागतात.

म्हणून संयम ठेवावा लागेल. शास्त्राचे वाक्य आहे—

"भायँ कुभायँ अनख आलसहूँ।
नाम जपत मंगल दिसि दसहूँ॥"

अनुवाद—प्रेमाने असो, द्वेषाने असो, रागाने असो, आळसाने असो, कोणत्याही अवस्थेत हरिनामाचा जप केल्याने आपोआप दहाही दिशांमध्ये मंगलदायक वातावरण पसरते.

गौरहरींनी याच कारणास्तव ६४ माळा हरिनामाचा जप करण्याचा आदेश दिला होता. या आदेशाचे पालन सर्वांनी केले पाहिजे. तेव्हाच मंदिरांमध्ये प्रेम आणि श्रद्धेने पूजा होऊ शकेल, अन्यथा कपटमयी पूजा तर होतच असते. पुजारीच मंदिरात भगवंतांच्या श्रीविग्रहाची पूजा करतो. जेव्हा पूजकच (पुजारीच) श्रद्धाहीन असेल, तेव्हा दुसरेही तसेच करतील. जेव्हा श्रद्धा नसेल, तेव्हा संकीर्तन व शास्त्रांचे पठणही कपटाच्या श्रेणीत येतील. यामुळे भगवंतांचे श्रीविग्रह पुजाऱ्याने केलेली पूजा स्वीकारणार नाही व झोपूनच राहतील. प्राण-प्रतिष्ठेनंतर पुजारीच भगवंतांच्या श्रीविग्रहांना जागवतो, अन्यथा ते झोपलेलेच राहतील. सजीवता राहणार नाही. भगवान गौरहरींना हे चांगलेच माहीत होते की असे कलियुग येईल

ज्यात ऋषी-मुनी, महात्मासुद्धा वाचू शकणार नाहीत, म्हणून यापासून वाचण्याचा उपाय आत्तापासूनच सांगणे योग्य आहे. म्हणून ही अट घातली की जी व्यक्ती ६४ माळा (एक लाख) हरिनाम श्रवणपूर्वक करेल, तिच्याच घरी मी प्रसाद ग्रहण करेन. यावर सखोल विचार केल्यास हे निश्चित होते की हरिनाम श्रवणाच्या अभावी मानवाला दुःखसागरात बुडावेच लागेल! म्हणून आतापासूनच यापासून वाचण्याचा उपाय सांगणे योग्य आहे.

या वचनांवर आस्तिक लोकांनी पूर्ण लक्ष दिले पाहिजे की त्यांनी दिलेला आदेश किती गंभीर आहे. जसे दिसतही आहे, ज्या ठिकाणी भगवंतांच्या नामाचा जप आणि कीर्तन, श्रद्धा आणि प्रेमाने होत नाही, तिथे कलि-महाराजांनी कलह माजवून ठेवला आहे. मंदिर असो, घर असो, किंवा वन असो—सर्व ठिकाणी सर्व प्राणी कलहाच्या भीषण आगीत होरपळले जात आहेत. या हरिनामाचा असीम प्रभाव आहे. म्हणूनच शास्त्राने भगवंतांच्या नामासाठी घोषणा केली आहे की—

"कहौं कहाँ लगि नाम बड़ाई।
रामु न सकहिं नाम गुन गाई॥"

अनुवाद—हरिनामाची महती मी किती वर्णन करू? भगवान् श्रीराम हे स्वतःही आपल्या पवित्र रामनामाचे गुण पूर्णतः गाऊ शकत नाहीत.

नाम सर्वसमर्थ आहे. आराध्यतम आहे. साधन आणि साध्य दोन्ही नामात ओतप्रोत आहेत.

"चह जुग चहे श्रुति नाम प्रभाऊ।
कलि विशेष नहीं आन उपाऊ॥"

अनुवाद—जरी चारही युगांमध्ये (अर्थात् सत्य, त्रेता, द्वापर आणि कलियुगात) आणि चारही वेदांमध्ये (अर्थात् ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद आणि अथर्ववेदात) हरिनामाचे महत्त्व असले, तरी कलियुगात त्याचे विशेष महत्त्व आहे. कलियुगात भगवंतांचे नामस्मरण करण्याशिवाय उद्धार होण्याचा व परम गती प्राप्त करण्याचा दुसरा कोणताही उपाय नाही आहे.

ज्या व्यक्तीने हरिनामाची शरणागती पत्करली आहे, म्हणजेच जी व्यक्ती रात्रंदिवस हरिनामाचा जप करत आहे, तिने सन्मार्गाने आपले जीवन जगले आहे. ज्या व्यक्तीने हरिनामाची शरणागती

घेतली नाही, तिची सर्व आध्यात्मिक कर्मे नगण्य आहेत, कारण कलियुगाचा नियत धर्म व कर्म 'हरिनामाचा जप करणे' हाच आहे, जे तिने सोडून दिले आहे. झाडाच्या मूळाला पाणी दिले नाही, तर झाड हिरवेगार कसे राहू शकते?

मंदिरांमधील भगवंतांचे श्रीविग्रह, जे हरिनामानेच सजीवता धारण करतात, ते हरिनामाच्या अभावी सजीव कसे राहू शकतील? ते फक्त दगडाच्या मूर्तीरूपातच दिसतील. दर्शन होते—अंतःकरणाच्या ज्ञान नेत्रांनी, पण ते नेत्र हरिनाम-श्रवणाच्या अभावी उघडत नाहीत. जेव्हा हरिनाम-श्रवणरूपी काजळाचे डोळयांमध्ये अंजन होईल, तेव्हा दिव्य-दृष्टी आपोआपच जागृत होईल.

हरिनामाच्या जपाद्वारे ध्रुव महाराजांनी तसेच प्रल्हाद महाराजांनी भगवंतांचे हृदय थरारून टाकले. हरिनामाच्या जपाद्वारे इतर भक्तांनी भगवंतांचे हृदय विकत घेतले. खोल विचार करावा लागेल की जो वेळ गेला, तो गेला, आता तरी सावध होऊन हरिनामाचा आश्रय स्वीकार करावा. खट्वांग महाराजांनी तर दोन घटकांतच भगवंतांना प्राप्त केले होते. सात दिवसांत परीक्षित महाराजांनी हरिकथेच्या श्रवणाद्वारे गोलोक-धामाची प्राप्ती केली होती.

धैर्य ठेवा, घाबरू नका. संसारातून मन एकदम काढून घ्या, तर भगवान लवकर भेटतील. भगवान फक्त तुमचे मन घेऊ इच्छितात. आतापर्यंत मन भगवंतांच्या मायाशक्तीला दिले आहे, आता याच क्षणी हे मन भगवंतांना देऊन टाका, तर तुमच्या अनंत कोटी जन्मांच्या दुःखांचा गोंधळ याच क्षणी समाप्त होताना दिसेल. भौतिक जगात राहून भौतिक जगाचे कामही करा, पण गुंतून न राहता क्षणोक्षणी हरिनाम करत रहा आणि भगवंतांना विसरू नका. बस, तुमचे काम होईल. फक्त मनाला वळवायचे आहे. माया-मोहच पुढील जन्म घडवतात. मोहाला वळवून भगवंतांच्या चरणी ठेवा.

"सन्मुख होइ जीव मोहिं जबहीं।
जन्म कोटि अघ नासहिं तबहीं॥"

अनुवाद—भगवान श्रीराम ग्वाही देतात, "जीवात्मा माझ्या समोर येताच, त्याच्या कोट्यवधी जन्मांची पापे नष्ट होतात."

हरिनाम-श्रवणाचा स्वीकार करणे हेच भगवंतांच्या समोर येणे आहे, दुसरे कोणतेही साधन नाही.

"कोटि विप्र वध लागहिं जाहू।

आये शरण तजहूँ नहीं ताहू॥"

अनुवाद—भगवान् श्रीराम म्हणतात, "ज्या व्यक्तीला कोट्यावधी ब्राह्मणांना मारण्याचे पाप लागले आहे, तरीही ती व्यक्ती मला शरण आल्यास तिला मी वाऱ्यावर सोडणार नाही अर्थात् ती व्यक्ती कितीही पापी असली तरीही मी एका दयाळू आईप्रमाणे तिची काळजी घेईन."

वेळ खूप वेगाने जात आहे, बालपण गेले, तारुण्य गेले, म्हातारपण येऊन तुम्हाला सावध करत आहे की आता तरी जागे व्हा, काहीही बिघडलेले नाही, अन्यथा अचानक मृत्यू येऊन तुम्हाला गिळून टाकेल. मृत्यू येण्याआधी, भगवंतांच्या चरणांवर लोटांगण घाला, तर यमराजाच्या तोंडाला काळे फासले जाईल. भगवान स्वतःच येऊन तुमचे प्रेमाने स्वागत करतील आणि तुम्हाला आपल्या सोबत आपल्या धामात घेऊन जातील. ही सुवर्णसंधी चुकवू नका, आतापासूनच डोळे उघडून चालू लागा. कल्याण होईल. कलि-महाराजांनी जो मोबाईलचा शोध लावला आहे, तो कामदेवाचे आणि क्रूरतेचे साक्षात स्वरूप आहे. या मोबाईलचा १०% चांगला उपयोग आणि ९०% वाईट उपयोग होत आहे. भजनानंदी व्यक्तीने भजनाच्या वेळी मोबाईल बंद ठेवला पाहिजे. आवश्यकतेनुसारच त्याचा उपयोग करणे योग्य आहे. टीव्ही (दूरदर्शन, Television) आणि वृत्तपत्रांशी आमचा काय संबंध आहे! यामुळे तर भगवंतांच्या चिंतनात खूपच विघ्न येते. जो कोणी भक्त यांचा उपयोग करेल, त्याचा भजन-स्तर निरंतर खालीच येत राहील.

* * *

निरन्तर नाम लओ, कर तुलसी सेवन।
अचिरात् पाबे तबे, कृष्णेर चरण॥

(श्रीचैतन्यचरितामृत, अंत्यलीला,
अध्याय ३, पयार-संख्या १३७)

अनुवाद—नामाचार्य हरिदास ठाकुरांनी लक्षहीरा नामक गणिकेचा उद्धार केला आणि तिला उपदेश दिला, "भगवंतांच्या नामाचा निरंतर जप करा आणि त्याचबरोबर तुळशी महाराणीची सेवा व स्तुती करा. असे केल्याने तुम्हाला लवकरच भगवान श्रीकृष्णांच्या चरणकमलांची प्राप्ती होईल."

* * *

(श्रीमद्भागवत पुराणाचा अंतिम श्लोक)

नामसंकीर्तनं यस्य सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्तं नमामि हरिं परम॥

अनुवाद—मी त्या भगवान हरींना सादर नमस्कार करतो, ज्यांच्या पवित्र नामांचे संकीर्तन सर्व पापांचा नाश करते आणि ज्यांना नमस्कार केल्याने सर्व दुःखांपासून सुटका मिळते.

* * *

अपराध शून्य हय लय कृष्ण नाम।
तबे जीव कृष्णप्रेम लभे अविराम॥

(श्रीनवद्वीप धाम माहात्म्य
खंड १, अध्याय ४५, पयार ४८)

अनुवाद—जेव्हा जीव अपराध शून्य होऊन कृष्णनामाचा जप करतो, तेव्हाच त्याला कोणत्याही अडथळयाशिवाय कृष्णप्रेम प्राप्त होते.

* * *

॥ श्रीश्रीगुरूगौराङ्गौ जयतः ॥

(७)

छींडची ढाणी

दिनांक—१०/१०/२००७

परमाराध्यतम भक्त प्रवर,

दासानुदास, अनिरुद्ध दास यांचा साष्टांग दंडवत प्रणाम आणि भजन स्तर वाढण्याची प्रार्थना.

हरिनामात मन लावण्याचे विविध मार्ग

(१) हरिनामाचा जप हळू आवाजात करत रहा, जेणेकरून आवाज बाहेर न जाता फक्त तुमच्या कानाला ऐकू येईल. मोठ्या आवाजात जप केल्याने थकवा येतो. जिभेचे उच्चारण आणि कानाचे श्रवण एक घर्षण निर्माण करते, ज्यामुळे उष्णता निर्माण होऊन विरहाग्नी प्रज्वलित होते, आणि यामुळे अष्ट-सात्त्विक विकार (पुलक अथवा रोमांच, अश्रुपात इत्यादी) उत्पन्न होतात. अश्रुपात झाल्याने अंतःकरणातील सर्व दुर्गुण हळूहळू बाहेर निघून जातात आणि सद्‌गुण येऊन भरू लागतात. तुम्ही याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊ शकता.

(२) कोणत्याही नामनिष्ठ संतांच्या चरणी (प्रत्यक्ष किंवा मानसिक रूपात) बसून हरिनामाचा जप करावा लागेल. त्यांच्या अंतःकरणात भगवान विराजमान असतात. तेथून ते जप करणाऱ्याला पाहत राहतात आणि नामनिष्ठ संताच्या कृपेचा वर्षाव होत राहातो. प्रत्येक संतांच्या चरणी बसून चार-चार माळा करू शकता. संतांची काही कमतरता नाही. अनंत-संत चारही युगांमध्ये झाले आहेत. आपल्या मनाला आवडेल त्या संतांच्या चरणी बसून जपमाळेवर हरिनामाचा जप करू शकता. या साधनाने मन कधीही भौतिक जगाकडे जाणार नाही.

(३) मानसिक आणि प्रत्यक्ष रूपात संतांच्या संगतीत धामाचे भ्रमण करा. यमुना, गंगा, राधाकुंड, श्यामकुंड येथे संतांना स्नान घाला आणि त्यांचे कपडे धुवून त्यांना नवीन कपडे घाला. स्नान घालताना त्यांच्या चरणांचे पवित्र पाणी (चरणामृत) प्या, त्यांच्या चरणांची धूळ डोक्यावर आणि हृदयावर लावा, त्यांना भगवंतांचा

प्रसाद द्या, त्यांच्या उरलेल्या (उच्छिष्ट) महाप्रसादाची आपल्या मुखाद्वारे सेवा करा, तर मन कधीही भौतिक जगात रमणार नाही. यामुळे अष्ट-सात्त्विक विकार उत्पन्न होतील. हरिनामात मन लावण्याचे अनेक मार्ग आहेत.

(४) भगवंतांजवळ जाण्यासाठी, एखाद्या भक्ताद्वारे स्वतःची शिफारस करवावी लागते. यशोदा माईकडे जा, शची माईकडे जा, अद्वैताचार्यांकडे जा, नारद मुनींकडे जा, सनकादिकांकडे जा, शबरीकडे जा, भगवान् श्रीकपिलदेवांची आई—देवहूती मातेकडे जाऊन रडा, श्रीरूप गोस्वामी, श्रीसनातन गोस्वामी, राय रामानंद असे कितीतरी भक्त-शिरोमणी झाले आहेत, सर्वजण दयाळू आहेत, ते सगळे तुमची शिफारस भगवंतांकडे करतील. भगवान भक्तांचे बोलणे कधीही टाळत नाहीत. ते तुमचे मन हरिनामात लावतील. अनंतकोटी भक्त झाले आहेत, कोणाकडेही जाऊन त्यांच्या माध्यमातून आपली शिफारस भगवंतांकडे करवू शकता, कोणीही नकार देणार नाही, कारण सर्वजण उदार स्वभावाचे आहेत.

(५) स्वतःच्या गुरुदेवांच्या चरणी बसून हरिनामाचा जप करू शकता. त्यांचे ध्यान करू शकता. त्यांच्याशी आपल्या मनातील गोष्टी बोलू शकता. त्यांची सेवा करताना हरिनाम करण्यात मग्न राहू शकता.

(६) मंदिरात जाऊन भगवंतांचे भावपूर्ण नेत्रांनी दर्शन आणि संवाद करू शकता. आपली व्यथा त्यांना ऐकवू शकता. हरिनामात मन रमवण्याचे इतके मार्ग आहेत की मन संसारात जाऊच शकत नाही. तरीही तुम्ही म्हणता की मन लागत नाही. हे खोटे आहे. मन लागते, पण मन लावायचे नाही. एका परीक्षार्थीचे (परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्याचे) मन उत्तरपत्रिका लिहीताना ३ तास एका क्षणासाठीही कुठेही जात नाही. बँकेच्या कॅशियरचे (अधिकोषात काम करणाऱ्या रोखपालाचे) मन रोख रक्कम मोजताना स्थिर नसेल, तर खूप मोठे नुकसान होईल. फक्त हरिनामात लोभ नाही, श्रद्धा नाही, म्हणूनच मन चंचल राहते.

(७) जेवढे भगवंताचे अवतार झाले आहेत, त्यांचे स्मरण करत जिभेने हरिनाम करत रहा.

क—प्रथम तर श्रीशचीनंदन गौरहरी, पुरीतील जगन्नाथांच्या मंदिरात गरुड-स्तम्भाजवळ उभे राहून कीर्तन करत रडत आहेत.

पुरीमध्ये इकडे-तिकडे धावत भगवान कृष्णांना हाक मारत आहेत. "हा कृष्ण! तुम्ही कुठे आहात, कुठे जाऊ, कुठे भेटाल व्रजेंद्रनंदन, कोण सांगेल ते कुठे मिळतील?" इत्यादी त्यांच्या विरह-क्रंदनाचे स्मरण करून नाम करत रहा.

ख—भगवान् श्रीराम, जटायूंना मांडीवर घेऊन विलाप करत आहेत आणि आपल्या अश्रूंनी जटायूंना पूर्णपणे भिजवत आहेत. कुठे भगवान् रामचंद्र केवटाकडे (नाविकाकडे) गंगा पार करविण्यासाठी विनवणी करत आहेत—"भाऊ, लवकर आम्हाला गंगा पार करवा." कुठेतरी दोघे भाऊ—राम आणि लक्ष्मण, भिल्ल स्त्रीने (अर्थात् शबरीने) चाखून-चाखून दिलेली बोरे मोठ्या प्रेमाने खात आहेत. कुठेतरी भगवान् राम विभीषणांना आपल्या छातीशी कवटाळून लंकेशाचे (लंकेच्या राजाचे) पद प्रदान करीत आहेत. श्रीरामांच्या कितीतरी लीला आहेत, हरिनाम जपताना त्यांचे स्मरण करत रहावे.

ग—भगवान कपिल आपल्या आई देवहूतींना संसारातून मुक्त होण्याचा उपदेश देत आहेत, "आई! संसार तर दुःखाचे आलय (घर) आहे. म्हणून त्याची आसक्ती सोडून भगवंतांच्या लीला आणि पवित्र नामाचा जप करून त्यांचे स्मरण करायला पाहिजे."

घ—नृसिंह भगवान भक्त प्रह्लादाला मांडीवर बसवून आपल्या अश्रूधारांनी ओलेचिंब करीत आहेत आणि म्हणत आहेत, "प्रह्लाद, तुझ्याकडे यायला मला उशीर झाला. तुला खूप कष्ट भोगावे लागले, मला लाज वाटते आहे. आता माझ्या प्रिय प्रह्लादा! तुझ्यावर कोणतेही संकट येणार नाही, कोणीही तुझा केसही वाकडा करू शकणार नाही, तू निश्चिंत रहा."

ङ—भगवान श्रीवामनदेव नटासारखा वेष धारण करून बुटक्या पण अतिशय सुंदर लहान मुलाच्या रूपात बळी महाराजांच्या वाजपेय यज्ञात भिक्षा मागायला गेले, जेणेकरून देवांना राक्षसांपासून वाचवता येईल. दोन पावलांत संपूर्ण पृथ्वी मोजून (पदाक्रान्त करून) बळी महाराजांना रसातळात (सुतल लोकाचे) राज्य दिले.

च—भगवंतांनी कच्छप (कासवाचा) अवतार घेऊन समुद्र मंथन केले आणि देवांना अमृत पाजून आकर्षक मोहिनी रूपात राक्षसांना मोहित केले.

छ—नारद मुनी, ब्रह्मदेवांचे चार नैष्ठिक ब्रह्मचारी पूत्र सनक, सनंदन, सनातन व सनत, नवयोगेश्वर (भगवान् श्रीऋषभदेवांची ९ परमहंस मुले—कवि, हवि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, अविरहोत्र, द्रुमिल, चमस आणि करभाजन) व भरत यांचा नामजप, हनुमंतांची श्रीरामचन्द्रांप्रती दास्यता, कौरव-पांडवांमधील मतभेद, भगवंतांद्वारे विदुरांच्या घरी जाऊन केळीची सालपटे खाणे, अचानक काम्यवनात महर्षी दुर्वासांनी भोजन मागितल्यावर भगवंतांद्वारे पांडवांना शापापासून वाचवणे इत्यादी भगवंतांच्या विविध अवतारांच्या कितीतरी लीला आहेत की इतके ध्यान कोणी करूच शकत नाही. तुम्ही ५ लाख हरिनाम स्मरण करा, पण लीला समाप्त होणार नाहीत.

ही केवळ हमी नाही, तर शास्त्रांची स्पष्ट घोषणा आहे की जो मनुष्य नामनिष्ठ राहून अधिकाधिक हरिनामाचा जप करतो, त्याचा अंतिम श्वास शरीरातून बाहेर पडताना त्याला घ्यायला भगवान आपल्या पार्षदांना न पाठवता ते स्वतःच येतात. यात अजिबात (एक टक्कासुद्धा) शंका करू नका, कारण या व्यक्तीने कलियुगाचा खरा धर्म—हरिनाम—स्वीकारलेला आहे, आणि हाच या युगातला सर्वोच्च नियत धर्म व कर्म आहे. नामनिष्ठ भक्ताच्या डोक्यावर भगवंतांचा वरदहस्त आहे आणि त्याच्याशी जे संबंध ठेवतात, त्यांनाही भगवान सुखी करत राहतात. जर कोणी म्हणेल की इतका हरिनामाचा जप करूनही जीवनात दुःखाचा सामना का करावा लागतो? तर याचे उत्तर आहे की हे दुःख नव्हे. किंबहुना भगवान आपल्या भक्ताला दुःखाचा भोग करवून सरतेशेवटी आपल्या धामात घेऊन जाऊ इच्छितात. ही कपोलकल्पित गोष्ट अर्थात् थाप नाही आहे (अर्थात् हा निव्वळ मनाचा भ्रम नव्हे), प्रत्यक्षात १००% सत्य सिद्धांत आहे. याचे प्रत्यक्ष प्रमाण म्हणून—मीराबाई, पाच पांडव, व्रज-धामावर राक्षसांचे आक्रमण, स्वतः भगवान श्रीरामांच्या पित्यावर (दशरथ महाराजांवर) आलेले मोठे संकट, देवराज इंद्रांवर वारंवार राक्षसांचे आक्रमण—अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. भक्तांच्या जीवनात नेहमी दुःखाचे क्षणा येत राहतात, परंतु भक्त त्या संकटांना दुःख न समजता भगवंताची कृपाच समजतात. महाराणी कुंतीने दुःख का मागितले? यावरून स्पष्ट होते की दुःख भगवंतांची अधिक आठवण करून देत राहते. सुखात माणूस भगवंतांना विसरून जातो.

अधिकाधिक हरिनाम करणे हेच संसार-निवृत्तीचे एकमेव साधन आहे. याच्या अभावी भगवंतांची पूजा, अर्चन, यज्ञ, स्वाध्याय, योग, तपस्या, तीर्थाटन, गृहस्थ धर्म, चारही वर्ण आणि आश्रम सर्व फक्त श्रम मात्र आहेत. यामुळे फक्त पुण्य (नित्य-सुकृती) जमा होते. म्हणजेच त्याचे मन हळूहळू शुद्ध होत राहते. अनेक जन्मांनंतर ही एकत्र झालेली नित्य-सुकृती हरिनामात आवड निर्माण करेल. यामुळे मन शुद्ध होऊन हरिनामाप्रती प्रेम प्रकट होईल. प्रेमच भगवंतांना भक्ताकडे आकर्षित करते. हे प्रेम हरिनामाच्या अभावी उदय होणारच नाही. हे हरिनामच साधकाला भक्त-अपराध आणि सन्मान व प्रतिष्ठेच्या आकांक्षेपासून वाचवत राहील. (१) भक्त-अपराध आणि (२) सन्मान व प्रतिष्ठा प्राप्त करण्याची आकांक्षा—हे दोन्ही भक्तीच्या मार्गात खूप मोठे अडथळे आहेत. या शत्रूंपासून हरिनामच वाचवते, अन्यथा वाचणे अशक्यच आहे.

हरिनाम स्मरण करता-करता इतका परमानंदाचा उदय होतो की तो वर्णन करणे अशक्य आहे. जो साधक हरिनामाच्या जपाचे व्रत स्वीकारेल, तोच साधक या परमानंदाचा अनुभव करण्यास पात्र ठरेल. तो परमानंद सांगता येत नाही (अर्थात् तो परमानंद वर्णनातीत आहे). जे तथ्य प्रत्यक्ष अनुभवता येते त्याच्यासाठी पुराव्याची गरज नाही, तुम्ही अनुभव घेऊन पाहू शकता. अनुभव न आल्यास शास्त्राच्या कृपेची याचना करा. शास्त्र कोण्या सामान्य मानवाची वाणी नव्हेत, ते भगवंतांची वाणी आहेत, जी लेखणीच्या रूपात मानवाचे डोळे उघडत आहे. जर ते उघडत नसतील, तर समजून घ्या की आता परत नरकात जाऊन तेथे दंड भोगावा लागेल, दुःखसागरात बुडावे लागेल.

* * *

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

(८)

चूरू (राजस्थान)
दिनांक—२९/०७/२००५

परमाराध्यतम, परमश्रद्धेय, माझे शिक्षा-गुरुदेव श्रीभक्तिसर्वस्व निष्किंचन महाराज यांच्या चरण-युगुलात अधमाधम दासानुदास अनिरुद्ध दास यांचा असंख्य वेळा दंडवत प्रणाम आणि चातुर्मास्य अनुष्ठान निर्विघ्नपणे पूर्ण होवो यासाठी हात जोडून प्रार्थना.

भगवान हरिनामाचा जप करणाऱ्या साधकाला
उन्नत भक्ताच्या हृदयरूपी झरोक्यातून न्याहाळतात

ठाकूर राधामाधवांच्या प्रेरणेने प्रेरित होऊन तुमच्या करकमलात सुवर्ण अक्षरांमध्ये लेख लिहून सेवाभावाने आदरपूर्वक प्रस्तुत करत आहे. आपण माझे शिक्षा-गुरुदेव आहात. भगवंतांनी लेखनाद्वारे आपली सेवा करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे, त्यामुळे मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो, कारण मी हे लेखन करण्यास कधीही योग्य व सक्षम नाही.

मी अज्ञानी आहे—विषय-भोगांमध्ये निमग्न, प्रतिष्ठेचा लोभी व अवगुणांची खाण आहे. अशी अयोग्य व्यक्ती कोण्या परमहंस महात्म्याला पत्र लिहू शकते का? पण इतकी अयोग्यता असूनही आपल्या चरणांच्या असीम कृपेने माझ्यासारखा पंगूही (लंगडा माणूसही) पर्वत ओलांडून गेला.

भगवान् म्हणतात की, "प्रत्येक प्रवचनकार माझ्या लीला ऐकवतो. भक्तांचे आश्चर्यकारक चरित्र ऐकवतो. पण माझी प्राप्ती कशी होईल, याचे साधन कोणीच सांगत नाही. ते हे सांगत नाहीत की हरिनामाचा जप कसा करावा, परंतु हे हरिनामच सर्व ब्रह्मांडांचे आनंददायी औषध आहे. अनन्त-कोटी ब्रह्मांडांमध्ये असा कोणताही पदार्थ नाही, जो आधाराशिवाय असेल. आधार सर्वांना हवा असतो. मलाही आधाराची गरज असते, अन्यथा माझे मन एका क्षणासाठीही रमणार नाही. भक्तच माझा आधार आहे. जर भक्ताचा अवतार झाला नाही, तर मी निष्क्रिय होईन, मी अवतार तरी का घेऊ? जगात माझा अवतार फक्त दोन प्रकारे होतो. पहिला अवतार

भक्ताच्या हृदयात प्रकट होतो आणि दुसरा अवतार मंदिरात श्रीविग्रहाच्या रूपात होतो. असे का होते? फक्त आधार प्रदान करण्यासाठी! मंदिरात विग्रह स्वरूपात जर मी नसेल, तर बिचारा भक्त आधाराशिवाय काय करेल? भक्त नसेल, तर मी आधाराशिवाय काय करू? वेलीला झाडाचा आधार लागतो. पर्वताला पृथ्वीचा आधार लागतो. शिष्याला गुरूचा आधार लागतो. स्त्रीला पतीचा आधार लागतो, म्हणजेच आधाराशिवाय जग चालणारच नाही!

मोहामध्ये असताना मला कोणीही प्राप्त करू शकत नाही. काम, क्रोध, लोभ, ईर्ष्या, द्वेष इत्यादी आपले काम करून शांत होतात, परंतु मोह इतका धोकादायक आहे की त्याला पकडणे पूर्णपणे अशक्य आहे. ही इतकी सूक्ष्म भावना आहे की ती अनुभवातही येत नाही. हा मोहच आवागमनाच्या अर्थात् जन्म-मृत्यूच्या चक्रात अडकवून ठेवतो. भौतिक जगाप्रती मोह असल्यामुळे भगवंतांना आपल्या हृदयात बसण्यासाठी जागा मिळत नाही. पहिला —शरीराचा मोह, दुसरा—इंद्रियांचा मोह, रसेंद्रिये रसाकडे, डोळे पाहण्याकडे, कान ऐकण्याकडे धावत राहतात. तिसरा मोह—धन (पैसा), जन आणि जागेचा. चौथा मोह—'कारण'-शरीराचा (स्वभावाचा) जसे की, मी दयाळू आहे, मी पंडित आहे, मी माझ्या शत्रूचा शत्रू आहे इत्यादी. हा अहंकार (मोह) जीवामध्ये असा वास करतो, जसे फुलात सुगंध किंवा दुधात लोणी.

मठामध्येही मोह राहतो. केवळ स्थूल रूपातच मठाची सेवा चालते. जर मठात मोह नसेल, तर जेव्हा-जेव्हा मठात संकट येते, तेव्हा भगवंतांनी आमचे रक्षण करून आमचा मठ सांभाळून घ्यावा —ही भावना प्रकट होते. याचा अर्थ आहे मठामध्येही मोह आहे, खरे प्रेम नाही. हे मी म्हणत नाही, राधा-माधव सर्वांना सावध करत आहेत. ते म्हणतात—"मी मठाचा मालक आहे, पण 'मठरक्षक' मला मंदिरात येऊन सांभाळतही नाहीत, आणि मला इथे काय-काय अडचणींचा सामना करावा लागता, हेही पाहत नाहीत. प्रेमयुक्त भावनेने माझी सेवा होत नाही, कधी-कधी तर मला झोपही येत नाही. उष्णतेमुळे मी दुःखी राहतो. थंडीमुळे थरथरतो. उपाशीही राहतो. ते मठरक्षक येऊन माझ्या देखरेखीसाठी असलेल्या पुजाऱ्याची परीक्षा घेतात का? त्यांनी लपून-लपून पाहायला पाहिजे. असो,

तरीही ते माझ्या प्रेमाचे भुकेले आहेत, त्यामुळे मी मला सामोऱ्या जावे लागणाऱ्या कष्टांची पर्वा करत नाही.

आता ठाकूर श्रीराधा-माधव आपली प्राप्ती करण्याचा अत्यंत सोपा, श्रेष्ठ आणि अमोघ उपाय सांगत आहेत—"फक्त हरिनामाचा मोठ्या आवाजात जप करून कानाने ऐका, कोणत्याही सिद्ध संतांच्या चरणी (प्रत्यक्ष किंवा मानसिक रूपात) बसून दीन हृदयाने प्रार्थना करत रहा. कारण मी माझ्या शुद्ध-भक्ताच्या हृदयरूपी झरोक्यातून हरिनामाचा जप करणाऱ्याला साधकाला न्याहाळत असतो. माझा शुद्ध-भक्त जेव्हा कोण्या साधकाला हरिनामाचा जप करताना पाहतो तेव्हा त्या शुद्ध-भक्तालाच दया येतेच, तेव्हा ती दया मला प्रेरित करून त्या हरिनामाचा जप करणाऱ्या साधकावर प्रभाव टाकेल आणि तो साधक माझ्यासाठी रडू लागेल. माझे दर्शन घेताना स्वतंत्रपणे जप करणाऱ्याचा साधकाचा हरिनाम-जप निम्न श्रेणीचा असेल, कारण मी शुद्ध-भक्ताचे हृदय सोडून एका क्षणासाठीही बाहेर जात नाही. त्यामुळे कोण्या उन्नत शुद्ध-भक्ताचा आश्रय न घेता जप करणाऱ्याच्या साधकाच्या ध्यानातून मी पळून जातो आणि जप करणाऱ्या साधकाला विरह-स्थितीची प्राप्ती होत नाही. विरह-स्थिती शुद्ध-भक्ताच्या माध्यमातूनच येईल. कारण कोणत्याही सामान्य मानवाने (हरिनामाचा जप करणाऱ्या साधकाने) माझे कधीही दर्शन केलेले नाही, पण तो जप करणारा साधक माझ्या शुद्ध-भक्ताचे दर्शन तर रोज करतोच, त्यामुळे माझी प्राप्ती त्याच्या माध्यमातून होईल. संत तर माझे आराध्य-दैवत आहेत. मी संतांचे हृदय सोडून जाण्यास असमर्थ असतो. जर मोहाचा अंत करायचा असेल, तर वर सांगितल्याप्रमाणे हरिनामाचा जप करून निश्चितच तुम्ही मोहाची बोळवण करू शकता. आतला धोकादायक शत्रू 'मोह' आहे आणि बाहेरचा शत्रू 'कान' आहे! जर या दोन शत्रूंवर विजय मिळवला, तर भगवंतांची प्राप्ती लवकरच, निश्चितपणे होते. दोन्ही शत्रू (मोह आणि कान) वरील प्रकारे हरिनामाचा जप केल्याने मित्र बनतात आणि कायमचे जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्त करून भगवंतांच्या चरण-सेवेत आम्हाला पोहोचवतात."

सच्चे (खरे अथवा प्रामाणिक) भक्तही खूप आहेत, जसे की वर्तमान श्रीगुरुदेव, श्रील भक्तिसिद्धांत सरस्वती 'प्रभुपाद', सर्व श्रेष्ठ भक्त जसे श्रीरूप गोस्वामी, सनातन गोस्वामी, रघुनाथ गोस्वामी,

लोकनाथ गोस्वामी, पुंडरीक विद्यानिधी, माधवेंद्रपुरीपाद, ईश्वरपुरीपाद, राय-रामानंद, नामाचार्य श्रीहरिदास ठाकूर, भक्तिविनोद ठाकूर इत्यादी आणि भूतकाळातील भक्त जसे मीराबाई, अंबरीष महाराज, नारद मुनी, ध्रुव महाराज इत्यादी. कोणत्याही भक्ताच्या चरणी (प्रत्यक्ष किंवा मानसिक रूपात) बसून त्यांच्या चरण-धुळीत स्नान करावे, त्यांचा उच्छिष्ट महा-महाप्रसाद स्वीकार करावा, चरणजल (चरणामृत) डोक्यावर शिंपडावे, इत्यादी सेवा करत-करत हरिनामाचा जप करत रहावे, तर निश्चितच विरहाग्नी प्रज्वलित होईल. यात थोडीही शंका नाही, करून पाहावे आणि भगवंतांच्या असीम कृपेचे गुणगान करत रहावे.

* * *

जणू काही उन्मत्त सिंहाप्रमाणे, श्रीचैतन्य-महाप्रभू आपल्या दक्षिण-भारत-प्रचार-यात्रेसाठी निघाले. तेव्हा रस्त्याने चालताना ते परमानंदाने भरून पुढीलप्रमाणे कृष्णनामांचे जोरजोराने कीर्तन करीत होते—

कृष्ण केशव कृष्ण केशव कृष्ण केशव पाहि माम्।
राम राघव राम राघव राम राघव रक्ष माम्।
राम राघव राम राघव राम राघव त्राहि माम्॥

अनुवाद—हे श्रीकृष्ण, आपण केशी राक्षसाचा संहार केला, आपले केस फार सुंदर आहेत तसेच आपण श्रीमती राधाराणींच्या केसांना फुलांद्वारे अलंकृत करता म्हणून आपले एक नाव 'केशव' असे आहे. आपण कृपया माझे पालन करा. हे प्रभु श्रीराम! महाराज रघूंच्या कुलात आपण जन्म घेण्याची लीला केल्यामुळे आपले एक नाव 'राघव' असे सुद्धा आहे. आपण कृपया माझे रक्षण व पालन करावे.

स्वतःच्या शक्तीने मन सहजपणे हरिनामात लागणार नाही. हरिनाम मानसिक रूपात भक्तांच्या चरणी बसून उच्चारपूर्वक जपून ऐकवत राहिल्याने मन स्थिरता प्राप्त करते. लवकर भगवंतांच्या कृपेचा वर्षाव होण्यासाठी अधूनमधून वरील प्रार्थनेचे उच्चारण करावे.

* * *

(श्रीचैतन्य महाप्रभूंचा श्रीनित्यानंद प्रभू
आणि श्रीहरिदास ठाकूरांना आदेश)
प्रति घरे-घरे गिया कर एइ भिक्षा।

बल कृष्ण, भज कृष्ण, कर कृष्ण शिक्षा॥

अनुवाद—प्रत्येक घरी जाऊन ही भिक्षा मागा की 'कृष्ण नामाचे उच्चारण करा, श्रीकृष्णांचे भजन करा आणि कृष्णसंबंधी शिकवण ग्रहण करा.'

* * *

बहु जन्म कृष्ण भजि' प्रेम नाहि हय।
अपराध-पुँज ता'र आछये निश्चय॥

(श्रीनवद्वीप धाम माहात्म्य)

अनुवाद—जर अनेक जन्मांपर्यंत श्रीकृष्णांचे भजन करूनही जर कृष्णप्रेमाची प्राप्ती झाली नाही, तर हे निश्चित आहे की त्या व्यक्तीने अनेक अपराध केले आहेत.

* * *

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

नित्य प्रार्थना
(दोन मिनिटांत भगवंतांचे दर्शन)

श्रीमद्भागवत पुराणात कथा येते की खट्वांग महाराजांना दोन घटकांत भगवंताचे दर्शन झाले होते, परंतु माझे श्रील गुरुदेव परमाराध्यतम नित्यलीलाप्रविष्ट ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत श्रीश्रीमद्भक्तिदयित माधव गोस्वामी महाराज यांनी सांगितले आहे की जर कोणतीही व्यक्ती रोज खालील तीन प्रार्थना करेल, ज्यात फक्त दोन मिनिटांचा वेळ लागतो, तर तिला निश्चितपणे याच जन्मात भगवंताची प्राप्ती होईल.

या तीनही प्रार्थना सर्व ग्रंथ, वेद आणि पुराणांचे सार आहेत.

पहिली प्रार्थना

रात्री झोपताना भगवंतांना प्रार्थना करा—

"हे माझ्या प्राणनाथा! जेव्हा माझा मृत्यू येईल आणि माझ्या अंतिम श्वासासोबत, जेव्हा आपण माझ्या शरीरातून बाहेर पडाल, तेव्हा कृपया मला आपल्या पवित्र नामाचे उच्चारण करवून द्या. विसरू नका."

दुसरी प्रार्थना

सकाळी उठताच भगवंतांना प्रार्थना करा—

"हे माझ्या प्राणनाथा! या वेळेपासून रात्री झोपेपर्यंत, मी जे काही कर्म करेन, ते सर्व तुमचे समजूनच करीन आणि जर मी विसरलो, तर कृपया मला आठवण करून द्या. विसरू नका."

तिसरी प्रार्थना

सकाळी स्नान इत्यादी केल्यावर आणि गोपीचंदनाचा उर्ध्वपुंड्र टिळक लावल्यानंतर भगवंतांना प्रार्थना करा—

"हे माझ्या प्राणनाथा! आपण कृपा करून माझी दृष्टी अशी करा की मी प्रत्येक कण-कणात आणि प्रत्येक प्राण्यात तुमचेच

दर्शन करेन. आणि जर मी विसरलो तर आपण कृपया मला आठवण करून द्या. विसरू नका."

आवश्यक सूचना

(१) या तीनही प्रार्थनांचे तीन महिने सलग उच्चारण करणे खूप महत्त्वाचे आहे. तीन महिन्यांनंतर आपोआप सवय झाल्याने प्रार्थना करणे स्वभाव बनून जाईल.

(२) तीनही प्रार्थनांच्या शेवटी 'विसरू नका' हे वाक्य यासाठी म्हटले आहे, कारण आम्ही विसरू शकतो, पण भगवान कधीही विसरत नाहीत. अशा प्रकारे 'विसरू नका' या संबोधनाने आपण भगवंतांना बांधून घेतले. आता पुढे ती भगवंतांची जबाबदारी बनली आणि आपण निश्चिंत झालो. त्यामुळे भगवंतांना या प्रार्थनेनुसार बांधील होऊन आमच्या जीवनात बदल घडवून आमचा उद्धार करावाच लागेल. आणि आम्हाला याच जन्मात भगवंतांची प्राप्ती होईल.

(३) नित्य प्रार्थनांसोबत 'हरे कृष्ण' महामंत्राच्या रोज कमीत कमी ६४ माळा (एक लाख हरिनाम) करणे अत्यंत आवश्यक आहे.

नित्य प्रार्थनांचे श्रीमद्भगवद्गीतेत उल्लेखित शास्त्रीय प्रमाण

— पहिली प्रार्थना —

यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम।
तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः॥

(श्रीमद्भगवद्गीता ८.६)

अनुवाद—भगवान् श्रीकृष्ण म्हणतात—"हे कुंतीपुत्रा! शरीर सोडताना मनुष्य ज्या-ज्या भावनेचे स्मरण करतो, मृत्यूनंतर तो त्या-त्या भावनेनुसार निश्चितपणे पुन्हा शरीर प्राप्त करतो."

तात्पर्य—महाराज भरतांनी मृत्यूच्या वेळी हरिणाचे चिंतन केले, म्हणून पुढील जन्मात त्यांना हरिणाचे शरीर मिळाले. म्हणून हे आवश्यक आहे की मृत्यूच्या वेळी इतर विषयांचे स्मरण होऊ नये, फक्त भगवंताचेच स्मरण व्हावे.

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्।

यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः॥

(श्रीमद्भगवद्गीता ८.५)

अनुवाद—भगवान् श्रीकृष्ण म्हणतात—"जीवनाच्या अंतिम क्षणी जो फक्त माझे स्मरण करत शरीर त्याग करतो, तो लगेच माझ्या भावनेला प्राप्त होतो, यात कोणतीही शंका नाही."

तात्पर्य—म्हणून मनुष्याने निरंतर **'हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे। हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥'** या महामंत्राचा जप करायला हवा, जेणेकरून मृत्यूच्या वेळी या हरिनामाच्या उच्चारणानेच त्याला भगवंतांची प्राप्ती होईल.

पहिली प्रार्थना बोलल्याने आपोआपच भगवंतांच्या कृपेने या उद्दिष्टाची पूर्ती होईल.

— दुसरी प्रार्थना —

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम्॥

(श्रीमद्भगवद्गीता ९.२७)

अनुवाद—भगवान् श्रीकृष्ण म्हणतात—"हे कौंतेया (हे कुंतीपुत्र अर्जुन)! तू जे काही कर्म करतोस, जे काही भोजन करतोस, जे काही अर्पण करतोस किंवा दान देतोस आणि जे काही तपस्या करतोस, ते सर्व मला समर्पित करत कर."

शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबन्धनैः।
संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि॥

(श्रीमद्भगवद्गीता ९.२८)

अनुवाद—भगवान् श्रीकृष्ण म्हणतात—"अशा प्रकारे तू शुभ आणि अशुभ फळांच्या कर्मबंधनातून मुक्त होशील आणि या कर्मफलत्यागरूप योगात आपले चित्त स्थिर करून तू मुक्त होऊन माझ्याकडे येशील."

दुसरी प्रार्थना बोलल्याने आपोआपच भगवंतांच्या भावनेने युक्त कर्म होईल.

— तिसरी प्रार्थना —

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः॥

(श्रीमद्भगवद्गीता ८.२९)

अनुवाद—भगवान् श्रीकृष्ण म्हणतात—"खरा योगी सर्व जीवांमध्ये मला आणि माझ्यात सर्वांना पाहतो. निःसंशय स्वरूपसिद्ध व्यक्ती मलाच परमेश्वर म्हणून सर्वत्र पाहतो."

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति॥

(गीता ६.३०)

अनुवाद—भगवान् श्रीकृष्ण म्हणतात—"जो मला सर्वत्र पाहतो आणि सर्व काही माझ्यात पाहतो, त्याच्यासाठी मी कधीही अदृश्य होत नाही आणि तो माझ्यासाठी अदृश्य होत नाही."

तिसऱ्या प्रार्थनेचे उच्चारण केल्याने आपोआपच शुद्ध भक्ती, शुद्ध नाम आणि भगवंताचे दर्शन प्राप्त होईल.

* * *

उपदेशावली

नित्यलीला प्रविष्ट ॐ विष्णुपाद श्रीमद्भक्तिसिद्धान्त सरस्वती ठाकूर "श्रील प्रभुपाद" द्वारा

(१) **'परं विजयते श्रीकृष्ण-संकीर्तनम्'** (केवळ श्रीकृष्ण संकीर्तनच विशेषरूपाने विजयी असो)—हा श्रीचैतन्य महाप्रभूंचा उपदेशच श्रीगौडीय मठाचे एकमेव उपास्य-वाक्य आहे.

(२) जे हरि-भजन करत नाहीत, ते सर्व निर्बुद्ध (मूर्ख) आणि आत्मघातकी आहेत.

(३) श्रीहरिनाम-ग्रहण आणि भगवंतांचा साक्षात्कार या दोन्ही एकच गोष्टी आहेत.

(४) श्रीकृष्ण-नामोच्चारणालाच भक्ती समजले पाहिजे.

(५) जे साधक दररोज एक लाख हरिनाम (म्हणजे 'हरे कृष्ण' महामंत्राच्या चौसष्ट माळा) जप करत नाहीत, त्यांनी दिलेली कोणतीही वस्तू भगवान स्वीकार करत नाहीत.

(६) अपराधांपासून दूर राहून श्रीहरिनाम ग्रहण करण्याची इच्छा करून निरंतर हरिनाम करत राहिल्याने अपराध दूर होतील आणि शुद्ध हरिनाम प्रकट होईल.

(७) श्रीनामाचा जप करताना भौतिक चिंता प्रकट झाल्यास श्रीनाम-ग्रहणात शिथिलता येऊ नये. श्रीनाम-ग्रहणाचे गौण फळ म्हणून व्यर्थ भौतिक चिंता हळूहळू दूर होतील; यासाठी घाबरण्याची गरज नाही. अत्यंत आग्रहाने तन-मन-वचनाने (शरीराने, मनाने व वाणीने) श्रीहरिनामाची सेवा केल्यानेच श्रीनामी-प्रभू (स्वयंरूप भगवान् श्रीकृष्ण) आपल्या परम मंगलमय अप्राकृत-स्वरूपाचे दर्शन घडवतात. श्रीहरिनाम ग्रहण करत-करत अनर्थ दूर झाल्यावर श्रीहरिनामातूनच भगवान् श्रीकृष्णांच्या रूप, गुण व लीला यांची आपोआपच स्फूर्ती होते.

* * *

॥ श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

(९)

छींडची ढाणी
दिनांक—१५/११/२००५

भक्ति-बीजाचे रोपण

तुमच्या आठवणीत हा क्षुद्र मानव विरहाग्नीत जळत असताना, शांती मिळवण्यासाठी पत्र लिहिण्यास बांधील होतो. जोपर्यंत मनातील भावना लेखाद्वारे व्यक्त करत नाही, तोपर्यंत शांती मिळत नाही. माहीत नाही कोणती शक्ती मला प्रेरित करून जबरदस्तीने लिहिण्यास भाग पाडते.

हरिनाम कानाने ऐकणे खूप महत्त्वाचे आहे, जर असे झाले नाही तर स्मरण व्यर्थ होईल. तसे, पूर्णपणे व्यर्थ तर होणार नाही. जागतिक काम सुधारत राहील आणि पुण्य (नित्य-सुकृती) जमा होत राहील, परंतु भगवंतांच्या चरणांपर्यंत पोहोचायला खूप वेळ लागेल. अनंत जन्म-मृत्यूचे दुःख भोगावे लागेल. मन जिथेही 'हरिनाम' घेऊन जाईल, तिथे कल्याणच होत राहील. कारण हरिनाम चारु-चिंतामणी (मनातील सर्व इच्छा पूर्ण करू शकणारा दिव्य मणी) आहे, वांछा-कल्पतरू (मनाच्या सर्व इच्छा पूर्ण करू शकणारा कल्पवृक्ष) आहे. हे वाक्य ध्रुव-सत्य व अटळ-सिद्धांत आहे. हरिनामात शेतकऱ्याच्या शेतीची कसोटी शंभर टक्के (तंतोतंत) खरी ठरते.

भगवान जीवावर कृपा करण्यासाठी गुरूंच्या रूपात येऊन हरिनामाचे बीज कानात ऐकवतात आणि समजावून सांगतात, याला कानाद्वारे पोषण करत राहणे म्हणजेच कानाने ऐकत राहणे आवश्यक आहे. जर असे केले नाही तर बियाण्याला कोंब फुटणार नाही. पण शिष्य या बियाण्याला कानात न टाकता इकडे-तिकडे फेकत राहतो, त्यामुळे ते बियाणे हृदयरूपी जमिनीत जात नाही, त्यामुळे भक्तिलतेच्या (भक्तीच्या वेलीच्या) बियाण्याला कोंब फुटतच नाही. संपूर्ण आयुष्य व्यर्थ जाते. ओंजळीत भरलेले अमृत जमिनीवर टाकून देतो, मग हे अमृत अनंत-जन्मांपर्यंत हातात लागत नाही. हे त्याच्या महान अज्ञानामुळेच तर आहे.

शेतकरी बैलांद्वारे नांगर चालवतो. साधक साधूंच्या आनुगत्यात आपले जीवन जगत राहतो. शेतकरी नांगराच्या पुढे 'कुश' नामक एका प्रकारच्या अवजाराद्वारे खोल रेषा (उमरा) बनवत राहतो. साधक हृदयरूपी खड्ड्याला सद्‌गुणरूपी 'कुश'द्वारे खोल करत राहतो. शेतकरी नांगराच्या मागे एक पाईप (ओरणा) बांधतो, जो रेषेच्या (उमऱ्याच्या) तळाशी जोडलेला असतो. तिथे उमऱ्यात जाऊन बियाणे स्थिर होत राहते. साधक 'कान'रूपी पाईपमध्ये 'मुख'रूपी मुठीतून हरिनामरूप बियाणे ऐकवत राहतो (अर्थात् टाकत राहतो). शेतकरी जेव्हा बियाणे टाकत राहतो, तेव्हा पाईपमधून येणारा 'खुन-खुन'चा आवाज देखील ऐकत राहतो. साधकही हरिनामाचा आवाज मनाद्वारे ऐकत राहतो, जर शेतकऱ्याला 'खुन-खुन'चा आवाज ऐकू आला नाही, तर तो त्या पाईपकडे लक्षपूर्वक पाहतो, की बियाणे जमिनीत का जात नाही आहे, नक्कीच काहीतरी अडचण झाली आहे. त्याचप्रमाणे साधक जेव्हा हरिनामाचे उच्चारण मन केन्द्रित करून ऐकत नाही, तेव्हा तो समजतो की मनरूपी 'खुन-खुन' आवाज बंद झाला आहे, त्यामुळे साधक सावध होऊन उच्चारण करतो.

नांगराच्या मागे सुमारे एक हात दूर शेतकरी एक भारा (झाडा) बांधतो, तो झाडा रेषेच्या (उमऱ्याच्या) दोन्ही कडांची माती खड्ड्यात टाकत राहतो, जेणेकरून पेरलेल्या बियाण्यावर ओलसरपणा राहील, अन्यथा कोरड्या मातीमुळे बियाण्याला कोंब फुटणार नाही. मग शेतकरी सहा दिवसांनी जाऊन पाहतो, तर सर्व उमऱ्यांमध्ये बियाण्याला कोंब फुटला असतो. तेव्हा त्याला खूप आनंद होतो, तो नाचायला लागतो. त्याचप्रमाणे साधकाने हरिनामाच्या चार माळा कानाने ऐकल्यामुळे जेव्हा त्याचे मनोरथ सफल होते, तेव्हा हरिनामरूपी बियाण्याला प्रेमरूपी कोंब फुटायला लागतो. प्रेमीला (भगवंतांना) भेटण्यासाठी तो आतुर होतो. शेतकऱ्याचे बियाणे जमिनीच्या उष्णतेने अंकुरित होते. हरिनामरूपी बियाणे साधकाच्या हृदयरूपी जमिनीच्या विरहाग्नीने गरम होऊन भक्तिलतेत (भक्तीरूपी वेलीत) परिवर्तीत होऊ लागते.

जे बियाणे शेतकऱ्याच्या पाईपच्या वरच्या मुखातून बाहेर पडत राहते, ते कोरडेपणामुळे नष्ट होते आणि पक्षी ते बियाणे खाऊन टाकतात, आणि ते व्यर्थ जाते. त्याचप्रमाणे साधकाला जर

पाईपरूपी कानात हरिनामाचे बियाणे ऐकू आले नाही, तर ते बियाणे जन्म-मृत्यूच्या चक्रातून साधकाला मुक्त करू शकणार नाही. परंतु त्या बियाण्यामुळे पुण्य (नित्य-सुकृती) जमा होत राहील. जेव्हा अधिक पुण्य (नित्य-सुकृती) जमा होईल, तेव्हा भगवान त्यावर कृपा करण्यासाठी गुरूच्या रूपात येऊन पुन्हा बियाण्याचे रोपण करून जातील. अशा प्रकारे हा मार्ग चालू राहील.

२० दिवसांनंतर शेतकरी अंकुरित बियाण्यामध्ये पाणी देतो (अर्थात् सिंचन करतो). जेव्हा ते बियाणे (उमरा) रेषेच्या बाहेर येते, तेव्हा १२० दिवसांत फळे-फुले आणि पिकाने ते भरून जाते, मग तो आपल्या घरी पीक घेऊन येतो. आता कुटुंबातील सर्व लोक त्याचा उपभोग करतात. त्याचप्रमाणे साधकामध्ये सद्गुणरूपी फळे-फुले येऊन जमा होतात आणि विरहाग्नीरूपी तेज चमकू लागते, तेव्हा विश्वरूपी कुटुंब त्याच्या संगतीने तृप्त होत राहते. जेव्हा साधकाचा अंतिम क्षण येतो, तेव्हा तो आनंद-सागरात पोहत आपल्या स्थायी घरी भगवंताच्या चरणी जाऊन पोहोचतो. भौतिक जगाशी असलेले नाते कायमचे सुटते आणि तो आपल्या २१ पिढ्यांनाही सोबत घेऊन जातो.

धर्म परायण सोई कुल त्राता।
राम चरण जाकर मन राता॥

अनुवाद—ज्या भक्ताचे मन भगवान् श्रीरामांच्या चरणी अनुरक्त आहे, तो भक्तच सर्वज्ञ (सर्व काही जाणणारा) आहे, तोच सद्गुणी आहे, तोच धर्मपरायण आहे आणि तोच कुळाचा रक्षक आहे.

सो कूल धन्य उमा सुन, जगत पूज्य सुपुनीत।
श्री रघुवीर परायण, जेहि नर उपज पुनीत॥

अनुवाद—श्रीशंकर उपदेश देत आहेत, "हे उमादेवी, ऐका, ते कूळ धन्य आहे, जगासाठी पूजनीय आहे आणि खूप पवित्र आहे, ज्यात रघुवीर भगवान् श्रीरामांची मनाने भक्ती करणारे विनम्र लोक जन्माला येतात."

साधक तीन प्रकारे जप करतो. पहिला आहे उच्चारणाद्वारे केलेला जप, ज्याला जवळ बसलेली व्यक्तीसुद्धा ऐकू शकते. दुसरा आहे उपांशु-जप, ज्याचा आवाज फक्त स्वतःच ऐकू शकतो. तिसरा आहे मानसिक जप, ज्याला हृदयाचे सूक्ष्म-मन ऐकते. सूक्ष्म डोळे,

कान इत्यादी ज्ञानेंद्रिये या जपाचा अनुभव घेतात. उपरोक्त अवस्था स्वतःच्या प्रयत्नाने प्राप्त होत नाही, साधना करत-करत आपोआपच प्राप्त होते. नामाचार्य हरिदास ठाकूर उपरोक्त प्रकारे ३ लाख हरिनामांचा जप करायचे.

जर मनुष्यजन्म सफल करायचा असेल, तर अजूनही वेळ आहे, जागे होणे श्रेयस्कर होईल. ही भगवंतांनी प्रदान केलेली ताकीद आहे, माझी नाही. अमूल्य रत्नस्वरूप हरिनामाचा निष्काळजीपणे जप करणे हा एक गंभीर अपराध आहे. यापासून स्वतःला वाचवले पाहिजे.

* * *

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

(१०)

छींडची ढाणी
दिनांक—०१/१०/२००७

परम पूज्य भक्तश्रेष्ठ,

मी अधमाधम दासानुदास अनिरुद्ध दास, सर्व भक्तांच्या युगुल चरणी साष्टांग दंडवत प्रणाम करतो आणि भजन पातळी वाढावी यासाठी प्रार्थना करत प्रेमाने हरिस्मरण करतो.

चांडाळ कलियुगाच्या प्रकोपातून वाचण्याचा एकमेव उपाय—'हरिनाम स्मरण'

याचे प्रत्यक्ष उदाहरण आहेत श्रीचैतन्य-महाप्रभू अर्थात् श्रीशचीनन्दन गौरहरी. त्यांनी आपल्या सर्व भक्तांकडून रोज एक लाख हरिनाम जप करून घेण्यासाठी, घरोघरी जाऊन भगवंतांचा प्रसाद स्वीकारण्याचे एक निमित्त केले. खरे तर, त्यांना या चांडाळ कलियुगापासून वाचवण्यासाठी त्यांच्याकडून रोज एक लाख हरिनाम जप करून घ्यायचा होता.

'दररोज एक लाख हरिनामाचा जप करायचा आहे' म्हणून भक्तांनी घाबरून जाऊ नये. सहा महिने रोज एक लाख हरिनाम केल्यास उत्तम सराव झाल्याने फक्त ३.५ तास लागतील. सुरुवातीला एक लाख हरिनामाचा जप करायला ६ ते ८ तास लागू शकतात. सराव झाल्यानंतर, एका माळेचा जप २ ते २.५ मिनिटांतही होतो. एक लाख हरिनाम जप केल्याने दहाही दिशांतील अडथळे दूर होतील. गौरहरींच्या गॅरंटीनुसार (हमीनुसार) तुमचे रक्षण होत राहील. प्रत्यक्ष अनुभवण्याजोगे तथ्य सिद्ध करण्यासाठी पुराव्याची गरज नसते. कोणीही हे आजमावून पाहू शकतो की काय चमत्कार होतो. तुमच्या कुटुंबावर, शेजाऱ्यांवर आणि तुम्हाला भेटणाऱ्यांवर तुमचा प्रभाव पडत राहील. चारी दिशांना रामराज्य होईल. श्रीगौरहरींच्या आदेशाचेही पालन होईल.

भगवंतांची गॅरंटी (हमी)

माझ्या आराध्य भगवंतांची गॅरंटी (हमी) आहे की दररोज जो भक्त हरिनामाच्या चार माळांचा जप कानाने ऐकून करेल, त्याला रोमांच, अश्रू इत्यादी सात्त्विक-विकार जाणवू लागतील. परंतु, भक्त जर भक्त-अपराध आणि मान-प्रतिष्ठेपासून दूर राहिला, तरच अशी स्थिती येईल. ज्या भक्ताचे मूळ उद्दिष्ट भगवंतांना प्राप्त करणेच असेल, त्याला लवकरच वरील स्थिती प्राप्त होईल. वरील दोन अडथळे (भक्त-अपराध आणि मान-प्रतिष्ठा) नास्तिकतेची भावना निर्माण करतात आणि अश्रद्धा वाढवतात.

रोज एक लाख हरिनामाचा जप केल्याने जो वेळ व्यर्थ जात होता, त्याचा सदुपयोग होईल. गेल्या दोन-तीन वर्षांपासून अनेक भक्त एक लाख ते सव्वा लाख हरिनाम जप करत आहेत. याचे मुख्य कारण आहे श्रीगुरुदेवांचा स्वप्नात मिळालेला आदेश —'स्वतः ३-४ लाख जप करा आणि इतरांना एक लाख जप करण्याची प्रार्थना करा.' हे ते माझ्या शक्तीने करत नाहीत. मी तर फक्त एका माईकचे (ध्वनिवर्धक यंत्राचे) काम करत आहे, माझ्या मागे श्रीगुरुदेवांचा आदेश कार्य करत आहे. मलाही भगवंतांकडून कृपेच्या रूपात कमिशन (दलाली किंवा अडत) मिळत राहते, याच कारणामुळे मी इतका जप करण्यास सक्षम आहे. आपल्या स्वतःच्या शक्तीने कोणीही इतका हरिनाम जप करण्यास समर्थ नाही.

हरिनामाचे महत्त्व

कलियुगाचा धर्म हरिनामाचा जप तसेच कीर्तन करणे आहे, तो जर होत नसेल, तर द्वापर-युगाचा धर्म—श्रीविग्रहांची पूजा करणे —कसा फळ देई शकेल? एखादा विद्यार्थी पहिली इयत्ता पास झाला नाही आणि त्याने थेट बी. ए. मध्ये अर्थात् कला शाखेच्या पदवीसाठी प्रवेश घेतला तर तो बी. ए. मध्ये शिकू शकेल? **'प्रत्येक काळे अक्षर नुसते म्हशीसारखे'** अशी त्याची बिकट अवस्था होईल. अर्थात् तो पूर्णतः निरक्षर असेल. जेव्हा मंदिराचा पुजारी एक लाख हरिनामाचा जप करेल, तेव्हाच भगवान त्याची पूजा स्वीकारतील, अन्यथा ते दगडासारखे बनतील आणि दर्शकांनाही दगडाच्याच रूपात दिसतील. हरिनामच तुम्हाला भावनिक दृष्टी देईल. दुर्गुण नष्ट होऊन सद्गुण अंतःकरणात वास करतील. हरिनामाची

आवड नसण्याचे मुख्य कारण आहे—नामनिष्ठ संतांच्या संगतीचा अभाव, नामापराध आणि मान-प्रतिष्ठेची भूक.

जोपर्यंत श्रीगौरहरींच्या आदेशाचे पालन होत नाही, तोपर्यंत तुम्ही 'चांडाळ' कलियुगापासून वाचू शकत नाही. घरात भांडणे, रोगांचा हल्ला, खटले लागणे, घरातील समृद्धी संपणे, शेजाऱ्यांशी भांडणे, रोजगार नसणे, चारित्र्य बिघडणे, स्त्रियांचे दूषित होणे, आईवडिलांची परवानगी न घेता मुलगा किंवा मुलगीने स्वतःच लग्न करून करणे, आई-वडिलांचे मत महत्त्वाचे न मानणे इत्यादी मर्यादांचे उल्लंघन होत राहील. जो एक लाख हरिनाम जप करेल, त्याला गौरहरी एक क्षणासाठीही सोडून जाणार नाहीत. ज्या घरात गौरहरी वास करतील, त्या घरात कलियुगाचा प्रवेशच होणार नाही, त्यामुळे वरील समस्या येणारच नाहीत. असे आता प्रत्यक्षात दिसतही आहे.

म्हणून, माझी हात जोडून सर्वांना प्रार्थना आहे की आतापासूनच एक लाख हरिनामाचा जप करायला लागा. यात माझेही भले आहे आणि जप करणाऱ्याचेही भले आहे. याच जन्मात मनुष्यजन्म सफल होईल आणि दुःखाच्या सागरातून पार पडू, ही किती मोठी प्राप्ती आहे, त्याचे वर्णन करता येत नाही!

हरिनामाची अवर्णनीय महिमा—

(१) **कहाँ कहाँ लगि नाम बड़ाई।**
रामु न सकहिं नाम गुन गाईं॥

अर्थ—मी हरिनामाचे माहात्म्य कितपत वर्णन करू, जेव्हा भगवान् श्रीराम स्वतःही आपल्या नामाच्या गुणांचे गायन करू शकत नाहीत.

(२) **बिबसहुं जासु नाम नर कहहीं।**
जनम अनेक रचित अघ दहहीं॥

अर्थ—जे विवश होऊनही नामजप करतात, त्यांच्या अनेक जन्मांतील पापकर्मे जळून भस्म होतात.

(३) **जासु नाम जप एक ही बारा।**
उतरहिं नर भव सिंधु अपारा॥

अर्थ—फक्त एकदाच भगवान् श्रीरामांचे नामस्मरण केल्याने मनुष्य या अथांग भवसागरातून पार होतो.

(४) **जासु नाम जप सुनहू भवानी।**
भवबंधन काटहि नर ज्ञानी॥

अर्थ—महादेव शंकर पार्वतीदेवींना सांगत आहेत—"हे भवानी, ऐक, भगवान् श्रीरामांच्या पवित्र नामाचा जप करून ज्ञानी मनुष्य अर्थात् विवेकी पुरुष भौतिक जगाचे बंधन तोडून टाकतात अर्थात् ते जन्म व मृत्यूच्या चक्रातून बाहेर पडतात."

(५) **भायँ कुभायँ अनख आलसहूँ।**
नाम जपत मंगल दिसि दसहूँ॥

अर्थ—चांगल्या भावनेने (प्रेमाने), वाईट भावनेने (द्वेषाने), रागाने किंवा आळसाने, कोणत्याही प्रकारे हरिनामाचा जप केल्यास दहाही दिशांमध्ये कल्याण होते व सर्वत्र मंगलमय वातावरण पसरते.

(६) **नाम प्रभाव जान शिव नीको।**
कालकूट फल दीन्ह अमीको॥

अर्थ—रामनामाचा प्रभाव महादेव श्रीशंकरांना चांगल्या प्रकारे माहीत आहे. या हरिनामाचाच प्रभाव होता की 'कालकूट' अथवा 'हलाहल' विष प्राशन करून सुद्धा महादेव शंकरांना काहीही इजा पोहोचली नाही उलट हलाहल विषसुद्धा त्यांच्यासाठी अमृतासारखे गोड व पौष्टिक फळ देणारे ठरले.

(७) **नाम प्रसाद शम्भु अविनाशी।**
साज अमंगल मंगल राशी॥

अर्थ—रामनामाच्याच कृपेने महादेव शंकर अविनाशी आहेत आणि अमंगल वेष धारण करूनही ते मंगलकारी राशी आहेत. पवित्र हरिनामाच्या कृपेने शंभू (शिव) अमर आहेत—जरी ते भयंकर आणि अशुभ भासत असले तरी ते मंगलमयतेचे अखंड भांडार आहेत.

(८) **नाम सप्रेम जपत अनयासा।**

भक्त होय मुद मंगल वासा॥

अर्थ—भक्त प्रेमाने हरिनामाचा जप करत सहजपणे आनंद आणि कल्याणाचे निवासस्थान बनतात.

(९) **कह हनुमंत बिपति प्रभु सोईं।**
जब तव सुमिरन भजन न होई॥

अर्थ—हनुमान भगवान् श्रीरामचन्द्रांना म्हणाले—हे प्रभू! खरी विपत्ती तेव्हाच येते, जेव्हा तुमचे भजन आणि स्मरण होत नाही.

(१०) **जिन्ह कर नामु लेत जग माहीं।**
सकल अमंगल मूल नसाहीं॥

अर्थ—भगवान श्रीराम यांच्या पवित्र नामाचे उच्चारण करताच जगातील सर्व अमंगल व अशुभ गोष्टींची पाळेमुळे नष्ट होतात.

(११) **उल्टा नाम जपा जग जाना।**
बाल्मीकि भए ब्रह्म समाना॥

भावार्थ—रत्नाकर नावाच्या दरोडेखोराला श्रीनारद-मुनींनी 'राम' या नामाचा जप करण्याचा उपदेश दिला. परंतु तो असे करू शकला नाही, म्हणून त्याने 'मरा, मरा, मरा' असा उलटा जप केला. या उलट्या नामजपाच्या प्रभावानेही तो डाकू सिद्ध-महात्मा (भूतकाळ, भविष्यकाळ व वर्तमानकाळातील सर्व घटनांचा ज्ञाता) आणि परम रामभक्त महर्षी वाल्मीकी बनला. त्या महर्षी श्रीवाल्मीकींनीच श्रीरामायण महाकाव्याची रचना केली.

(१२) **जाना चहहिं गूढ़ गति जेऊ।**
नाम जीहँ जपि जानहिं तेऊ॥

अर्थ—ज्यांना परमात्म्याचे गूढ रहस्य अर्थात् त्यांची यथार्थ महिमा जाणून घ्यायची आहे, अशा जिज्ञासू व्यक्तीदेखील जिभेने हरिनामाचा जप करून ते गूढ रहस्य जाणून घेतात.

(१३) **राम नाम का अमित प्रभावा।**
सन्त पुराण उपनिषद गावा॥

अर्थ—संत, पुराणे आणि उपनिषदांनी रामनामाच्या असीम प्रभावाचे गायन केले आहे.

(१४) **नाम जीहँ जपि जागहिं जोगी।**
बिरति बिरंचि प्रपंच बियोगी॥

अर्थ—ब्रह्मदेवांनी तयार केलेल्या या प्रपंचातून अर्थात् दृश्य जगातून पूर्णपणे मुक्त झालेले वैराग्यवान मुक्त भक्तियोगी पुरुष या हरिनामाचाच जिभेने जप करत तत्त्वज्ञान-रूपी दिवसात जागे राहतात.

* * *

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

(११)

छींडची ढाणी
दिनांक—१९/०१/२००७

कर्मच श्रेष्ठ आहे

जेव्हापासून जीवात्मा भगवंतांपासून वेगळा झाला आहे, तेव्हापासून तो अशांतीत भटकत आहे. याचे मुख्य कारण आहे—त्याचे कर्म! कर्म चांगली आणि वाईट—अशा दोन प्रकारची असतात. चांगल्या कर्माने शांती मिळते, तर वाईट कर्माने अशांती. भगवंतांनी सर्व प्राण्यांना जन्म दिला आहे, त्यामुळे सर्व प्राणी भगवंतांच्या पुत्रांसारखे आहेत. जेव्हा एखादा प्राणी दुसऱ्या प्राण्याचे वाईट करतो, तेव्हा भगवान त्याला आपल्या 'माया' नामक शक्तीद्वारे शिक्षा (दंड) प्रदान करतात. जो प्राणी दुसऱ्या प्राण्याचे भले करतो, त्याला भगवंतांच्या 'माया' नामक शक्तीची मदत मिळते आणि भगवान त्याला धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष देऊन सुख प्रदान करतात.

जो जीव दुसऱ्या जिवांना भगवंतांच्या घरी (वैकुंठ-धामात अथवा गोलोक वृंदावनात) पोहोचवण्याचे भले कार्य करतो, म्हणजेच शास्त्रांमध्ये वर्णन केलेल्या गोष्टी सांगून मनुष्याला भगवंतांच्या भक्तीमध्ये लावतो, त्याच्यावर भगवंतांची अपार कृपा बरसते. शिव (महादेव शंकर) आपली पत्नी उमादेवींना सांगत आहेत—

परहित सरिस धर्म नहिं भाई।
पर पीड़ा सम नहिं अधमाई॥

अनुवाद–हे प्रिय पार्वतीदेवी, या जगात भक्तिमार्गाचा उपदेश करून इतरांचे भले करण्यासारखा कोणताही धर्म नाही आणि इतरांना पीडा देण्यासारखे कोणतेही पाप नाही.

मानवाद्वारे कर्म होतच राहतात, कर्म केल्याशिवाय जीवन जगता येत नाही. कर्म मन, वचन (वाणी) आणि शरीराने होतात. कर्माचे तीन प्रकार आहेत—(१) संचित, (२) प्रारब्ध आणि (३) क्रियमाण. मानवाशिवाय कोणताही प्राणी कर्म करत नाही, केवळ मानवच कर्माने बांधला जातो. तो अनेक वेळा ८४ लाख योनींमध्ये

भटकून आला आहे. त्यात त्याला अनेकवेळा मनुष्य-देह मिळाला आहे. त्यामध्ये, त्याने तिन्ही प्रकारची कर्म केली आहेत. हे सर्व कर्म संचित होऊन त्याला काही प्रमाणात प्रारब्ध-कर्माच्या रूपात मिळत राहतात आणि जीव त्यांना भोगत आपले जीवन जगत राहतो. जेव्हा प्रारब्ध-कर्म संपते, तेव्हा मृत्यूनंतर त्याच्या स्वभावाप्रमाणे आणि मनातील भावनांनुसार तो दुसऱ्या शरीरात जातो. नंतर जेव्हा त्याला पुन्हा मनुष्य-देह मिळतो, तेव्हा तो क्रियमाण-कर्म करतो, जे त्याच्या संचित-कर्मामध्ये जोडले जाते. पुन्हा या संचित कर्मामधून, एक भाग त्याला प्रारब्ध-कर्माच्या रूपात मिळतो. अशा प्रकारे हे चौऱ्याऐंशी लाख योनींचे चक्र सतत चालूच राहते.

जेव्हा कधीतरी चांगली सुकृती उदय होते, तेव्हा मनुष्याला भगवंतांच्या कृपेने साधूंचा संग मिळतो. तेव्हा मानव सद्गुरूंचा आश्रय घेतो. सद्गुरुदेव त्या जीवाचा हात भगवंतांच्या हातात देतात. भगवंतांच्या हातात गेल्याने त्याचे अनेक जन्मांतील संचित-कर्म जळून राख होतात. भगवंताचे वाक्य आहे—

सन्मुख होइ जीव मोहि जबहीं।
जन्म कोटि अघ नासहिं तबहीं॥

अनुवाद—जेव्हा जीव मला शरण येतो, तेव्हा त्याने कोट्यवधी जन्मांत केलेली पाप-कर्म लगेच नष्ट होतात.

आता त्याचे जीवन प्रारब्ध-कर्माने चालू राहते. जर क्रियमाण-कर्माला सांभाळले, तर त्याचे जन्म-मृत्यूचे भयानक दुःख कायमचे संपेल. (आपण सध्या करत असलेल्या कर्माला क्रियमाण-कर्म असे म्हणतात.) म्हणजेच, जर कोणी मानव प्रेममय भक्तिमार्गावर चालून अर्थात् हरिनामाच्या श्रद्धापूर्वक जपाद्वारे अंतःकरणातून भगवंतांना शरण गेला, तर तो मानव आपल्या खऱ्या घरी, म्हणजेच भगवंतांच्या कुशीत जाईल. त्यामुळे सर्व गोंधळच संपेल. याचा अर्थ असा की, आपला स्वभाव सुधारून भगवंतांच्या कुशीत जाणे सर्वात चांगले आहे. जोपर्यंत स्वभाव बिघडत राहील, तोपर्यंत भगवंतांच्या माया-शक्तीद्वारे शिक्षा अर्थात् दंड होत राहील. कलियुगात हरिनाम हे एकमेव असे औषध आहे, जे सर्व रोग दूर करू शकते. हरिनाम स्वतः 'शब्द-ब्रह्म' आहे. हरिनामाचा जप करणारा साधक भगवंतांच्या चरणीच राहतो, म्हणजे समोरच राहतो. हरिनामाचा जप केल्याने संचित-कर्मांचा नाश होतो. जेव्हा भक्ती

केल्याने संचित-कर्मच राख होतील, तर प्रारब्ध-कर्म कुठे उरतील? केवळ क्रियमाण-कर्मांद्वारेच जीवन चालू राहील. जर क्रियमाण-कर्म फक्त भक्तीशी संबंधित असतील, तर अंतिम घडीला जेव्हा मृत्यू येईल आणि स्वभाव भक्तिमय असेल, तेव्हा मन (अंतःकरण) भगवंतांशी जुळल्याने जन्म-मृत्यूच्या चक्राचा अंत होईल.

एखाद्या कुटुंबातील एक व्यक्ती भगवंताला प्रिय झाली, तर भगवान तिच्या २१ पिढ्यांना आपल्या धामात बोलावून घेतील. जर एका नावेत पापी बसला तर तो सर्वांना बुडवून टाकेल, आणि एक भक्त बसल्यास तो सर्वांना किनाऱ्यावर पोहोचवेल. कलियुगात प्रत्येक मनुष्याला किती सुंदर, सोपी संधी मिळाली आहे. तरीही, दुर्दैवी माणूस ही सुवर्णसंधी खाणे-पिणे, मौज-मस्ती, मैथुन इत्यादीमध्ये घालवतो. त्याच्या मूर्खपणाचीही हद्द झाली आहे. त्याला माहीत नाही की एक दिवस इथून जावेच लागेल. अरे मूर्खा, का झोपला आहेस? आपले नुकसान करूनही दुसऱ्यांचे भले केले पाहिजे, कारण सर्वजण भगवंताची मुले आहेत. वाईट केल्याने भगवान नाराजच होतील. एखाद्या अज्ञानी व्यक्तीला धर्मशास्त्रांचा उपदेश देऊन भगवंताच्या भक्तीची व हरिनामाची गोडी लावणे—हाच सर्वात महान परोपकार आहे. याहून मोठा परोपकार त्रिलोकात (तिन्ही लोकांमध्ये) आणि अनंत-कोटी ब्रह्मांडांमध्ये इतर कोणताही नव्हे. हाच विचार करून मी एकामागून एक हरिनामाच्या संबंधित पत्रे लिहून भगवंतांची कृपा प्राप्त करत राहतो. माझ्या शक्तीने काहीही होऊ शकत नाही. भगवंतांच्या कृपेनेच माझा एक लाख हरिनामाचा जप ब्राह्म-मुहूर्ती विरहाच्या सागरात निमग्न होऊन होत राहतो. मी जितका माझ्या भजनाचा प्रचार करतो, तितके माझे भगवंतांप्रतीचे आकर्षण वाढते. माझे आचरण पाहून जर एकही माणूस भक्तीमध्ये रममाण झाला, तर माझे निश्चितच कल्याण होईल. दिवसा विरह खूप कमी असतो. भगवान आणि तुमच्या भक्तांच्या कृपेने दिवसाही विरह होऊ लागेल, असा मला पूर्ण विश्वास आहे! एखादे बाळ रडत असताना आई ते सहन करू शकते का? कधीच नाही! भगवान तर वात्सल्य-भावनेची असीम मूर्ती आहेत, ते भक्ताचे रडणे कसे सहन करू शकतील? मी माझ्या आयुष्यात भगवंतांच्या कृपेचा अनुभव किती वेळा घेतला आहे, याचा काही अंदाज नाही. माझ्यावर संकट येताच भगवंतांना

ते संकट दूर करावे लागले. माझ्या भजनाबद्दल व मी करीत असलेल्या दैनिक हरिनामाच्या जपाबद्दल भक्तांना सांगितल्याने त्यांची श्रद्धा अधिकच वृद्धिंगत होते. मला स्वतःच्या साधन-भजनाबद्दल इतरांना सांगण्यात काहीही नुकसान दिसत नाही, म्हणून मी सर्वांना त्याबद्दल सांगतो. लिहिला जाणारा प्रत्येक लेख कोण्या अदृश्य शक्तीद्वारेच लिहिला जातो. मी खोटे बोललो तर पापाचा वाटेकरी होईन, कारण माझे अंतःकरण किती वाईट आहे—हे मला माहीत आहे. मला केवळ संतांचाच आधार आहे.

* * *

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

(१२)

चंदीगढ

दिनांक—०५/०६/२००७

चिरंजीव रघुवीर, अंबरीष, हरि-ओम् आणि मुलांनो, हरिनामामध्ये आपली आवड वाढो.

हरिनामामुळे कोणत्याही गोष्टीची कमतरता राहत नाही

ज्या मनुष्याला हरिनामस्मरणाची चटक लागली आहे, म्हणजेच व्यसन लागले आहे, तो अनंत-कोटी अखिल ब्रह्मांडांच्या संपत्तीचा स्वामी बनला आहे. तो असा का बनला? याचे कारण आहे, त्याने भगवंतांना विकत घेतले आहे. ज्याप्रमाणे मीराबाई म्हणतात—

लियो जी मैं तो लियो गोविंदो मोल,
कोई कहे चौडे, कोई कहे छाने,
लियोजी बजन्ता ढोल।
कोई कहे सूंगो कोई कहे महंगो,
लियोजी तराजू तोल॥

अनुवाद—मी गोविंदांना विकत घेतले आहे. कोणी म्हणते की मीराबाईंनी हा सौदा गुप्त-रीत्या पार पाडला तर कोणी म्हणते की त्यांनी हा सौदा सर्वांसमक्ष ढोल वाजवून केला म्हणजे पूर्ण गावात गवगवा करून केला. कोणी म्हणते की हा सौदा स्वस्त पडला तर कोणी म्हणते की हा सौदा महाग पडला; मी मात्र तराजूत तोलून गोविंदांना खरेदी केले आहे.

याचप्रकारे, जो साधक नेहमी हरिनामाचे प्रेमपूर्वक रात्रंदिवस उच्चारण करीत आपले जीवन जगतो, भगवान् गोविंद त्याचेच बनतात अर्थात् त्या साधकाच्या अधीन होऊन जातात. त्याला सोडून भगवान कुठेही जात नाहीत. संपूर्ण सृष्टीची रचना करणारे भगवानच आहेत. भगवंतांशिवाय सृष्टीत काहीही नाही.

हरिनाम जप करणाऱ्याला याच जन्मात धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांची प्राप्ती होते. त्याचे सर्व सांसारिक काम सोपे होते. जो अनंत-कोटी जन्मांपासून भगवंतांच्या कुशीपासून

वेगळा होऊन भटकत आहे, आता तो त्यांच्या कुशीत जाऊन बसला. त्याने आपल्या पूर्वजांच्या २१ पिढ्यांना आपल्यासोबत भगवद्-धामाला नेऊन त्यांचा उद्धार केला. जसे की भगवंतांचे वाक्य आहे—

कृतजुग जेता द्वापर, पूजा मख अरु जोग।
जो गति होइ सो कलि, हरि नाम ते पावहिं लोग॥
कृतयुगी ध्यान, द्वापर पूजा। त्रेतायुगी यज्ञ, मख आराधना॥
जे फळ मिळे त्या काळी। हरिनामे कलियुगी तेच लाभे॥

सत्ययुगात हजारो वर्षे भगवंतांचे ध्यान केल्याने, त्रेतायुगात खूप धन खर्च करून यज्ञ केल्याने, द्वापरयुगात मोठ्या श्रद्धेने मंदिरात भगवंतांच्या श्रीविग्रहाची पूजा केल्याने भगवान दर्शन देत असत. तीच गती कलियुगात खोलीत पंखा-हीटर लावून, शांत मनाने बसून, हरिनाम जप केल्याने मिळू शकते. कुठेही जंगलात जाण्याची, ऊन-थंडी, पाऊस, भूक-तहान सहन करण्याची आवश्यकता नाही. पण माणूस किती दुर्दैवी आहे, इतकी सोय असूनही हरिनामाचा जप करत नाही. याची शिक्षा त्याला भविष्यात भोगावी लागेल. चौऱ्याऐंशी लाख योनींमध्ये जन्म घेऊन अमाप दुःख भोगावे लागेल.

कलियुगात कोट्यवधी माणसांपैकी कोणीतरी एकच भगवंतांना प्राप्त करू इच्छितो. प्रत्येकजण धन, वैभव, नोकरी, पुत्र इत्यादी प्राप्त करू इच्छितो, भगवंतांना कोणीही प्राप्त करू इच्छित नाही. कलियुगात भगवंतांचे ग्राहक नाहीत. ग्राहकांशिवाय भगवंतांचे मन लागत नाही. भक्तांमुळेच भगवंतांचे जग चालते, त्यामुळे भगवंतांना भक्तांची खूप गरज असते. जर कोणी थोडेसेही साधन-भजन केले, तर भगवान खूप लवकर प्रसन्न होतात. जसे की भक्त प्रह्लाद आपल्या शाळेतील सोबत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना (सहाध्यायांना) सांगत आहेत की भगवंतांना प्राप्त करणे कठीण नाही. महादेव शंकर उमादेवींना हरिनामाचे माहात्म्य सांगत आहेत—

जासु नाम जप एकहि बारा।
उतरहिं नर भव सिंधु अपारा॥
ज्याचे नाम जपले एकदाच। भवसागर पार होई सहज॥
केवळ हरिनामाचा आधार। मुक्तीचा मार्ग होई साकार॥

अनुवाद—भगवान श्रीरामांच्या पवित्र नामाचे केवळ एकदाच उच्चारण केल्याने मनुष्य या अथांग भवसागरातून अनायासेच पार होतो.

जासु नाम जप सुनहू भवानी।
भव बंधन काटहि नर ज्ञानी॥

अनुवाद—हे भवानी (उमादेवी), मी हरिनामाचे गुह्य माहात्म्य सांगत आहे. ते लक्ष देऊन ऐकावे. भगवान श्रीरामांच्या पवित्र नामाचा जप करून ज्ञानी अर्थात् विवेकी मनुष्य जागतिक बंधनातून मुक्त होऊन वैकुंठ-लोकाची प्राप्ती करतो.

निष्कर्ष असा निघतो की जर कोणत्याही साधकाने कानाने ऐकून हरिनामाच्या एक माळेचा जरी जप केला, तर भगवान त्याला आपलेसे करतात, कारण एक माळ जप 'हरे कृष्ण' महामंत्राचा जप केल्याने १७२८ वेळा हरिनामाचे उच्चारण होते. [एका माळेत १०८ मणी असतात आणि 'हरे कृष्ण' महामंत्रात भगवंतांची १६ नावे आहेत. १०८ गुणिले १६ = १७२८.] तो इतक्या वेळा भगवंतांना हाक मारतो, पण जप करताना मन सोबत असणे आवश्यक आहे. जर मन इकडे-तिकडे भटकले, तर भगवान येणार नाहीत, कारण ते अंतर्यामी आहेत. भगवान प्रत्येक ठिकाणी प्रत्येक क्षणी उपस्थित असतात. हाक मारण्याचा फक्त अवकाश आहे, हाक मारताच ते लगेच प्रकट होतात. ज्याप्रमाणे १ किंवा २ वर्षांचे बाळ 'आई-आई' असे रडून आपल्या आईला बोलावून घेते, त्याचप्रमाणे भक्त पवित्र-नामाचे उच्चारण करून भगवंतांना बोलावून घेतो. किती सोपे आणि सरळ साधन आहे, तरीही मूर्ख मानव बेशुद्ध होऊन झोपलेला असतो. वेळ वाया घालवून, जीवन नष्ट करत राहतो. त्याला माहीत नाही की काळ जबडा फाडून त्याचा ग्रास घेण्यासाठी उभा ठाकला आहे, तो अचानक गिळून टाकेल. मग रडत-रडतच हे जग सोडून जावे लागेल.

मन आणि कान जेव्हा संलग्न होतील तेव्हाच साधक मन, बुद्धी, चित्त व अहंकारात्मक अंतःकरणाद्वारे भगवंतांना हाक मारू शकेल; जर भगवंतांच्या नाम उच्चारणात मन रमत नसेल तर दोन्ही कानही ते हरिनामाचे उच्चारण अजिबात ऐकणार नाहीत.

राम नाम सब कोई कहे, दशरथ कहे न कोय।
एक बार दशरथ कहे, तो कोटि यज्ञ फल होय॥

अनुवाद—भगवान श्रीरामांच्या पवित्र 'राम' या द्विअक्षरी (दोन अक्षरांच्या) नामाचा जप तर सगळेच साधक करतात. परंतु साधकाने एकदाच 'दशरथ' या नावाचे उच्चारण केल्यास त्याला कोट्यवधी यज्ञांचे फळ मिळते. यात काहीही संशय नाही. अर्थात् साधकाने आपल्या दहा इन्द्रियांच्या (पाच कर्मेन्द्रियांच्या तसेच पाच ज्ञानेन्द्रियांच्या) वेगाचे दमन करून जर भगवंतांच्या नामाचे उच्चारण केले तर त्याला अगणित फळाची प्राप्ती होते.

कर में तो माला फिरे, जीभ फिरे मुख माहि।
मनवा तो चहूँ दिशि फिरे, यह तो सुमिरन नाहि॥

अनुवाद—हरिनामाचा जप करतात हाताच्या बोटांद्वारे माळ फिरते आहे, जीभ तोंडात फिरते आहे, पण मन चारही दिशांना भटकते आहे, याला भगवंतांचे स्मरण म्हणता येणार नाही.

लोक म्हणतात की आमचे मन एका जागी स्थिर होत नाही. ही निरर्थक गोष्ट आहे. परीक्षार्थी (महत्त्वाची परीक्षा देणारा विद्यार्थी) तीन तास परीक्षा देतो, पण जर त्याचे मन प्रश्नांची उत्तरे लिहीण्यात स्थिर झाले नाही तर तो नक्कीच नापास होईल. मग तिथे त्याचे मन तीन तास कसे स्थिर होते? याचा अर्थ असा लोकांना हरिनामाची आवड नाही, त्यामुळे हरिनामाच्या जपात त्यांचे मन रमत नाही. हरिनामासारखा कोणताही लाभ किंवा फायदा या जगात नाही.

लाभ कि कुछ हरिनाम समाना।
जेहि गावहि श्रुति वेद पुराना॥

अनुवाद—हरिनामासारखा कोणताही लाभ किंवा फायदा या जगात नाही. असे नाम-माहात्म्य श्रुती, वेद आणि पुराणेसुद्धा गातात.

हानि कि कछु जग में भाई।
जपिए न नाम नर तन पाई॥

अनुवाद—या जगात सर्वात मोठी हानी कोणती आहे. अहो भाऊसाहेब, मनुष्य-देह प्राप्त करूनही जर आम्ही हरिनामाचा जप करत नसल्यास आम्ही खरोखर स्वतःची मोठी हानी करून घेत आहोत. आर्थिक नुकसानसुद्धा पुढे भरून निघेल. पण व्यर्थ घालवलेल्या अमूल्य काळाचे नुकसान हे कधीही भरून न निघणारे नुकसान आहे.

हरिनामाला महत्त्व दिल्यास साधकाचे जगातील कोणतेही काम अपूर्ण राहत नाही, कारण आता तो साधक हरिनामाचा (भगवंताचा) शरणार्थी बनला आहे. श्रीमद्भगवद्गीतेनुसार 'शरणागती' हाच तिचा प्राण आहे. शरणार्थीला भगवान एका क्षणासाठीही सोडून देत नाहीत.

मम गुन गावत पुलक सरीरा।
गदगद गिरा नैन बह नीरा॥
करहुँ सदा तिन्ह के रखवारी।
जिमि बालक राखइ महतारी॥

अनुवाद—भगवान श्रीराम आपल्या 'भक्त-रक्षण' या ब्रीदाची ग्वाही देताना म्हणतात—माझे प्रेमी-भक्त जेव्हा माझे गुणगान करतात तेव्हा त्यांचे शरीर रोमांचित होते आणि त्यांचा गळा भरून येतो आणि त्यांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागतात. अशा प्रेमी-भक्तांचे रक्षण करण्यासाठी मी नेहेमी असा प्रकारे सज्ज असतो जशी एक प्रेमळ आई आपल्या अबोध बालकाचे किंवा तान्हा मुलाचे रक्षण करण्यासाठी तत्पर असते.

शरणागतीची अवस्था तेव्हाच प्रकट होईल जेव्हा साधकाचे दोन्ही कान आपल्या मनाला सोबत घेऊन हरिनाम ऐकू शकतील. वारंवार हरिनामाचा जप केल्याने भगवंतासाठी तळमळ वाढून डोळ्यांतून अश्रूंचा प्रवाह वाहू लागेल. डोळ्यांतून अव्याहत वाहणारा अश्रूंचा प्रवाह हे शरणागतीचे प्रत्यक्ष रूप आहे. अश्रूंचा प्रवाह न आल्यास शरणागती होणारच नाही.

श्रीरामांची घोषणा—
जौं सभीत आवा सरणाईं।
राखिहँ ताहि प्रान की नाईं॥

अनुवाद—भगवान श्रीरामांचे प्रतिज्ञा-वाक्य असे आहे—"जर कोणी भयभीत होऊन मला शरण आल्यास मी त्या शरणागत व्यक्तीचे रक्षण आपल्या स्वतःच्या प्राणांसारखे करेन." अर्थात् शरणागत भक्ताचे रक्षण हीच भगवान श्रीरामांची प्रतिज्ञा आहे.

हिंसक प्राणीही शरणार्थीला दुःख देणार नाहीत, कारण त्यांच्याही हृदयात भगवान 'परमात्मा' रूपात विराजमान असतात. हिंसक प्राणीही शरणागत व्यक्तीचे मित्र बनतील.

श्रीगौरहरींनी उच्च स्वरात (मोठ्या आवाजातील) कीर्तनाचा शोध लावला. हे कीर्तनही कान आणि मन यांना सलग्न करूनच अर्थात् जोडूनच होते. या कीर्तनात मन बाहेर जात नाही (अर्थात् उच्च स्वरात कीर्तन करताना मन इकडे तिकडे भौतिक विषयांकडे आकर्षित होत नाही). पण उच्च स्वरात कीर्तन केल्याने थकवा लवकर येतो. परंतु हरिनामाचा माळेवर जप करताना तासनतास थकवा जाणवत नाही. जर जप मनातल्या मनात (अर्थात् मानसिकरीत्या) होत असेल, तर म्हातारपणातही खूप जप करता येतो, जसे की आपले वृद्ध संत एकाच ठिकाणी बसून दररोज ५-५ लाख हरिनामाचा जप करत असत. मोठ्या आवाजातील कीर्तन व पठणापासून (मोठ्या आवाजात शास्त्रांचे उच्चारण करण्यापासून) ते दूर राहत असत. अशक्तपणामुळे एकाच ठिकाणी बसून हरिनामाचा जप करत राहायचे.

चंचल मन स्थिर करण्यासाठी प्रसाद घेताना हरिनामाचा जप करत राहावे, जेणेकरून रक्तात सात्त्विकतेचा (अर्थात् सत्त्व-गुणाचा) संचार होईल. सात्त्विकतेमध्ये (अर्थात् जीवन-शैलीत सत्त्व-गुणाचे प्राधान्य असल्यास) मन शांत राहते, तर तामसिकतेत (अर्थात् जीवन-शैलीत तमो-गुणाचे प्राधान्य असल्यास) मन चंचल बनते. पाणी पिताना जर साधकाने हरिनामाचा जप केल्यास ते साधारण पाणीसुद्धा भगवंतांचे चरणामृत बनते. हरिनामाचा जप सतत अभ्यासपूर्वक करीत राहावा. सवय लागल्यास हरिनामाचा जप आपोआप आतल्या आत (अर्थात् मनातल्या मनात) चालू राहतो. निष्कर्ष असा निघतो की जो साधक हरिनामाचा तत्परतेने, श्रद्धेने आणि प्रेमाने संख्यापूर्वक जप करतो, त्याला सांसारिक (ऐहिक) आणि पारलौकिक संपत्ती आपोआप प्राप्त होते. सर्वजण त्याचे मित्र बनतात.

जापे कृपा राम की होई।
तापे कृपा करे सब कोई॥

अनुवाद—ज्या व्यक्तीवर भगवान् श्रीरामांची कृपा होते, त्या व्यक्तीवर सर्वजण आपोआपच कृपा करतात.

मला हे दिसत आहे की दररोज ३ लाख हरिनामाचा जप करणे हे अतिशय प्रभावशाली साधन आहे. याच्या प्रभावाचा मला प्रत्यक्ष अनुभवसुद्धा येत आहे. मठातील आणि बाहेरीलही सर्व भक्त

माझ्यावर अतोनात प्रेम करतात. कोणत्याही गोष्टीची कमतरता नाही. मी इच्छा नसतानाही सर्व सेवा मोठ्या श्रद्धेने होत आहेत.

* * *

न कलि कर्म न भक्ति विवेकु।
रामनाम अवलम्बन एकू॥

(श्रीरामचरितमानस)

अनुवाद—कलियुगात ज्या व्यक्तींनी जन्म घेतला आहे त्या सर्व सत्कर्मविहीन, भक्तिविहीन आणि विवेकविहीन आहेत. त्यामुळे कलियुगात जन्म घेतलेल्या व्यक्तींसाठी रामनामाचा तुळशी-माळेवर जप तसेच उच्च स्वराने संकीर्तन हाच एकमेव आधार व उद्धारासाठी उपाय आहे.

* * *

आयुषः क्षण एकोऽपि न लभ्य स्वर्णकोटिभिः।
स चेन्निरर्थक नीतः का च हानिस्ततोऽधिका॥

(चाणक्य-नीती)

अनुवाद—कोट्यवधी सोन्याची नाणी देऊनही जीवनातील हकनाक गमावलेला एक क्षणही कधीच परत मिळणार नाही. त्यामुळे हरिनामाचा जप न करता इतर व्यर्थ कार्यात घालवलेल्या वेळेपेक्षा मोठी हानी कोणती असू शकते?

उपरोक्त श्लोकाचे सार हे आहे की प्रयत्नपूर्वक नेहमी हरिनामाचाच आश्रय घ्यावा.

* * *

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

(१३)

चंदीगड

दिनांक—११/०९/२००७

परम–आदरणीय भक्तगण,

मी अधमाधम दासानुदास अनिरुद्ध दास, तुम्हाला दंडवत प्रणाम करतो आणि भजन स्तर वाढवण्यासाठी हात जोडून प्रार्थना करतो.

हरिनामात रूची का नसते?

१. संसारात आसक्ती—याचे पहिले आणि मुख्य कारण म्हणजे भौतिक जगाप्रतीची आसक्ती. मनात दोन प्रकारच्या आसक्ती असतात. एक जागतिक आसक्ती आणि दुसरी पारमार्थिक, म्हणजेच संत आणि भगवंतांप्रती आसक्ती. जेव्हा एक आसक्ती नाहीशी होते, तेव्हा दुसरी आसक्ती सहजपणे अंतःकरणात ओतप्रोत भरली जाते.

२. शारीरिक व्याधी—हरिनामाची आवड नसण्याचे दुसरे कारण शारीरिक आजारपण आहे. जेव्हा शरीरात कोणताही रोग असतो, तेव्हा मनाचा कल त्या वेदनेकडे असतो. अर्थात् रोग व वेदनेवर मन केंद्रित झाल्याने रोगी साधकाचे मन हरिनामात रमू शकत नाही.

३. पूर्व जन्मांचे संस्कार—तिसरे कारण म्हणजे पूर्व जन्मांचे संस्कार. साधूंचा संग नसल्यामुळे चांगले संस्कार जागृत होत नाहीत.

४. कुसंगती—चौथे कारण कुसंगती (वाईट संगती) आहे, जसे की दूरदर्शन (टेलीविझन) पाहाणे, वर्तमानपत्रे वाचणे आणि मोबाईल फोनचा अतिवापर करणे. यांच्या कुसंगतीमुळे सांसारिक वासना जागृत होतात, ज्या हरिनामाचा जप करताना अंतःकरण दूषित करत राहतात.

५. आंतरिक शत्रूंचा हल्ला—पाचवे कारण आहे—काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार, ईर्ष्या आणि द्वेषाचा हल्ला. यामुळे

हरिनामस्मरणात अडथळे येतात आणि हे शत्रू निर्माण झालेल्या सात्त्विक भावनांना नष्ट करतात.

६. परनिंदा—हरिनामात रूची उत्पन्न न होण्याचे सहावे कारण आहे साधकांद्वारे केली गेलेली परस्परांची निंदा. त्या परनिंदेतसुद्धा "साधू आणि भगवंतांची निंदा करणे आणि ऐकणे" हा अत्यंत भयंकर अपराध मानला जातो. अशा साधुसंतांची तसेच भगवंतांची निंदा करणाऱ्या लोकांशी तर संभाषणसुद्धा करू नये. भगवंताची निंदा करण्याचा अर्थ आहे श्रीमद्भागवत व श्रीमद्भगवद्गीता इत्यादी धर्मग्रंथांना भौतिक आणि प्राकृत मानून त्यांची निंदा करणे.

७. ज्ञानमार्गात भरकटणे—हरिनामात रूची उत्पन्न न होण्याचे सातवे कारण आहे ज्ञानमार्गात भरकटणे. ज्ञानी स्वतःलाच भगवान म्हणतो. हा विचारच भक्तीमार्गाचा मोठा शत्रू आहे, कारण या ज्ञानमार्गात भगवंतांच्या प्रती सेवेची भावना नगण्य असते.

तसे पाहिले तर हरिनामाच्या जपात रूची नसण्याची आणखीही बरीच कारणे आहेत, पण ही सात मुख्य कारणे आहेत. जर या सात कारणांपासून स्वतःचा बचाव केला, तर हरिनामाचा जप करण्यातील गोडी निश्चितच वाढेल. या प्रत्यक्षपणे अनुवण्याजोग्या तथ्यास सिद्ध करण्यासाठी पुराव्याची काही गरज नाही, कोणीही स्वतः आजमावून पाहू शकतो.

यापासून बचाव कसा करावा?

या हरिनामातील साधकाच्या गोडी व आवडीचा नाश करणाऱ्या कारणांपासून स्वतःचा बचाव करण्याचा एकच उपाय आहे —

"Chant *hari-nāma* sweetly and listen by ears"

अनुवाद—गोड आवाजात जीभेद्वारे हरिनामाचा जप करावा आणि आपल्या कानांद्वारे तो जप एकाग्रतेने ऐकावा.

सादर सुमिरन जे नर करहीं।
भव बारिधि गोपद इव तरहीं॥

अनुवाद—जो मनुष्य प्रेमाने व आदरपूर्वक भगवान् श्रीरामांच्या पवित्र नामाचे स्मरण करतो, तो संसाररूपी महासागर सहजपणे पार करतो, जसे की एक लहान बालकसुद्धा जमिनीवर गायीच्या खुरामुळे उमटलेल्या गड्ड्यात साचलेले पाणी लीलया ओलांडतो.

जी व्यक्ती 'हरिनामाच्या चार माळांचा जप' अशा पद्धतीनुसार कानाद्वारे ऐकून करील, तिच्या हरिनाम-जपाद्वारे उपरोक्त सातही अडचणी सहज दूर होतील. जो साधक रोज एक लाख, म्हणजेच ६४ माळा करण्याचा नियम घेईल, त्याच्या घरी श्रीचैतन्य-महाप्रभूंचा वास नक्कीच होईल. स्वतः महाप्रभूंनी आपल्या भक्तांना सांगितले आहे की, "दररोज न चुकता एक लाख हरिनामाचा जप करा. त्यामुळे कलियुगाची लवकरच हकालपट्टी होईल, अन्यथा घरात कलह होत राहील."

प्रत्यक्षात आपण पाहत आहोत की, ज्या घरात हरीनामाचा जप अथवा कीर्तन होत नाही, तिथे बाप-लेकात, पती-पत्नीमध्ये, भावा-भावामध्ये, तसेच समाजात, गावात, शहरात, देशा-देशात, म्हणजेच संपूर्ण मृत्यूलोकात कलि-महाराजांचा प्रकोप सुरू आहे. सर्वजण दुःखी आहेत. खानपान, राहणीमान सर्व दूषित झाले आहे. प्रेमाचा लवलेशही उरलेला नाही. सर्वत्र स्वार्थ शिरला आहे. पैशासाठी गळा कापला जात आहे. कोणी ऐकणारा उरलेला नाही. पैसे चारून वाईट लोक विजयी होतात. गरिबांचा भगवंतांशिवाय कोणीही सोबती अथवा वाली उरलेला नाही. सर्वजण दुःखसागरात बुडत आहेत.

म्हणूनच सावध होऊन योग्य मार्ग धरा. हाच एक मार्ग तुम्हाला वाचवू शकतो. हरिनामाच्या ६४ माळा करायला लागा, तर इथेच सत्ययुगाचे आगमन होईल. कलि-काळ तुमचे काहीही बिघडवू शकणार नाही. 'भगवान श्रीहरींचे पावन-नामा'चा जप करणाऱ्या साधकाचे रक्षण आणि पालन करत राहील. बाकी सर्व जण पीठाच्या गिरणीत अर्थात् चक्कीत अडकून वस्त्रगाळ भुकटी होतील, फक्त हरिनामाचा जप करणारी व्यक्तीच वाचेल.

विचार करा, या युगात जीवन जगण्यासाठी किती सोपा व सरळ मार्ग तुम्हाला मिळाला आहे. या हरिनाम-जपाच्या राजमार्गावर चालल्यास इतरत्र कुठेही जावे लागत नाही, घर-बसल्याच कमाईचे साधन मिळत आहे. उष्णता जाणवल्यास पंखा लावा, थंडी वाटल्यास हीटर लावा, वादळ आल्यास दारे व खिडक्या बंद करा. कोणतीही अडचण नाही. कसेही बसून, जमिनीवर, खुर्चीवर, पलंगावर, गच्चीवर, चालताना किंवा लवंडूनसुद्धा हरिनामाचा जप करत राहा व तो कानाने ऐकत राहा. कोणत्याही प्रकारची अडचण

येणार नाही आणि याच जन्मात तुम्ही भगवंतांना भेटाल व जन्म-मृत्यूच्या भयानक दुःखातून सुट्टी मिळवाल. जर अशी शुभ संधी मिळाल्यावरही तुम्ही हरिनामाचा आश्रय घेत नसाल, तर तुमच्यासारखी दुर्दैवी व्यक्ती जगात कोणीही नसेल.

कोट्यवधी लोकांपैकी फारच कमी जणांना अशी शुभ संधी मिळते. जर ही संधी गमावली, तर जीवनाच्या अंतिम घटकेत पश्चात्ताप करावा लागेल. थोडा विचार करा की काय श्रीमंत लोक खरोखर सुखी आहेत का? काय गरीब लोक सुखी आहेत का? प्राणी सुखी आहेत का? पक्षी सुखी आहेत का? कोण खरोखर सुखी आहे? सर्व लोक आहार, निद्रा, भय व मैथुन यामध्येच आपले अमूल्य मनुष्य-जीवन व्यर्थ घालवत आहेत. आंधळे बनून जीवन जगत आहेत. अज्ञानालाही काही मर्यादा असते.

मनुष्यजन्मासारखा हिरा मिळाला होता. तो कचऱ्यात फेकून रडत आहात. अज्ञानामुळे या हिऱ्याची किंमत समजू शकला नाहीत. या हिऱ्याच्या मोबदल्यात भगवानही विकत घेतले जाऊ शकले असते. तुम्ही भगवंतांच्या 'प्रेम'रूपी संपत्तीचे मालक बनू शकला असता, अशी सुवर्णसंधी हातामधून सोडून दिली. आता तर माहित नाही किती कोटी वर्षे दुःख भोगावे लागेल. बाह्य अज्ञानाने खूप बुडवले. आता तर भविष्यात फक्त रडणेच हातात येईल.

तेव्हा प्रश्न असेल की भगवान हृदयात कसे प्रकट होतात?

सुमरिए नाम रूप बिन देखे।
आवत हृदय सनेह विशेषे॥

(महादेव शंकरांचा उपदेश)

अनुवाद—रूप न पाहताही नामस्मरण केल्यास, हृदयात विशेष स्नेह वाढतो.

कान आणि मन यांना संलग्न करून हरिनामाचा जप केला पाहिजे. नामजप करत असताना काही दिवसांनी भगवंतांचे स्वरूप अंतःकरणात आपोआप प्रकट होईल. श्रीगुरूदेवांनी हरिनाम-रूपी बियाणे कानरूपी पाईपमध्ये टाकले, हे बियाणे अंतःकरण-रूपी जमिनीवर पडले. आता जप करणारा याला वारंवार जप-रूपी पाणी देईल, तेव्हा ज्याचे जसे मागील जन्मांचे संस्कार असतील, त्याच संस्कारांच्या दबावाने (कमी किंवा जास्त दिवसात) हरिनाम-रूपी बियाणे अंकुरित होईल. त्या अंकुरलेल्या बियाण्यातून श्रीकृष्ण-

रूपी रोपटे बाहेर येईल. ज्याला पाहून साधक (जप करणारा) आनंदसागरात पोहू लागेल. पोहल्याने त्याला प्रेम-रूपी रस आवडायला लागेल आणि तो मस्तीमध्ये रममाण होईल.

हरिनाम-रूपी बीजामध्ये अनंत वेद-शास्त्रे, पुराणे समाविष्ट असतात, पण साधक जेव्हा जप-स्मरण रूपी पाणी देत राहतो, तेव्हा एक दिवस ही शास्त्रे त्याच्या अंतःकरणात प्रकट होतील. जसे गीता सांगते, बुद्धियोगाचा आविर्भाव होईल.

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम्।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते॥

(श्रीमद्भगवद्गीता १०.१०)

अनुवाद—माझ्याशी नित्य संयोग होण्याची इच्छा असलेल्या, प्रेमाने भजन करणाऱ्या त्या भक्तांना मी असा बुद्धियोग देतो, ज्याद्वारे ते मला प्राप्त होतात.

ज्याप्रमाणे वडाचे किंवा पिंपळाचे बी, जे मोहरीपेक्षाही लहान असते, ते जमिनीत पेरल्यावर आणि पाणी दिल्यावर अंकुरित होऊन नंतर एका विशाल वृक्षाचे रूप धारण करून सर्वांना आपली सावली आणि फळे देऊन उपकार करत राहते. या बीजामध्ये वृक्ष लपलेला असतो. त्याचप्रमाणे हरिनाम-रूपी बीजामध्ये श्रीकृष्णांचे रूप, गुण, लीला आणि धाम समाहित (अंतर्भूत) असतात. स्मरणपूर्वक अभ्यास केल्यावर ते प्रकट होतात.

म्हणून निष्कर्ष असा आहे की जप करणाऱ्याने हरिनामाचा जप करताना भगवंतांचे स्वरूप पाहण्याचा प्रयत्न करू नये. वारंवार हरिनामाचा जप करताना भगवंतांचे स्वरूप, त्यांच्या सर्व लीला व गुण आपोआप साधकाच्या हृदयात प्रकट होतील. वडाच्या बीजामध्ये जसा वृक्ष दिसत नाही, त्याचप्रमाणे हरिनामामध्ये श्रीकृष्ण दिसत नाहीत. पण हरिनामाचा जप केल्याने योग्य वेळी ते निश्चितच दिसतील.

* * *

निताई चैतन्य बलि' जेइ जीव डाके।
सुविमल कृष्णप्रेम अन्वेषये ता'के॥

(श्रीनवद्वीप-धाम-माहात्म्य)

अनुवाद—गौर व निताई हे दोघे बंधू सर्व तितपत जीवांचे खरे आणि एकमेव स्नेही आहेत. जेव्हा कोणी व्यक्ती "हा निताई!

हा चैतन्य!" अशी आर्त भावनेने त्या दोन भावांना हाक मारते, तेव्हा त्यांच्या कृपेने 'निर्मळ कृष्णप्रेम' त्या व्यक्तीला शोधत फिरते. अर्थात् अशा व्यक्तीला कृष्णप्रेम अनायासेच प्राप्त होते.

* * *

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

(१४)

चंदीगढ

दिनांक—१२/०९/२००७

परमश्रद्धेय, परमआदरणीय भक्तगण, अधमाधम, दासानुदास अनिरुद्ध दास तुम्हाला साष्टांग दंडवत प्रणाम करतो आणि उत्तरोत्तर भगवान श्रीकृष्ण, भगवान गौर-निताई आणि गुरुदेवांच्या प्रती विरहाग्नी प्रज्वलित होवो, अशी हात जोडून प्रार्थना करतो.

हरिनामातून भगवान श्रीकृष्ण कसे प्रकट होतात?

या भौतिक जगाचे उदाहरण दिल्यास भक्तगण हे खूप चांगल्या प्रकारे समजू शकतात. वडाचे बी किंवा पिंपळाच्या झाडाचे बी मोहरीपेक्षाही लहान असते. त्यात झाड दिसते का? तुम्ही म्हणाल, "नाही!" मी म्हणेन, "मला दिसत आहे." तुम्ही म्हणाल, "पूर्णपणे खोटे बोलत आहात!" मी खड्डा खणून त्यात बी गाडीन आणि पाण्याने भरेन. काही दिवसांनी त्यात कोंब फुटेल आणि एका महिन्यात पाने, फांद्या येतील. एका वर्षात ते विशाल झाड पाने, फुले, फळांनी भरून जाईल. मग मी तुम्हाला ते दाखवून म्हणेल की, "पाहा, मी खोटे बोलत नव्हतो, आता पाहा, या लहानशा बीमध्ये हे विशाल झाड जे लपलेले होते, ते प्रकट झाले." तेव्हा तुम्हाला पूर्ण विश्वास बसेल की हे खरोखरच सत्य आहे.

दुसरे उदाहरण असे आहे की, 'राम' या शब्दात रामाचे रूप दिसते का? तुम्ही म्हणाल, "नाही." मी म्हणेन, "मला तर दिसते." तुम्ही म्हणाल, "तुम्ही खोटे बोलत आहात." मी म्हणेन, "आता मी तुम्हाला दाखवतो. पाहा, या शब्दातून 'राम' प्रकट होतील." मी 'राम-राम' म्हणून हाक मारेन, तेव्हा 'राम' लगेच येऊन उभे राहतील. 'राम' कुठून प्रकट झाले? शब्दातून! आता मी त्यांना बोलावले, पण मी तोंड फिरवून बसलो, तर ते रागावून

निघून जातील. ते विचार करतील की यांनी मला बोलावले पण माझ्याकडे पाहिलेही नाही.

त्याचप्रमाणे, कान आणि मन यांना जोडून हरिनामाचे उच्चारण करावे लागेल, तेव्हा नामातून 'कृष्ण' प्रकट होतील. कृष्ण तर प्रकट झाले, पण तुमचे मन बाजारात गेले असेल, तर कृष्ण मनात विचार करतील की हा मोठा मूर्ख आहे, मला बोलावले आणि स्वतः बाजारात गेला, तर मी आता इथे का थांबू? मीही इथून जातो. अशा प्रकारच्या नामजपाने फक्त सुकृती जमा होईल, जी सांसारिक लाभ देईल. परंतु भगवंतांचे प्रेम प्राप्त होणार नाही, कारण या हरिनामाच्या जपात आदर नव्हता. हरिनामाचे उच्चारण अवहेलनापूर्वक केले गेले आहे.

श्रीगुरुदेवांनी हरिनाम-रूपी बीज कान-रूपी पाईपमध्ये टाकले, हे हरिनाम बीज अंतःकरण-रूपी जमिनीत पडले, आता साधकाने (माळयाने) त्यात उच्चारण-रूपी पाणी घातले नाही, तर बीज नष्ट होईल. जेव्हा या बीजाला वारंवार जप-रूपी पाण्याने सिंचन केले जाईल, तेव्हा त्यातून कृष्ण-रूपी कोंब प्रकट होईल. हा कोंब खोड, फांद्या (शाखा), उप-फांद्या (उप-शाखा), पाने, फुले, फळे-रूपी रूप, गुण, लीला व धामामध्ये विकसित होईल. म्हणून लिहिले आहे—

सुमरिए नाम रूप बिन देखे।
आवत हृदय सनेह विशेषे॥

(महादेव शंकरांचे वाक्य)

अनुवाद—भगवान् श्रीरामांचे पवित्र नाम जपणाऱ्या साधकाच्या हृदयात त्यांच्याप्रती विशेष स्नेह प्रकटतो आणि त्यांचे अप्राकृत रूपही अंतःकरणात स्फुरते.

कान आणि मन यांना जोडून हरिनामाचा जप करत राहा, एक दिवस भगवंतांचे रूप, गुण, लीला इत्यादी आपोआप प्रकट होतील. प्रत्येक गृहस्थ, ब्रह्मचारी व संन्यासी व्यक्तीने एक लाख हरिनामाचा जप करणे अत्यंत आवश्यक आहे, तेव्हाच काहीतरी प्राप्त होईल, अन्यथा हा व्यर्थ परिश्रम समजा. भगवंतांची सेवाही नीरस (रसविहीन) होईल.

समुझत सरिस नाम अरु नामी।
प्रीति परस्पर प्रभू अनुगामी॥

(महादेव शंकरांचे वाक्य)

अनुवाद—हे तत्त्व समजणे आवश्यक आहे की 'नाम' आणि 'नामी' हे दोन्ही एकसारखेच वाटतात, पण त्यांच्यात स्वामी आणि सेवकासारखी परस्पर प्रीती आहे. म्हणजेच, नाम आणि नामी यांच्यात पूर्ण एकता असली तरीही जसा सेवक स्वामींच्या (मालकाच्या) मागे चालतो, तसं नामाच्या मागे नामी चालतात. प्रभू श्रीराम स्वतः आपल्या 'राम' नामाचे अनुसरण करतात—नाम घेताच ते तेथे प्रकट होतात.

जेव्हा एक सामान्य मायिक व्यक्ती नाम घेतल्यावर प्रकट होते, तर भगवान तर प्रत्येक ठिकाणी प्रत्येक वेळी उपस्थित असतात. हरिनाम उच्चारण करताच ते प्रकट होतात.

सत्तराव्या वर्षानंतर प्रत्येक भक्ताने फक्त हरिनामावर अवलंबून राहून आपले उर्वरित जीवन व्यतीत करणे अत्यंत आवश्यक आहे. मठात रहा किंवा घरी रहा, एकांतात राहून १ लाख ते ३ लाख पर्यंत हरिनामाचे स्मरणच भगवंतांच्या चरणांपर्यंत पोहोचवून, पाचवा पुरुषार्थ अर्थात् प्रेमावस्था प्रकट करते आणि साधकाच्या शरीरात अष्ट-सात्त्विक विकार दिसू लागतात. अशा स्थितीत भक्त क्षणोक्षणी विरहाच्या सागरात परमानंदाने डूंबत राहतो. भगवंतांच्या चिंतनाशिवाय त्याला दुसरा कोणताही अनुभव त्याच्या मनाच्या पटलावर उमटत नाही.

उपरोक्त स्थितीचा अनुभव करणारा उन्नत-श्रेणीचा श्रेष्ठ भक्त आपल्या दर्शनाने आणि संभाषणाने इतर भक्तांवर पूर्ण प्रभाव पाडतो. त्याच्यामुळे सांसारिक प्राण्याचा निश्चितच उद्धार होतो. त्याची आकर्षण-शक्ती दूरपर्यंत प्रभाव टाकते. जे सर्व गुरुवर्ग वृद्धावस्थेत पोहोचले आहेत, त्यांना एकांतात कुटीर बनवून स्थिर मनाने अष्टयाम (आठही प्रहरात) हरिनामाचा माळेवर जप करताना आपण पाहतो. श्रीभक्तिप्रमोदपुरी महाराज, श्रीभक्तिविज्ञान भारती महाराज, श्रीभक्तिवल्लभ तीर्थ महाराज, श्रीगौरकिशोरदास बाबाजी महाराज, श्रीजगन्नाथदास बाबाजी महाराज इत्यादी आपली जपमाळ हातात घेऊन हरिनाम करत राहतात.

हे ब्रह्मचारींनो! अशी अवस्था तेव्हाच प्राप्त होईल, जेव्हा तुम्ही किशोर किंवा युवा अवस्थेपासून हरिनामाच्या ६४ माळा स्मरण करायला लागाल. हरिनामावर दृढ निष्ठा निर्माण होण्याची प्रक्रिया जर आताच सुरू झाली नाही, तर आयुष्याच्या संध्याकाळी अर्थात् वृद्धावस्थेत हरिनामाचे सहज स्मरण होणे अशक्यच ठरेल.

ब्राह्ममुहूर्ती, म्हणजेच रात्री अडीच किंवा तीन वाजता उठून शौचक्रिया संपन्न करून किंवा हात-तोंड धुऊन आपल्या जपमाळेवर हरिनामाचा जप सुरू करावा लागेल. ८ वाजेपर्यंत आरती, भावमय दर्शन, शास्त्रांचे वाचन (पठण) व कीर्तन करावे लागेल. जर रात्री नऊ वाजेपर्यंत श्रीकृष्णांच्या श्रीविग्रहाचे शयन झाले, तर दहा वाजेपर्यंत ब्रह्मचारी शयन करू शकतात. पाच तास विश्रांती घेऊन, ब्रह्ममुहूर्तावर तीन वाजता उठल्यावर ते एक लाख हरिनाम—म्हणजेच ६४ माळा—सहज पूर्ण करू शकतात. मठ शांततापूर्ण होऊ शकतो. मठाची सेवाही रसमय होऊ शकते. हरिनामाच्या अभावामुळे सेवा नीरस राहते. ज्या व्यक्तीला सांगितले जाते की, 'ही सेवा तुम्हाला करायची आहे,' तर त्या व्यक्तीवर वज्राघात झाल्यासारखे होते. मनापासून न केलेली सेवा रसमय होऊ शकते का?

अनेक मठांमध्ये रात्री ९ वाजता श्रीकृष्णांच्या श्रीविग्रहाचे शयन होते, त्यामुळे ब्रह्मचारी-भक्तांना पूर्ण झोपेचा लाभ मिळतो. तरुणांना ६ तास झोप घेणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा येणारी सुस्ती व आळस भजनाला दडपून टाकेल अर्थात् भजनाची प्रेरणा गिळंकृत करेल. साधक रात्री ५ तास झोप घेतील आणि दुपारी ११ वाजता श्रीकृष्णांच्या श्रीविग्रहाला शयन करवतील. त्यानंतर सर्व साधक सायंकाळच्या ५ वाजेपर्यंत हरिनामाचा माळेवर जप करतील. दुपारी ११ ते सायंकाळी ५च्या दरम्यान ते २ तास झोपही घेऊ शकतील. जयपूरमधील श्रीराधा-गोविंद मंदिरात असेच होते.

मठ हे पवित्र स्थान केवळ भजनासाठीच बनवले आहे. पण भजन न होता फक्त भोजनच होत राहिले, तर मठामध्ये सुद्धा कलि महाराजांचे आवागमन (येणे आणि जाणे) होतच राहील. भांडणे होत राहतील. सेवेच्या भावनेचा अभाव असेल. जी सेवा होईल, ती अवहेलनापूर्वक होईल. अर्थात् जी सेवा तेथील मठवासी करतील, ती आदराच्या भावनेविना, केवळ औपचारिकतेनेच होईल.

जर मंदिरातील श्रीविग्रहांचा सध्याचा नियम बदलला, तर मठात सुखाचा विस्तार होईल. यामध्ये भगवंतांसाठी स्वयंपाक बनवणाऱ्या सेवकाची मदतही अत्यंत आवश्यक आहे. स्वयंपाक करणाऱ्या भक्ताने वेळेवर भोग तयार केला, तर श्रीविग्रहांचा भोगही वेळेवर लागेल आणि त्यामुळे सर्वांना सहज सोयीस्कर होईल. खरे तर, मठात राहाणारे सर्वच भक्त दररोज एक लाख हरिनामाचा जप सहज करू शकतात. अभ्यासाद्वारे ६४ माळा (एक लाख नामजप) ३.५ (साडेतीन) तासांतच होतात. अर्थात् उत्तम सराव झाल्यावर एक लाख हरिनामाचा जप करण्यासाठी केवळ साडेतीन तासच लागतील.

गृहस्थ भक्तांसाठी संतुलित वेळापत्रक

८ तास—ऑफिस कार्यासाठी.
२ तास—येण्या-जाण्यासाठी.
५ तास—झोप (रात्री १० ते पहाटे ३ वाजेपर्यंत निद्रा).
२ तास—शौचक्रिया, स्नान व प्रसाद-सेवन.
५ तास—संख्यापूर्वक माळेवर हरिनामाचा जप.

तरीही **२ तास** अतिरिक्त शिल्लक राहतात, त्या २ तासात तुम्ही आपल्या मुलांना शिकवू शकता किंवा त्यांची उजळणी घेऊ शकता.

वरील प्रेरणा भगवंतांकडून मिळाली आहे, जर सर्वांनी या भगवंतांच्या आदेशाला सत्य मानले तर लगेच त्याचे पालन करणे श्रेयस्कर होईल.

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः।
न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नव चार्जुन॥
युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु।
युक्तास्वप्नावबोधस्थ योगो भवति दुःखहा॥

(श्रीमद्भगवद्गीता ६.१६-१७)

अर्थ—हे अर्जुन! जो साधक जास्त खातो किंवा खूप कमी खातो, जो जास्त झोपतो किंवा जो पुरेसा झोपत नाही, तो साधक कधीही 'योगी' होऊ शकत नाही. जो साधक खाणे, झोपणे, मनोरंजन आणि काम करण्याच्या सवयींमध्ये यथायुक्त असतो, तोच योगाभ्यासाने सर्व सांसारिक दुःखांचा नाश करू शकतो. [हे अर्जुन! न तर अत्याहारीचा आणि न तर अनाहारीचा आणि न अतिशय

निद्रापरायण आणि न तर सदा जागृत रहाणाऱ्याचा योग सिद्ध होतो. यथायोग्य आहार-विहार करणाऱ्या, कर्मांत यथायोग्य प्रयत्न करणाऱ्या आणि यथायोग्य झोपणाऱ्या आणि जागणाऱ्यांचा योग जागतिक क्लेशांना हरण करणारा असतो.]

* * *

॥श्रीश्रीगुरुगौरांङ्गौ जयतः॥

(१५)

छींडची ढाणी

दिनांक—२६/०९/२००७

समस्त भक्तगणांच्या युगुल चरणकमळी मी अधमाधम, दासानुदास, अनिरुद्ध दास साष्टांग दंडवत प्रणाम करतो. मी सर्व भक्तांना दररोज एक लाख हरिनाम करण्याची हात जोडून प्रार्थना करतो व आपापला भक्ती-स्तर वाढवण्यासाठी आग्रह करतो.

महाप्रभू गौरहरींचा एक लाख हरिनाम जप करण्याचा आदेश

महाप्रभूंना प्रत्येक पार्षद आपल्या घरी प्रसाद घेण्यासाठी आग्रह करत होते, तेव्हा महाप्रभूंनी त्यांना सांगितले की जी सज्जन व्यक्ती रोज एक लाख हरिनामाचा जप करते, तिच्या घरी मी प्रसाद घेऊ शकतो. त्यांनी असेही म्हटले की, "जी व्यक्ती लखपती (लक्षाधीश) असेल तिच्या घरी मी प्रसाद घेऊ शकतो." तेव्हा सर्व भक्तजन म्हणाले, "महाप्रभू! आम्ही तर हजारपतीही नाही, आम्ही तुम्हाला प्रसाद कसा देऊ शकतो?" भगवान गौरहरी म्हणाले, "तुम्ही समजला नाहीत, माझ्या म्हणण्याचा अर्थ आहे, जो रोज एक लाख (६४ माळा) हरिनामाचा जप करेल, त्याच्या घरीच मी प्रसाद घेऊ शकेन." भक्तगण म्हणाले, "६४ माळा जप करताना आमचे मन हरिनामात सतत कसे रमेल?" महाप्रभू म्हणाले, "याची चिंता करू नका, याची चिंता हरिनाम करेल. हळूहळू हरिनामाच्या जपात तुम्हाला खरा, शाश्वत आनंद अनुभवास येऊ लागेल. तेव्हा निम्न दर्जाचा, भौतिक, खोटा आणि क्षणिक असा आनंद—जो खऱ्या आनंदाच्या श्रेणीतही येत नाही, केवळ इंद्रियांना जाणवतो—तो हरिनामाच्या प्रभावाने आपोआप दूर होत जाईल."

धीरे धीरे रे मना धीरे सब कुछ होय।
माली सींचे सौ घड़ा ऋतु आवे फल होय॥

अनुवाद—हे माझ्या मना, उगीच उतावीळपणा न करता हरिनामाचा जप करत राहा. हळूहळू सर्व सिद्धी प्राप्त होईल. बगीच्याच्या माळयाने आंब्याच्या झाडाच्या मुळाला शंभर घडे पाणी

दिले तरी, आंब्याच्या झाडाला आंबे उन्हाळयातच येतात, शिशिर ऋतूत नाही.

बिबसहू जासू नाम नर कहहीं।
जनम अनेक रचित अघ दहहीं॥

अनुवाद—जी व्यक्ती विवश अर्थात् असहाय अवस्थेत श्रीहरिनामाचा जप करते तिचे सुद्धा अनेक जन्मांतील पाप जळून भस्मसात होतात. उंच इमारतीवरून पडणे, रस्त्यावर चालताना घसरून हाडे मोडणे, सर्प किंवा विंचवाच्या दंशाने त्रस्त होणे, ज्वर किंवा ताप इत्यादी रोगांनी संतप्त होणे, अपघातात जखमी होणे किंवा विवश अवस्थेत असणे—अशा कोणत्याही परिस्थितीत जर एखादा व्यक्ती 'हरी' या दोन अक्षरांचे उच्चारण करतो, तर त्याला कधीही नरकात यातना भोगाव्या लागत नाहीत.

सन्मुख होइ जीव मोहि जबहीं।
जन्म कोटि अघ नासहिं तबहीं॥

अनुवाद—भगवान् श्रीराम म्हणतात, "जेव्हा जीवात्मा माझ्या **समोर** येऊन शरणागती पत्करतो, तेव्हा लगेचच त्याच्या कोट्यवधी जन्मांची पापे नष्ट होतात व तो माझ्या कृपेचा पात्र बनतो."

भगवंतांच्या '**समोर**' जाऊन त्यांना शरणागत होणे याचा एक खरा अर्थ पुढीलप्रमाणे आहे—जेव्हा श्रीगुरुदेव हरिनामाची दीक्षा देतात, तेव्हा गुरुदेवांच्या चरणी आश्रय व शरणागती पत्करलेल्या शिष्याने हरिनामाच्या ६४ माळांचा जप करत राहणे हेच भगवंताच्या **'समोर'** जाणे आहे. जेव्हा इच्छा नसतानाही, मन रमत नसेल तरीही हरिनामाचे उच्चारण कोण्या व्यक्तीच्या मुखातून झाल्यास, तिची अनेक जन्मांतील पापे जळून जातात, तेव्हा जर साधक प्रेमाने हरिनामाचा जप करायला लागला, तर त्याला जे प्राप्त होऊ शकते, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे!

श्रील गुरुदेवांनी १९६६ मध्ये आदेश दिला होता—

Chant Hari-nāma sweetly and listen by ear.

अनुवाद—गोड आवाजात जीभेद्वारे हरिनामाचा जप करावा आणि आपल्या कानांद्वारे तो जप एकाग्रतेने ऐकावा.

सादर सुमिरन जे नर करहीं।
भव बारिधि गोपद इव तरहीं॥

(शिव-वचन अर्थात महादेव शंकरांचे वाक्य)

अनुवाद—जो मनुष्य प्रेमाने व आदरपूर्वक भगवान् श्रीरामांच्या पवित्र नामाचे स्मरण करतो, तो संसाररूपी महासागर सहजपणे पार करतो, जसे की एक छोटा मुलगा सुद्धा जमिनीवर गायीच्या खुरामुळे उमटलेल्या गड्ढ्यात साचलेले पाणी लीलया ओलांडतो.

जो साधक प्रेमाने हरिनाम करतो, त्याच्या शरीरात रोमांच, अश्रूपात व इतर प्रकारचे अष्ट-सात्त्विक विकार प्रकट होऊ लागतात. आता प्रश्न येऊ शकतो की, प्रेमाने जप कसा करायचा? हे कानाने ऐकून, भक्त-शिरोमणीच्या चरणी (प्रत्यक्ष किंवा मानसिक रूपात) बसून, भगवंताच्या पार्षदांची शिफारस घेऊन सहज शक्य आहे. अधिक माहिती समोरासमोर चर्चा करूनच स्पष्ट केली जाऊ शकते. जेव्हा संधी मिळेल तेव्हा मी आपली सेवा करू शकेन.



जिभेने हरिनामाचे उच्चारण व्हावे, कानाने हरिनाम ऐकावे आणि भगवंताच्या कृपेची भावना असावी. तेव्हा लवकरच अष्ट-सात्त्विक विकार शरीरात प्रकट होऊ लागतात. जेव्हा उपरोक्त स्थिती येते, तेव्हा समजून घ्यावे की श्रीमद्भगवद्गीतेचा प्राण असलेल्या

शरणागतीच्या अवस्थेचा उदय होतो आहे. शरणागती पत्करलेल्या व्यक्तीला भगवान एका क्षणासाठीही सोडून शकत नाही.

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्॥

(श्रीमद्भगवद्गीता ९.२२)

अनुवाद—जे लोक अनन्यभावाने माझ्या दिव्य स्वरूपाचे ध्यान करत निरंतर माझे भजन करतात, त्यांच्या गरजा मी पूर्ण करतो आणि त्यांच्याजवळ जे काही आहे, त्याचे रक्षण करतो. अशा प्रकारे मी माझ्या भक्तांचा लौकिक आणि पारलौकिक भार उचलतो. शरणागती पत्करलेल्या व्यक्तीची पूर्ण जबाबदारी भगवान घेतात. तिच्या जीवनात जी कमतरता आहे, ती पूर्ण करतात आणि जे तिच्याजवळ आहे, त्याची काळजी घेतात आणि रक्षण करतात.

शरणागतीची भावना तेव्हाच उदय होईल, जेव्हा भौतिक जगापासून अलिप्तता असेल. जोपर्यंत भौतिक जग अंतःकरणात वास करेल, तोपर्यंत शरणागतीची भावना लुप्त राहील. हरिनामस्मरणानेच सर्व काही प्रकट होते. कोणीही हे आजमावून पाहू शकतो; यात एक टक्काही कमतरता नाही.

मथुरेतील एका भक्त दांपत्याने एका दिवसात ६४ माळा हरिनामाचा जप केला; त्यानंतर त्यांच्या दहाही बोटांचे असह्य दुखणे संपले. ही साधारणपणे दहा दिवसांपूर्वी घडलेली घटना आहे—कोणीही चौकशी करून पाहू शकतो. मी प्रयोगशाळेत बसलेला असतो आणि माझे गुरुदेव प्रयोग करून दाखवत राहतात. यात माझे कोणतेही ज्ञान नाही. मी श्रीगुरुदेवांच्या आदेशाचे नित्य पालन म्हणून दररोज ३ लाख हरिनामाचा जप करतो. त्या हरिनाम-जपाचा हा प्रभाव आहे. जिथे कलियुगाचा धर्म 'हरिनाम-संकीर्तन' होत नाही, तिथे कलि महाराज आपापसात भांडणे लावत राहतात. घरोघरी, समाजात, गावात, शहरात, देशात, संपूर्ण पृथ्वीवर कुठे भांडणे नाहीत? जिथे हरिनामाचा जप किंवा कीर्तन होते, तिथे कलि-महाराज जाऊ शकत नाहीत, कारण तिथे गेल्यास हरिनामाच्या प्रभावाने ते जळून भस्म होतील.

चंदीगढ शहरात खूप भक्त ६४ माळा हरिनामाचा जप करायला लागले आहेत, त्यांना खूप फायदे होताना दिसत आहेत. हरिनामाचा एवढा जप सर्वांनी करायला हवा. घरात पंखा, हिटर

इत्यादी सर्व सोयीसुविधा उपलब्ध आहेत. कुठेही बसून तुम्ही हरिनाम करू शकता. भारतात जन्म, चांगल्या कुळात जन्म, आणि उन्नत वैष्णवांचा साधुसंग इत्यादी मिळूनही जो वेळेचा उपयोग करत नाही, त्याला पुढे खूप दुःख भोगावे लागेल. हरिनामामुळे अनेक अवर्णनीय, अशक्य फायदे होताना मला दिसत आहेत. कोणीही आजमावून पाहू शकतो. '१० नामापराध आणि मान-प्रतिष्ठेपासून स्वतःला बचावणे' अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा हरिनामाचा जप करूनही काहीही प्राप्त होणार नाही. ६४ माळा करणाऱ्याच्या घरात महाप्रभू २४ तास राहतात. तिथेच महाप्रभू खाणे-पिणे, विश्राम इत्यादी करत राहतात. जिथे भगवान सतत राहतात, तिथे अमंगल होऊ शकते का? तिथे अमंगलाची मुळेच कापली जातात.

दहा नामापराध

(१) संतांची निंदा—संतांची निंदा करणे हा एक मोठा अपराध आहे. ज्या नाम-परायण संत-महात्म्यांनी श्रीकृष्ण-नामाच्या महिमेचा जगात प्रचार केला, त्यांची निंदा श्रीहरिनाम-प्रभू कसे सहन करू शकतील? म्हणून साधू-संतांची निंदा करणे हा पहिला आणि सर्वात मोठा अपराध आहे.

(२) विष्णू आणि त्यांच्या नामामध्ये भेद मानणे—या जगात जे लोक आपल्या क्षुद्र भौतिकतावादी बुद्धीने परम-मंगलमय श्रीविष्णूंच्या नाम, रूप, गुण आणि लीलांमध्ये फरक पाहतात, म्हणजेच भौतिक वस्तूंप्रमाणेच श्रीविष्णूंच्या नाम, रूप, गुण आणि लीलांना विष्णूंपासून वेगळे किंवा स्वतंत्र मानतात, किंवा शंकर इत्यादी देवांना विष्णूंपेक्षा स्वतंत्र किंवा त्यांच्या समान मानतात, त्यांचा तो हरिनामाचा जप निश्चितच अहितकारक नामापराधाच्या श्रेणीत मोडतो.

(३) सद्गुरूंना नश्वर मानणे—नाम-तत्त्व जाणणाऱ्या गुरूंना नश्वर आणि पंचभौतिक शरीर असलेले सामान्य माणूस मानून त्यांची अवज्ञा करणे हा तिसरा अपराध आहे.

(४) वेद आणि पुराणांची निंदा—वेद आणि सात्त्वत पुराणांसारख्या शास्त्रांची निंदा करणे हा नामापराध आहे. सर्व वेद आणि उपनिषदांमध्ये हरिनामाच्या महिमेचे वर्णन आढळते. ज्या मंत्रांमध्ये नामाची महिमा प्रकाशित आहे, त्यांची निंदा केल्याने

नामापराध होतो. काही लोक दुर्दैवाने श्रुतीच्या इतर उपदेशांना जास्त सन्मान देतात आणि नाम-महिमा दर्शवणाऱ्या श्रुतिमंत्रांकडे दुर्लक्ष करतात. असे करणे देखील नामापराध आहे.

(५) हरिनामाच्या महिमेला अतिशयोक्ती मानणे—हरिनामाच्या महिमेला अतिशयोक्ती मानणे हा अपराध आहे. शास्त्रांमध्ये असे म्हटले आहे की भगवंतांच्या नामामध्ये त्यांच्या सर्व शक्ती सामावलेल्या आहेत. हरिनाम पूर्णतः चिन्मय आहे, म्हणून ते मायावी जगाच्या बंधनांचा नाश करण्यास समर्थ आहे. हरिनामाच्या माहात्म्याचे हे सर्व वर्णन परम सत्य आहे. परंतु जे या सत्यावर विश्वास ठेवत नाहीत आणि म्हणतात की शास्त्रांमध्ये हरिनामाची महिमा अतिशयोक्तिपूर्वक सांगितली आहे—अशा व्यक्तींचा संग कधीही करू नये." जर ते कधी तुमच्या डोळ्यासमोर आले, तर नेसत्या कपड्यांसह (सचैल) स्नान करून शुद्ध व्हा—हीच श्री चैतन्य महाप्रभूंची शिकवण आहे.

(६) भगवंतांच्या नामाला काल्पनिक मानणे—भगवंतांच्या नामाला काल्पनिक मानणे हा अपराध आहे. मायावादी आणि भौतिक कर्मवादी निर्विकार आणि नाम-रूप नसलेले निर्विशेष 'ब्रह्म' हेच परमतत्त्व आहे असे मानतात. जे असे मानतात की ऋषींनी स्वतःच्या कार्य-सिद्धीसाठी राम-कृष्ण इत्यादी नामांची कल्पना केली आहे, ते नामापराधी आहेत. हरिनाम काल्पनिक नाही, तर ते नित्य आणि चिन्मय आहेत, ते फक्त भक्तीद्वारे चिद्-इंद्रियांवर प्रकट होते. सद्गुरू आणि शास्त्रे हीच शिकवण देतात. म्हणून हरिनामाला परम सत्य मानले पाहिजे; त्याला काल्पनिक समजल्यास हरिनामाची कृपा कधीच मिळणार नाही.

(७) हरिनामाच्या बळावर पापांमध्ये प्रवृत्त होणे—ज्यांची श्रीनामाच्या बळावर पाप-कर्मांमध्ये प्रवृत्ती होते, त्यांची अनेक यम, नियम, ध्यान, धारणा इत्यादी कृत्रिम योग-प्रक्रियांद्वारेही शुद्धी होत नाही, हे निश्चित आहे.

(८) प्राकृत कर्मांना नामाच्या समान मानणे—धर्म, व्रत, त्याग, होम इत्यादी प्राकृत शुद्ध कर्मांना अप्राकृत भगवन्नामाच्या समान किंवा तुल्य मानणे देखील एक प्रमाद किंवा निष्काळजीपणा आहे.

(९) श्रद्धाहीन व्यक्तीला नामोपदेश—श्रद्धा नसलेल्या आणि नाम-श्रवण करण्यास विमुख असलेल्या व्यक्तीला नामाचा उपदेश देणे देखील एक नामापराध आहे.

(१०) नामाची महिमा ऐकूनही आसक्ती न सोडणे—हरिनामाची अद्भुत महिमा ऐकूनही जे शरीरात 'मी' आणि जागतिक उपभोग्य वस्तूंमध्ये 'माझे' ही बुद्धी ठेवतात आणि श्रीहरिनाम-उच्चारणात प्रेम किंवा आग्रह दाखवत नाहीत, ते देखील नामापराधी आहेत.

हरिनामाच्या जपात मन रमविण्यासाठी खात्रीचे प्रभावी उपाय

(१) ब्राह्ममुहूर्ती उठून कानाद्वारे नीट ऐकत आणि मन एकाग्र करून हरिनामाचा उच्चारणपूर्वक जप करावा.

(२) संध्याकाळी कमी प्रमाणात प्रसाद घेणे, अन्यथा आळसाचा प्रकोप होतो.

(३) प्रसाद घेतानाही हरिनामाचा जप करत राहणे, जेणेकरून सात्त्विक-धारा चालू राहील. **'जसे अन्न, तसे मन.'** पाणीही हरिनामाचा जप करीतच पिले पाहिजे तर ते चरणामृत बनते. **'जसे पाणी, तशी वाणी.'**

(४) रात्रीसुद्धा हरिनामाचा जप करीत झोपी जावे, जेणेकरून रात्रभर हरिनाम शरीरात संचारित होत राहील.

(५) टीव्ही, वर्तमानपत्र आणि मोबाईलपासून दूर राहा. आवश्यक असल्यास मोबाईल १०% कामात घेऊ शकता.

(६) दररोज तुळशी माळेवर ६४ माळा हरिनामाचा जप करीत हरिनाम-स्मरण करत रहा, जेणेकरून इतर व्यर्थ-कार्यांसाठी वेळच मिळणार नाही.

(७) ग्राम्य-चर्चा (निरर्थक गप्पा) पासून दूर राहा. ६४ माळा जपल्यामुळे आपोआप वेळ वाया घालवता येणार नाही.

(८) संयमाने जीवन जगा. काम-क्रोधाचा दुष्प्रभाव सात्त्विक भावनांचा रस जाळून टाकतो.

(९) पती-पत्नींनी आपसात भांडू नये, दांपत्यातील आपसातील भांडणे हा मोठा अपराध ठरेल. लक्ष्मी, ऋद्धी व सिद्धीसुद्धा घरात नांदणार नाहीत. मग हरिभजन रसमय होणे तर खूप दूरची गोष्ट आहे.

(१०) संत व महात्म्यांशी प्रेमाचे संबंध ठेवा, जेणेकरून तुमच्यावर भगवंतांची कृपादृष्टी राहील.
(११) मंदिरात भावपूर्ण नेत्रांनी श्रीविग्रहांचे दर्शन करा, जड (निर्जीव) डोळयांनी दर्शन श्रीविग्रहांचे होऊ शकत नाही.
(१२) मान-प्रतिष्ठा आणि १० नामापराधांपासून स्वतःचा बचाव करा. असे करणे साधकांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.
(१३) हरिनामाचा जप कानाने ऐकून करा.
(१४) अश्रू आणि रोमांच न आल्यास पश्चात्ताप करा.
(१५) सर्व कार्ये भगवंतांचीच समजून करा. नोकरी (service) सुद्धा भगवंताचीच सेवा आहे असे समजून करावी.
(१६) आपल्या सगळया क्रियांचे उद्दिष्ट फक्त भगवंतांची प्राप्ती हाच असावा. घर-दार सर्व भगवंतांचेच समजा.

वरील महत्वांच्या मुद्यांची काळजी घेत दररोज ६४ माळा हरिनामाचा जप करीत राहिल्यास, त्या घरात शचीनन्दन श्रीगौरहरींचा नेहमी वास करतील अर्थात् ते तेथे नेहमी नांदतील. तिथे अमंगळ घटनांच्या वृक्षाची पाळेमुळेच उखडल्या जातील. पण असे दिसून येत आहे की इतक्या वर्षांपासून हरिनाम-जप होत आहे, तरीही काही फायदा दिसत नाही, काय कारण आहे? याच्या मागे फक्त उपरोक्त कारणेच आहेत. आजमावून पाहू शकता. प्रत्यक्ष अनुभवण्याजोग्या तथ्याला सिद्ध करण्यासाठी पुराव्याची गरज नसते. शक्ती असताना युवा-अवस्थेतच कमाई करा, नाहीतर नंतर म्हातारपण (वृद्धावस्था) व आजारपण आल्यावर पश्चात्ताप करावा लागेल. मनुष्यजन्म पुन्हा पुन्हा मिळणार नाही. जेव्हा मिळेल तेव्हा अरब देशांमध्ये मिळेल, जिथे भगवंताच्या भक्तीचा मागमूसही नाही. चुकीच्या प्रचारामुळे मानव या जगात भटकत आहे.

कलियुगाचा काळ सर्व युगांमध्ये सर्वोत्तम आहे, जिथे काहीही करावे लागत नाही. घरबसल्या हरिनामाचा जप करा आणि सुखी जीवन जगा. प्राणी जोपर्यंत भगवंतांच्या कुशीत जात नाही, तोपर्यंत तो भयानक दुःखांमध्ये जळत राहतो. संसारात सुख दिसते, पण ते खरे सुख नाही आहे, सुखाचा एक आभासमात्र आहे. श्रीमंत लोक दुःखी आहेत, गरीब लोकपण दुःखी आहेत, पुत्र असलेला माणुस सुद्धा दुःखी आहे, पुत्र नसलेला माणुसही दुःखी आहे. कोणीही सुखी नाही. सुखी तोच आहे, जो समाधानी आहे. भगवंतांनी

आपल्या कर्मानुसार जे दिले, ते मिळवून जो समाधान मानतो, तोच परमसुखी आहे. "**आशा हि परमं दुःखं**"—आशा हेच परम दुःखाचे कारण आहे. सुखाची स्थिती फक्त हरिनामस्मरणानेच येते. कलियुगात दुसरे कोणतेही साधन नाही.

(जीभेद्वारे हरिनामाच्या उच्चारणाचे महत्त्व)

जाना चहहिं गूढ गति जेऊ।
नाम जीहँ जपि जानहिं तेऊ॥

अनुवाद—ज्या कोण्या जिज्ञासू व्यक्तीला भगवंतांचे रहस्यमय स्वरूप जाणण्याची इच्छा आहे, तिने आपल्या जिभेने हरिनामाचा जप करावा. हरिनामाच्या जपाद्वारे ती व्यक्ती भगवंतांचे रहस्यमय स्वरूप सहजपणे जाणू शकते. यात जीभेद्वारे हरिनामाच्या उच्चारणाला विशेष महत्त्व आहे—हे दाखवून देण्यात आलेले आहे.

राम नाम का अमित प्रभावा।
सन्त पुराण उपनिषद गावा॥

अनुवाद—श्रीरामनामाच्या अपार प्रभावाचे वर्णन अनेक संतांनी आपल्या वाणीद्वारे केले आहे. पुराणांमध्ये व उपनिषदांमध्ये सुद्धा महर्षी श्रीवेदव्यासांनी सुद्धा हरिनामाच्या महत्त्वाचे विस्तृतपणे वर्णन केले आहे.

हा लेख मी लिहिला नाही, तो कोणत्यातरी अदृश्य शक्तीने माझ्याकडून लिहून घेतला आहे. अल्पज्ञ मानव असा प्रभावशाली लेख लिहिण्यास सक्षम असू शकतो का? कधीच नाही.

टीप—दररोज हरिनामाच्या ६४ माळांचा जप केल्यामुळे अशक्य गोष्टी शक्य होताना दिसल्या आहेत. हरिनामाचा प्रभाव आजमावला पाहिजे. पण माळेवर हरिनामाचा जप कानाने ऐकून, सन्मान व प्रतिष्ठेची आशा आणि नामापराध यापासून स्वतःला बचाबून करावा लागेल. हरिनामाचे अद्भुत चमत्कार साक्षात् दृष्टिगोचर होत असताना इतर पुराव्याची गरज उरतच नाही.

* * *

हरिनामाचा जप केल्याने भक्तीच्या इतर अंगांचे पालन अगदी सहजच, विनासायास होते. नाम आणि नामी (भगवान) हे दोन्ही तत्त्वतः एकच आहेत, असा विश्वास ठेवून दहा नामापराधांचा त्याग करून जो साधक एकांतात बसून भजन करतो, त्याच्यावर हरिनाम प्रभू दयाळू होऊन आपल्या श्यामसुंदर-रूपात त्याच्या हृदयात

प्रकाशित होतात. जेव्हा साधनेत हरिनाम आणि श्रीकृष्णांचे रूप एकच आहेत, असा अनुभव येतो, तेव्हा फक्त हरिनामाचे उच्चारण केल्यानेच प्रत्येक वेळी भगवंतांचे रूपही हृदयात प्रकट होते. त्याचप्रमाणे हरिनामाच्या जपाच्या प्रभावाने भगवंतांच्या रूपासोबत हळूहळू त्यांचे गुण, लीला आणि धामाचेही स्फुरण भक्ताच्या हृदयात आपोआप होऊ लागते.

(श्री हरिनाम चिंतामणी)

* * *

चातुर्मास्य-व्रत

चातुर्मास्य-व्रत म्हणजे वैष्णवांद्वारे श्रावण, भाद्रपद, आश्विन व कार्तिक या पावसाळ्यातील चार महिन्यात पालन करण्यात येत असलेले विशेष नियम. चातुर्मास्याच्या काळात अनेक पदार्थ वर्ज्य मानले गेले आहेत. पहिल्या महिन्यात पालेभाज्या, दुसऱ्या महिन्यात दही, तिसऱ्या महिन्यात दूध आणि चौथ्या महिन्यात मोहरीचे तेल घेणे निषिद्ध आहे. याशिवाय, संपूर्ण चार महिन्यांत टोमॅटो, वांगी आणि इतर काही पदार्थ वर्ज्य आहेत. श्रीचैतन्य महाप्रभू हे सर्व नियम अत्यंत काटेकोरपणे पाळत असत. परंतु आजकाल आपण पाहतो की अनेक भक्त हे नियम पाळत नाहीत. श्रील प्रभुपाद भक्तिसिद्धांत सरस्वती ठाकूर या बाबतीत अत्यंत कठोर होते.

* * *

॥श्रीश्रीगुरुगौराङ्गौ जयतः॥

(१६)

छींडची ढाणी

दिनांक—५/७/२००६

परमाराध्यतम, परमश्रद्धेय, प्रातःस्मरणीय, श्रीगुरुदेव श्रीभक्तिसर्वस्व निष्किंचन महाराज यांच्या युगुल-चरणारविंदात अधमाधम, दासानुदास, अनिरुद्ध दास तुम्हाला असंख्य वेळा साष्टांग दंडवत प्रणाम करतो आणि प्रेमाभक्ती प्राप्त होण्यासाठी मी पुन्हा पुन्हा प्रार्थना करतो.

भगवंतांच्या प्रती 'आपलेपणा'

भगवंतांच्या प्रती 'आपलेपणा'च विरहाग्नी प्रज्वलित करण्याचे मूळ साधन आहे. जोपर्यंत भौतिक जगाप्रती 'आपलेपणा' असेल, तोपर्यंत विरहाची तळमळ येऊच शकत नाही. हा भगवंतांप्रती असणारा 'आपलेपणा'च अहंकाराचा ('अहं' भावनेचा) नाश करतो. जोपर्यंत संसारात 'मी'पणा (अहंकार) असेल, तोपर्यंत भगवंतांच्या प्रती आपलेपणाचा प्रश्नच नाही, कितीही सत्संग करा, हरिनामाच्या कितीही माळा जप करा. 'आपलेपणा' तेव्हाच जन्म घेईल, जेव्हा कानाने हरिनाम श्रवण होईल. हेच भक्तीचे मूळ साधन आहे. हेच शरणागतीचे मूळ लक्षण आहे, अन्यथा फक्त कपटच दिसून येईल.

'आपलेपणा' ही अशी एक अतूट दोरी आहे, जी विरहाला खेचून आणते. गोपिका, द्रौपदी, भीलणी (भील जमातीतील शबरी), नरसी मेहता, गोस्वामी तुलसीदास, मीराबाई इत्यादी भक्त या भगवंतांच्या प्रती असलेल्या 'आपलेपणा'ची ज्वलंत उदाहरणे आहेत. 'आपलेपणा' असल्यामुळे वियोग सहन होत नाही. भेटण्यासाठी प्रत्येक क्षण युगासारखा वाटतो. मग भगवंतांनाही भक्ताचा वियोग सहन होत नाही.

चातुर्मास्य-व्रत सुरू होणार आहे. कमरेला पट्टा बांधून उभे राहण्यात असीम लाभ आहे. वेळ असाच निघून जाईल. काळ येऊन आम्हाला पकडेल, तो चारही दिशांमध्ये तोंड फाडून उभा आहे. जेव्हा संधी मिळेल तेव्हा तो गिळून टाकेल. **दररोज कमीत कमी तीन लाख हरिनाम जप करणे अत्यंत आवश्यक आहे.**

आठही प्रहर साधन-भजनात लागले पाहिजे. दिवसा खूप सारे व्याप आणि त्रास समोर येऊन उभे ठाकतात. रात्र भजनासाठी अनुकूल असते. जिथे शांत वातावरण, थंड रात्री, आल्हाददायक हवामान असेल, त्याहून अधिक अनुकूलता काय असेल?

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः॥

(श्रीमद्भगवद्गीता २.६९)

अनुवाद—जी सर्व जीवांची रात्र आहे, ती आत्मसंयमी मुनीसाठी जागे राहण्याची वेळ आहे आणि जी सर्व जीवांची जागे राहण्याची वेळ आहे, ती आत्म-निरीक्षक मुनीसाठी रात्र आहे. जी आत्मविषयिणी बुद्धी जडमुग्ध सर्वसाधारण जीवांसाठी रात्रिसमान आहे, स्थितप्रज्ञ व्यक्ती त्यात जागृत राहतात, आणि ज्या विषय-प्रवणा बुद्धीत साधारण जीव जागृत राहतात, तत्त्वदर्शी मुनीसाठी तीच रात्रीसमान आहे अर्थात ते निर्लिप्तभावाने यथायोग्य विषय स्वीकार करतात.

भजनानंदी भक्त रात्री जागृत असतो, दिवसा झोपतो. जागे राहण्यातच आपले भले आहे. ज्याप्रमाणे कामवासनेने अंध झालेल्या माणसाला रात्री झोप येत नाही, त्याचप्रमाणे भगवंतांपासून विरह अनुभव करणाऱ्या भक्ताला रात्री झोप येत नाही. कामवासनेने अंध झालेला माणूस विष पितो, तर भगवंतांपासून विरह अनुभव करणारा भक्त अमृताचा आनंद घेतो.

तुम्ही काहीही बोला, हा 'आपलेपणा' फक्त हरिनामामुळेच येईल! तेही स्मरणाला सोबत ठेवून, म्हणजेच कानाशी जोडून. दोघांच्या (जीभेच्या आणि कानाच्या) घर्षणानेच 'आपलेपणा' प्रकट होतो. जोपर्यंत आपले खास घर मिळत नाही, तोपर्यंत भटकणे चालूच राहील. जेव्हापासून आपण आपल्या पित्यापासून वेगळे झालो आहोत, तेव्हापासून त्रासांमध्येच अडकलो आहोत. कोण सुखी आहे? फक्त परमहंस भक्तच आपल्या जीवनात आनंदी आहेत. भगवंतांप्राती जोपासलेल्या या 'आपलेपणा'मुळे अहंकार, वासना, सांसारिक आसक्ती, दुःख, कष्ट, चिंता इत्यादी सर्व काही नाहीसे होते. हे सर्व फक्त हरिनामामुळेच होईल. ज्याला हरिनाम प्रिय वाटले, तोच चारही वेद, अठरा पुराणे, उपनिषदे इत्यादींचा पूर्ण ज्ञाता झाला. शबरी

नामक भीलणीने (भील स्त्रीने) कोणते शास्त्र वाचले होते? फक्त भगवान् श्रीरामांशी 'आपलेपणा' ठेवून तिने अमरत्व प्राप्त केले!

हरिनामाचा जप करणे हीच भगवंतांना प्रकट करण्याची खरी युक्ती आहे. परंतु हरिनामात एखाद्या भाग्यवान, दुर्मीळ व्यक्तीलाच रस असतो. जी व्यक्ती ओझे (भार) समजून गुरुदेव-प्रदत्त हरिनामाची संख्या पूर्ण करते, ती व्यक्तीसुद्धा जप न करणाऱ्या व्यक्तीपेक्षा उत्तमच आहे. यामुळे पुण्य (नित्य-सुकृती) जमा होत राहते. अनेक जन्म घेतल्यानंतर भार मानून हरिनामाचा जप करणाऱ्या व्यक्तीला हरिनामात आवड (रुची) निर्माण होईल आणि ती अमरत्व प्राप्त करेल.

अवलंबन (आधार) देखील एक महत्त्वाचा भाव आहे. याशिवाय भगवंतांची सृष्टी चालूच शकत नाही. जीवाला पाच तत्त्वांचा—पृथ्वी, पाणी, अग्नी, हवा (वायू), आकाश इत्यादींचा आधार लागतो. यापैकी एकही तत्त्व मिळाले नाही, तर शरीर जीवंत राहू शकत नाही. आधाराशिवाय सर्व व्यर्थ आहे. मनुष्य श्रीगुरुदेवांच्या माध्यमातून भगवंतांचा आधार घेतो. परंतु जोपर्यंत भगवंतांशी आपलेपणा नसेल, तोपर्यंत फक्त आधाराने काम होणार नाही. 'आपलेपणा' हाच सारभूत भाव आहे. याशिवाय सर्व व्यर्थ (सार-रहित) असेल.

संसारात माहीत नाही कितीतरी लोक मरत राहतात. पण त्यांच्याशी 'आपलेपणा' नसल्यामुळे कोणतेही दुःख आपल्या मनाला व्यापत नाही. परंतु जेव्हा आपल्या कुटुंबातील कोणी जवळचा माणूस मरतो, तेव्हा आपण अथांग दुःखसागरात बुडून जातो, कारण त्यांच्याशी आपला 'आपलेपणा' असतो. त्याचप्रमाणे, जर भगवंतांशी 'आपलेपणा' झाला, तर सर्व गोंधळच मिटून जाईल. फक्त याच 'आपलेपणा'च्या कमतरतेमुळे जीव दुःख भोगत राहतो.

आता प्रश्न हा असू शकतो की हा 'आपलेपणा' कसा प्राप्त होईल? तर याचा सर्वात सोपा उपाय आहे की मृत्यूला समोर ठेवा आणि विचार करा की "तुझ्या डोळ्यासमोर कितीतरी तुमच्या परिचयातील व अपरिचित लोक मृत्यूच्या मुखात गेले. आता तुझाही नंबर येणार आहे." मग विचार करा, कोणी सुखी आहे का? सर्वजण कोणत्या ना कोणत्या दुःखाने भरडले जात आहेत. इथे कोणीही आपले नाही, सर्व परके आहेत. फक्त भगवानच आपले

आहेत, जे सर्वांचे पिता आहेत, त्यांच्या कुशीत गेल्यानेच सुख मिळेल. कितीही वैभवशाली झालात तरी वैभव सुख देणार नाही. कारण तिथे सुख दिसते, पण ते नाही. 'साधन-भजन' केल्याशिवाय ब्रह्मदेव, महादेव तसेच देवी-देवतांनाही सुख मिळू शकत नाही, तर मग आपण कोणत्या खीजगणतीत आहोत? (जेव्हा ब्रह्मदेव, महादेव आणि देवी-देवतांनाही साधन-भजनाशिवाय सुख मिळत नाही, तेव्हा आपण निष्क्रिय राहून सुखाची अपेक्षा कशी करू शकतो?) पुन्हा पुन्हा विचार करा, तर हरिनामात आवड निर्माण होईल. **भगवान म्हणतात, "जीवांना आपलेसे करण्यासाठीच मी माझे 'नाम' अर्थात् हरिनाम सृष्टीत ठेवले आहे, कारण फक्त माझ्या नामाने मला हाक मारल्यास मी हाक मारणाऱ्याकडे, इच्छा नसतानाही, खेचला जातो."** पण इतके सोपे साधन असूनही कोणी ते स्वीकारत नाही, आणि जरी स्वीकारले तरी भगवंतांशी 'आपलेपणा' ठेवत नाही. अशा प्रकारे त्याचे जीवन व्यर्थ गोष्टींमध्ये निघून जाते. मग त्याला ही संधी पुन्हा मिळत नाही.

रोगाच्या रूपात मृत्यू डोळे वटारून दाखवत आहे, तरीही माणूस झोपलेला असतो, किती मूर्खता आहे! झोपण्याचे कारण आहे—संतांच्या चरणी अपराध. श्रीअद्वैत-आचार्यांप्रती अपराध केल्यामुळे गौरहरींनी आपल्या आईलाही (अर्थात शची-मातेलाही) क्षमा केले नाही, मनानेही संताचे वाईट चिंतणे हा अपराध आहे. संतांवर मन जितक्या प्रमाणात प्रेम करेल, तितक्याच प्रमाणात हरिनामात रुची निर्माण होईल. ओझे समजून हरिनामाचा जप केल्याने साधकाला भगवद्-धामाला जाण्यासाठी अनेक जन्म घ्यावे लागतील. हरिनामातून भगवंतांचा विरह प्रकट व्हायला हवा. हीच अवस्था मनाची परीक्षा घेते. याचा अर्थ असा आहे की, जर विरह झाला नाही, तर मन अजूनही संसाराशी जुळलेले आहे.

* * *

राम नाम मनिदीप धरु जीह देहरीं द्वार।
तुलसी भीतर बाहेरहूँ जैं चाहसि उजियार॥

अनुवाद—गोस्वामी तुलसीदास म्हणतात की, "हे मानवा, जर तुला आतून आणि बाहेरून दोन्हीकडून प्रकाश हवा असेल, तर मुखरूपी दरवाजाच्या जिभरूपी उंबरठ्यावर राम-नामरूपी मणीदीप ठेव." घराच्या उंबरठ्यावर ठेवलेला तेलाचा दिवा जसा घराच्या

अंगणात व घरात सुद्धा प्रकाश देतो, त्याच प्रमाणे भगवान् श्रीरामांच्या पवित्र नामाचा जप व कीर्तन स्वतःचे अंतःकरण सुद्धा शुद्ध करते व बाह्य-जगातील भौतिकतावादी लोकांचे अंतःकरण सुद्धा हरिनाम कानावर पडल्याने शुद्ध होते. त्यांच्या हृदयातील अज्ञानरूपी अंधकार दूर होतो.

* * *

कृष्ण नाम, भक्तसेवा सतत करिबे।
कृष्ण-प्रेम-लाभ ता'र अवश्य हइबे॥

अनुवाद—नेहमी श्रीकृष्ण-नामाचा जप आणि शुद्ध-भक्तांची सेवा करत रहावी. असे केल्याने श्रीकृष्ण-प्रेमाची प्राप्ती नक्की होईल.

* * *

नामाचार्य श्रील श्रीहरिदास ठाकूर यांचा उपदेश

दररोज हरिनामाचा जप करण्यासाठी जी संख्या तुम्ही संकल्पपूर्वक निर्धारित केली आहे आहे, त्या संख्येत शिथिलता येऊ देऊ नका, याकडे वारंवार विशेष लक्ष द्यावे लागेल.

* * *

अंतिम आणि सर्वोत्तम उपाय—भगवंतांना नेहमी जवळ ठेवा

भक्तांच्या आत्यंतिक सुखासाठी मी नेहमी उत्सुक असतो आणि त्याचबरोबर त्यांना लवकर भगवंतांचे दर्शन व्हावे, यासाठी मी 'माझ्या आजोबांना' (अर्थात् भगवान् श्रीकृष्णांना) उपाय विचारत असतो. 'माझ्या आजोबांनी' याआधीही अनेक उपाय सांगितले आहेत, परंतु भक्तांनी त्या सर्व उपायांना 'कठीण' सांगत म्हटले होते की, "हा उपाय आमच्याकडून होत नाही." तेव्हा 'माझ्या आजोबांना' मी म्हटले होते की, "असे कठीण उपाय सांगू नका. एखादा सोपा उपाय सांगा, कारण तुम्ही जे उपाय सांगता, ते भक्त करू शकत नाहीत!"

तेव्हा अनेक उपाय सांगितल्यानंतर शेवटी 'माझ्या आजोबांनी' एक खूप सोपा आणि सहज उपाय सांगितला, जो सर्व भक्त थोड्या अभ्यासाने निश्चितच करू शकतात. उपाय आहे—भगवंतांना नेहमी आपल्या सोबत ठेवा. एक मिनिटही भगवंतांना आपल्यापासून वेगळे (दूर) करू नका. जे काही काम कराल—भगवंतांना नेहमी सोबत ठेवून करा. गाडीत बसाल, तर भगवंतांनाही बसवून घ्या. कधीही अपघात होणार नाही. प्रसाद घ्याल, तर भगवंतांनाही सांगा की तुम्हीही घ्या. अगदी शौचाला जाल, तरीही भगवंतांना सांगा, "चला माझ्यासोबत." भगवान परम-पवित्र आहेत, त्यांना कोणत्याही ठिकाणी काहीही अडचण नाही. भगवान तर भक्तांसाठी सर्व काही करण्यास तयार आहेत, फक्त अडचण ही आहे की त्यांना कोणी इच्छितच नाही अर्थात् त्यांच्यावर खरे प्रेम कोणीच करत नाही.

हा उपाय काही दिवस करून तर पाहा, किती फायदा होतो! जर विसरलात, तर भक्तांनी एकमेकांना आठवण करून द्यावी की भगवान सोबत आहेत ना! अशा प्रकारे एकमेकांना मदत करून हा उपाय लवकरात लवकर आपल्या जीवनात स्वीकारल्यास निश्चितच परम कल्याण होईल. भगवंतांनी भगवद्गीतेत म्हटलेही आहे की, **'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्'**—'भक्त जसे आचरण करतो, जसे माझे भजन करतो, मीही त्याचे तसेच भजन करतो.' म्हणजेच 'जर भक्त मला सोडून जात नाही, तर मी त्या भक्ताला कसे सोडू शकतो?'—अशा प्रकारे भगवान आणि भक्तामध्ये कधीही वियोग होणार नाही आणि सुखच सुख व्यापून राहील. शास्त्राचे हेच सार आहे की भगवंतांना नेहमी आठवणीत ठेवा

(त्यांचे सतत स्मरण करा). जर भगवान नेहमी सोबत असतील, तर त्यांचे स्मरण तर आपोआपच चालू राहील. भगवान सोबतच असतील, तर दुःख येऊच कसे शकते? "भगवंतांना नेहमी सोबत ठेवा"—हा अंतिम आणि सर्वोत्तम उपाय आहे.

(अनिरुद्ध दास अधिकारी)

* * *

टीप—भगवान कृष्णांच्या संबंध-ज्ञानाच्या दृष्टीने अनिरुद्ध प्रभू त्यांचे 'नातू' आहेत, म्हणून अनिरुद्ध प्रभू भगवंतांना 'माझे आजोबा' असे संबोधतात.

* * *

श्रीपाद अनिरुद्धदास अधिकारींचा संक्षिप्त जीवन परिचय

श्रीपाद अनिरुद्ध दास अधिकारी प्रभूजी आज १०० वर्षांपेक्षा जास्त वयाचे असूनही रोज ३ ते ५ लाख हरिनाम मध्यरात्री १२-१ वाजता उठून, एकाच ठिकाणी बसून करतात आणि रोज फक्त ३-४ तास विश्रांती करतात. आजपर्यंत भगवंतांनी आपल्याकडून फक्त एकाच विषयावर अर्थात् हरिनामावर "इसी जन्म में भगवद् प्राप्ति" नावाचे ८ हिंदी ग्रंथ लिहून घेतले आहेत, ज्यात भाग १ ते ७ भगवंतांनी आपल्याकडून पत्रांच्या रूपात रात्री लिहून घेतले आणि भाग ८ प्रवचनांच्या रूपात आपल्या मुखातून वदविला.

आपला जन्म शरद-पौर्णिमा (रास-पौर्णिमा), २३ ऑक्टोबर, १९२८ रोजी छींडची ढाणी, तहसील कोटपूतली, जिल्हा जयपूर (राजस्थान) येथे झाला. आपण पेशाने एक सिव्हील इंजिनिअर होतात आणि या पदावर बिकानेरमध्ये काम करत असताना आपल्याला हनुमंतांचे छद्म (कोणालाही ओळखता न येणाऱ्या रहस्यमय) रूपात दर्शन झाले, ज्यांनी आपल्याला सांगितले की आपण एक सामान्य माणूस नसून गोलोक-धामाचे निवासी (रहिवासी) आहात आणि आपल्याला हरिनामाचा प्रचार करण्यासाठी भगवंतांनी पृथ्वीवर पाठवले आहे. याचे पुष्टीकरण हनुमंतांनी आपल्याला आपल्या हातावर असलेल्या भगवंतांच्या दिव्य आयुधांची चिन्हे दाखवून केले. त्यांनी श्रीअनिरुद्ध प्रभूंना ही गोष्ट वयाच्या ७४ वर्षांपर्यंत गोपनीय (गुप्त) ठेवण्यास सांगितले. ते म्हणाले की वयाच्या ७४ वर्षानंतरच हे रहस्य सर्वांना सांगा. हे रहस्य जर तुम्ही

इतरांना सांगितले नाही, तर लोक तुम्हाला साधारण मनुष्य समजतील आणि तुमचा प्रचार होऊ शकणार नाही.

आपण फक्त शिक्षागुरूच्या रूपात सर्व साधकांना हरिनाम करण्याची शिकवण देता. आपला ७०० कोटींपेक्षा जास्त हरिनाम जप झाला आहे, ज्याच्या प्रभावाने आपल्याला आज ९० वर्षांपेक्षा जास्त वयाचे असूनही कोणताही रोग नाही. आपण नम्रतेची साक्षात मूर्ती आहात आणि आपल्या शिक्षा-शिष्यांनाही खूप प्रेम आणि आपुलकी देता आणि सर्वांना पूजनीय मानता, कारण आपण हे समजता की आपले प्रिय भगवंत सर्वांच्या हृदयात बसलेले आहेत आणि कोणालाही पाय (चरण) स्पर्श करण्याची, फुलांची माळ घालण्याची, भेट इत्यादी देण्याची परवानगी देत नाहीत. आपला भगवंतांसोबतचा नित्य संबंध दीड वर्षांच्या बाळाचा आहे आणि आपण प्रेमाने भगवंतांना 'आजोबा' म्हणून हाक मारता.

गोवर्धनच्या पायथ्याशी, गोवर्धन गावापासून सुमारे एक ते सव्वा मैल आग्नेय दिशेला, परासौली नावाचे गाव आहे. तेथील चंद्र-सरोवर येथे श्रीकृष्णांचे परम-भक्त सूरदास यांची भजन-कुटीर आहे. तेथे श्रीअनिरुद्ध प्रभूंना भगवंताचे साक्षात दर्शन प्राप्त झाले. पण जेव्हा आपल्यासोबतच्या १०-११ भक्तांना काहीही दिसले नाही, तेव्हा त्याच वेळी आपण भगवंतांना प्रार्थना केली, "आजोबा! तुम्ही यांनाही दर्शन द्या, नाहीतर हे मला खोटे समजतील." तुमच्या या प्रार्थनेमुळे भगवंतांनी त्यांना दिव्य-दृष्टी देऊन छाया-रूपातच दर्शन दिले, कारण ते भक्त भगवंतांच्या साक्षात्-दर्शनाचा तेजस्वी प्रकाश सहन करण्यास योग्य नव्हते. या सर्व भक्तांची नावे 'इसी जन्म में भगवद् प्राप्ति' (भाग-१) मध्ये लिहीली आहेत. भगवंताचे दर्शन तर अनेक भक्तांना झाले आहे, पण इतरांना भगवंतांचे दर्शन घडवणे हे आपल्या भजन-बळ आणि भगवंतांसोबतच्या अत्यंत प्रिय संबंधाचा पुरावा आहे. दुसऱ्यांदा भगवंतांनी ट्रेनमध्ये एका लहान मुलाच्या रूपात (छद्म रूपात) येऊन, आपल्याला गोंधळात पाडून (थोडे भ्रमित करून) प्रेमाने खीर खाऊ घातली.

सब धरती कागद करूँ, लेखनी सब बनराय।
सात समुद्र की मसि करूं, गुरु गुण लिखा न जाय॥

अनुवाद—सर्व पृथ्वीला कागद बनवले, सर्व वनांच्या झाडांना लेखणी किंवा टाक बनवले आणि सात समुद्रांना शाईची दौत

बनवले तरीही श्रीगुरुदेवांचे गुण लिहिता येणार नाहीत, कारण श्रीगुरुदेवांच्या करुणेला पारावार नाही.

उत्तम वैष्णवांचे आणि गुरुदेवांच्या महिमेचे गायन, सात समुद्रांच्या पाण्याला शाई बनवून, वनांतील सर्व झाडांची लेखणी बनवून आणि सर्व पृथ्वीला कागद बनवूनही करता येत नाही. म्हणून आम्ही फक्त काही शब्दांमध्येच सूर्याला दिवा दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

* * *

श्रील भक्तिदयित माधव गोस्वामी महाराजांचा संक्षिप्त परिचय

श्रीरूप-गोस्वामीपाद यांचे अनुयायी आणि श्रीगौडीय-मठ समूहाचे संस्थापक, नित्यलीला-प्रविष्ट परमहंस ॐ अष्टोत्तरशत श्रीश्रीमद्भक्तिसिद्धांत सरस्वती गोस्वामी ठाकूर 'प्रभुपाद' यांचे प्रिय शिष्य आणि अखिल भारतीय श्रीचैतन्य गौडीय मठ प्रतिष्ठानाचे संस्थापक, अस्मदीय गुरुपादपद्म, परमहंस परिव्राजकाचार्य, ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत श्रीश्रीमद्भक्तिदयित माधव गोस्वामी महाराज यांचा जन्म १९०४ सालच्या एका परम-पावन तिथी अर्थात् उत्थान एकादशीला, पूर्व बंगाल (सध्याचे बांग्लादेश) मध्ये फरीदपूर जिल्ह्यातील कांचन-पाडा नावाच्या गावात झाला.

माझ्या गुरुजींनी मला हरिनाम आणि दीक्षा एकाच वेळी १९५२ मध्ये दिली. ही त्यावेळची गोष्ट आहे जेव्हा एकही मठ नव्हता आणि गुरुजींना राधा-कृष्णांचा एक विग्रह घेण्यासाठी स्वतः तीन वेळा जयपूरला यावे लागत होते. त्यांनी माझ्या कुटुंबाव्यतिरिक्त संपूर्ण राजस्थानमध्ये कोणालाही शिष्य बनवले नाही. त्यामुळे माझा संपर्क त्यांच्यासोबत अधिक राहिला. तेव्हा मी त्यांना भगवंतांच्या विषयी खूप प्रश्न विचारायचो आणि हेच म्हणायचो, "गुरुजी, मला काहीही नको, मला भगवंतांचे दर्शन कधी होईल?" ते म्हणायचे, "हरिनामाचा जप केल्यानेच भगवंतांचे दर्शन होईल." त्यांच्यामुळेच मला हरिनामावर पूर्ण निष्ठा झाली आणि मी आयुष्यभर निरंतर हरिनामाशिवाय काहीही केले नाही.

सर्वात आधी जेव्हा मी कृष्ण-मंत्राचे (अष्टदशाक्षर अर्थात् अठरा-अक्षराच्या गोपाळ-मंत्राचे) पुरश्चरण केले, तेव्हा कृष्ण-मंत्राचा जप केल्याने खूप विरहाचा अनुभव यायचा आणि मला वाक्-सिद्धीही प्राप्त झाली. मी जे काही बोलायचो, ते सत्य व्हायचे. मी ज्याचे जे काम, ज्या तारखेला सांगितले, त्याच तारखेला व्हायचे. एकदा गुरुजी जयपूरमध्ये विग्रह पाहण्यासाठी आले होते. तेव्हा एक चीफ इंजिनिअरही गुरुजींना भेटायला यायचे. एक दिवस चीफ इंजिनिअरने गुरुजींच्या समोरच हे सर्व काही सांगितले आणि मग गुरुजींनी मला म्हटले, "आता तुम्ही या वाक्-सिद्धीचा वापर कधीही करू नका."

गुरुदेव जयपूरमध्ये जेव्हाही यायचे, तेव्हा प्रेमपूर्ण भावनेने म्हणायचे की, जिथे कुठे मी राहीन, तुम्ही माझ्याकडे येत रहा

आणि प्रसादही तिथेच घेत जा. जयपूरमध्ये मी जिथे राहायचो, गुरुजी तिथेही यायचे. माझी धर्मपत्नी गुरुजींना गरम-गरम पोळ्या (फुलके) खायला द्यायची.

एकदा मला कळले की माझ्या मेहुणीमध्ये भूत येते आणि माझ्या दादाने (मोठ्या भावाने), खूप श्रीमंत असल्यामुळे, खूप मोठमोठ्या मौलवी आणि पंडितांना बोलावले पण भूत बाहेर निघाले नाही आणि शेवटी त्यांनी मला विचारले—"तुमचे गुरुजी या भूताला बाहेर काढू शकतात का?" तर मी म्हटले, "हो." आणि मी गुरुजींना आठवून हरिनाम करून तिच्या गळयात ७ गाठींचा धागा बांधला आणि ते भूत निघून गेले आणि नंतर माझ्या गुरुजींच्या कृपेमुळे ते कधीही परत आले नाही.

नंतर एकदा माझे गुरुजी एकाच वेळी दोन ठिकाणी प्रकट झाले. जेव्हा ते स्वतः आसाममध्ये होते, तेव्हा त्याच वेळी त्यांनी माझ्या दादांना आमच्या गावातही साक्षात दर्शन दिले होते.

एकदा गुरुजी जयपूरमधील श्री राधा-गोपीनाथांच्या मंदिरात बसले होते आणि मीही तिथेच होतो. मंदिरातील गोस्वामींनी अचानक त्यांच्या पायाच्या तळव्याकडे पाहिले की त्यात भगवंतांची चिन्हे आहेत, तेव्हा त्या गोस्वामींनी फुले आणून गुरुजींच्या चरणांवर वाहिली आणि दंडवत प्रणाम अर्पण केला.

२७ फेब्रुवारी १९७९, शुक्ल प्रतिपदा तिथीला, महासंकीर्तन होत असताना माझे गुरुदेव नित्यलीलेत प्रविष्ट झाले. त्यांच्या अहेतुकी-कृपेच्या वृष्टीमुळे आणि प्रेरणेमुळेच फक्त 'हरिनाम' या एकाच विषयावर मी 'इसी जन्म में भगवद् प्राप्ति' हा ग्रंथ लिहू शकलो. या ग्रंथाच्या आठ भागांमध्ये माझ्या गुरुदेवांच्या दिव्य वाणीचे अमृत भरलेले आहे. मला जे काही मिळाले आहे, ते त्यांच्या असीम कृपेनेच मिळाले आहे. आजही मी माझ्या गुरुदेवांना प्रत्येक वेळी माझ्यासोबत अनुभवतो.

(अनिरुद्ध दास अधिकारी)